नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ३६ * अंक ३४० * * खामगांव (बुलडाणा) * शुक्रवार, दिनांक ६ जून २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## एका दिवसात १०० पेक्षा अधिक कोविड रुग्ण

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ५ :
देशात कोरोना रुग्णांची संख्या सतत वाढत आहे. बुधवारी १५ राज्यांत ५६४ रुग्ण आढळले, त्यापैकी ४३७ रुग्ण फक्त ४ राज्यांमधील आहेत. केरळमध्ये सर्वाधिक ११४, कर्नाटकमध्ये ११२, पश्चिम बंगालमध्ये १०६ आणि दिल्लीमध्ये १०५ रुग्ण आढळले आहेत. अशाप्रकारे, देशातील सक्रिय रुग्णांची संख्या ४८६६ वर पोहोचली आहे.

महाराष्ट्रात तीन आणि दिल्ली आणि कर्नाटकात प्रत्येकी दोन जणांचा मृत्यू झाला. यासह, देशात कोरोनामुळे मृतांचा आकडा ५१ वर पोहोचला आहे. दरम्यान, केंद्र सरकारने गुरुवारी देशभरातील राज्यांमधील निवडक रुग्णालयांमध्ये मॉक ड्रिल केले आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## उद्धव-राज' करणार काय

शिवसेनेचे कोणे एके काळी सर्वेसर्वा असलेले उद्धव ठाकरे आणि ते सर्वेसर्वा बनण्यासाठी बाळासाहेब यांनी दिलेल्या आदेशाला प्रतिसाद देऊन शिवसैनिकांना हर्षवणारे दिवस मुंबईच्या खड्ड्यामध्ये जाऊ नये. असे बाळासाहेबांच्या तमाम शिवसैनिकांना आणि तेव्हा शिवसैनिक असलेल्या आताच्या मनसैनिकांना वाटते. उद्धव ठाकरे गादीवर बसले. त्यावेळी राज साहेब यांनीही त्यांना पाठिंबा दिला होता. त्यानंतर 'दोनो ठाकरे भाई भाई, तनसे और मनसे भी अलग हुए' सुरुवातीचा काही काळ सोडला. तर उद्धव ठाकरे यांची कमान वरचवर चढत गेली आणि राज ठाकरे साहेबांची पायरी उतरती राहिली. खरे तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा जन्म झाल्यावर तेरा आमदार निवडून आले होते. अगदी सुरुवातीच्या काळात एवढे देदीप्यमान यश महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मिळवले. विशेष म्हणजे त्यातील एक आमदार तर सुवर्णमंडित होते. त्यासोबतच नाशिक महानगरपालिकेची सत्ता हाती आली होती. पण त्यानंतर काय झाले किंवा काय होत आहे. हे महाराष्ट्रातील तमाम शिवसैनिकांना दिसत आहे. लोकसभा उद्धव ठाकरे यांनी क्रमांक एकने जिंकली. त्यावेळी राज साहेबांनी मोदीजींना मुदित अंतकरणाने अगदी निरपेक्ष बिनशर्त पाठिंबा दिला. त्यावेळी महाराष्ट्रात महाविकास आघाडीचा झेंडा चांगलाच फडकला. मात्र महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी सर्वजण सहाय्यक उदार अंतःकरणाच्या शिंदे यांच्या शिवसेनेने ठाकरे परिवाराची शिवसेना अलगद आपल्या झोळीत टाकून घेतली. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीची जी भकास स्थिती झाली. ती अत्यंत विदारक होती. भारतीय जनता पक्षाने केवळ विरोधी पक्षच नाही. तर आपल्या सहकारी पक्षांनाही जबरदस्त धक्का दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जी रणनीती आखली. त्या नंतर महाराष्ट्रातील सर्वच पक्षांची बोलती बंद झाली. मनसेची ज्योत पेटलीच नाही. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेची व्याघ्र डरकाळी अजिबात घुमलीच नाही. काँग्रेसची पुंगी पोकळ निघाली. शरद पवारांना सूर गवसला नाही. मात्र, तिकडे शिंदेशाही आणि पवारशाही यांना बऱ्यापैकी यश मिळाले. हे सर्व सोपस्कार पार पडले, त्याचवेळी अनेक अपक्षांचा पाठिंबा मिळाल्यामुळे एकटा भारतीय जनता पक्षच सत्ताधीश होऊ शकला असता. पण शिंदे साहेबांचा वैभवी विजय आणि छोट्या पवार साहेबांच्या विजयाचा अर्थ अजून तरी कोणालाच समजलेला नाही. लोकसभा झाली, विधानसभा झाली आणि आता महाराष्ट्रातील पालिका आणि महानगरपालिका आलेली आहे. भारतीय जनता पक्षाच्या वज्रप्रहार मुष्टीचा मुकाबला करण्यासाठी कुठेतरी नवे समीकरण बनवणे गरजेचे होते. मुंबई आणि मुंबई उपनगर परिसरात तरी आज दोन्ही ठाकरे बंधूंना निश्चितच मानणारे प्रचंड शिवसैनिक किंवा मनसैनिक आहेत. शिवसैनिक आणि मनसैनिक एकत्र आले. तरी आमचे काही बिघडत नाही, असे भारतीय जनता पक्षाकडून सांगितले जात असले. तरी या दोन पक्षांच्या एकत्रिकरणानंतर काय होईल, हे सांगता येत नाही. हे दोन ठाकरे एकत्र येऊ नयेत. म्हणून बंद दाराच्या आड बरीच खलबते सुरू आहेत, असे समजते. पण आता निदान मुंबई महापालिका आणि इतर काही महानगरपालिका आपल्या ताब्यात घेण्यासाठी सर्व मतभेद विसरून हे दोन बंधू एकत्र यावेत. म्हणून अनेकांचे प्रयत्न सुरू आहेत. याच महिन्यात 1966 साली शिवसेनेची स्थापना झाली होती. ती बहुधा याच महिन्यात आलेल्या आणीबाणीचा मुकाबला करण्यासाठी होती. ठाकरे बंधूंचा वाणीविलास कितपत प्रभावी ठरतो. हेच आता शिवसैनिक आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसह संपूर्ण महाराष्ट्राला बघावयाचे आहे. जय भवानी! जय शिवराय!! जय महाराष्ट्र!!!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

प्रतिक्षा संपली

# समृद्धी पूर्णत्वास!

### फडणवीस यांच्या हस्ते इगतपुरी ते आमणे पर्यंतच्या ७६ किमी लांबीच्या टप्प्याचे लोकार्पण

■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. ५ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नाशिकमधील इगतपुरी ते ठाण्यातील आमणे पर्यंतच्या ७६ किमी लांबीच्या समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे उद्घाटन आज झाले.

यामुळे एका अर्थाने मागील वेळी मुख्यमंत्री असताना फडणवीस यांनी पाहिलेले स्वप्न आता पूर्ण झाले आहे. यामुळे नागपूर ते मुंबई मधील अंतर कमी झाले असून वेळेची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे.



राज्याच्या पायाभूत सुविधांच्या विकास गाथेतील एक मुकुटमणी, 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गा'चा अंतिम टप्पा (इगतपुरी ते आमणे -७६ किमी) सज्ज झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अंतिम टप्प्याचे भव्य लोकार्पण झाले. या लोकर्पणानंतर संपूर्ण ७०१ किमी लांबीचा समृद्धी महामार्ग वाहतुकीसाठी खुला होऊन नागपूर ते मुंबई प्रवास फक्त ८ तासांत पूर्ण करता येणार आहे.

**स्टेअरिंग शिंदेंच्या हाती**

मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह प्रमुख मंत्र्यांच्या उपस्थितीत या समृद्धी महामार्गाच्या अखेरच्या टप्प्याचे लोकार्पण करण्यात आले. यानंतर या मार्गावरील बोगद्यातून या तिन्ही नेत्यांनी प्रवास केला. विशेष म्हणजे या वेळी फडणवीस यांची गाडी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चालवली. मागील वेळी झालेल्या कार्यक्रमात एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना त्यांची गाडी देवेंद्र फडणवीस यांनी चालवली होती, हे विशेष.

मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांनी एकाच गाडीत प्रवास केला असला तरी उपमुख्यमंत्री अजित पवार मात्र वेगळ्या गाडीतून या मार्गावरून जाताना दिसले. त्यामुळे याबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरू झाल्या होत्या. सरकार म्हणून आम्ही एकत्र काम करत आहोत. अजित पवार हे वेगळ्या गाडीत बसले होते. त्यात चर्चा करण्यासाठी काहीही नसल्याचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी म्हटले आहे.

## बंगळुरू चेंगराचेंगरी तिघांविरुद्ध एफआयआर



■ वृत्तसंस्था, बंगळुरू, दि. ५ :
चेंगराचेंगरी प्रकरणी कर्नाटक पोलिसांनी गुरुवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी), डीएनए इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी आणि कर्नाटक क्रिकेट असोसिएशनविरुद्ध एफआयआर दाखल केला. त्यांच्यावर विजयी परेड दरम्यान गुन्हेगारी निष्काळजीपणाचा आरोप आहे. जबाबदार एजन्सींच्या अनागोंदी आणि निष्काळजीपणामुळे चेंगराचेंगरी झाल्याचे एफआयआरमध्ये म्हटले आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

दुसरीकडे, या प्रकरणाची सुनावणी उच्च न्यायालयात झाली. कार्यवाहक मुख्य न्यायाधीश व्ही. कामेश्वर राव आणि न्यायमूर्ती सीएम जोशी यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला अपघाताचा स्थिती अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. आता पुढील सुनावणी १० जून रोजी होईल.

त्याच वेळी, याचिकाकर्त्याच्या वकिलाने न्यायालयाला सांगितले की, 'आरसीबी खेळाडूंना सन्मानित करण्याचा निर्णय कोणी घेतला आहे, हे राज्य सरकारने सांगावे.' देशासाठी न खेळणाऱ्या खेळाडूंचा सन्मान करण्याची काय सक्ती होती? ४ मे रोजी, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने पहिल्यांदा आयपीएलचे विजेतेपद जिंकल्यानंतर बंगळुरूमध्ये विजयी परेड आयोजित केली. प्रथम, राज्य सरकारने विधानसभा परिसरात सर्व खेळाडूंचा सन्मान केला. हा कार्यक्रम चिन्नास्वामी स्टेडियममध्ये झाला. याआधीही स्टेडियमबाहेर जमलेल्या गर्दीत चेंगराचेंगरी होऊन ११ जणांचा मृत्यू झाला होता. ३३ जण जखमी आहेत. मृत सर्व ३५ वर्षांपेक्षा कमी वयाचे होते.

## १ कोटींचे बक्षीस असलेला नक्षली चकमकीत ठार झाल्याचा दावा

■ वृत्तसंस्था, बिजापूर, दि. ५ :
छत्तीसगडमधील बिजापूर येथील राष्ट्रीय उद्यान परिसरात नक्षलवाद्यांशी चकमक सुरू आहे. केंद्रीय समिती सदस्य सुधाकर उर्फ नर सिंहचलम या चकमकीत ठार झाल्याचे वृत्त आहे. तो तेलंगणा, छत्तीसगड आणि महाराष्ट्रात वॉन्टेड होता. सुधाकरवर १ कोटीचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.



गुरुवारी सकाळपासून पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये गोळीबार सुरू आहे. राष्ट्रीय उद्यान परिसरात माओवाद्यांच्या मोठ्या संख्येने उपस्थिती असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दल बाहेर पडल्याचे सांगण्यात येत आहे.

बस्तरचे आयजी पी. सुंदरराज यांनी चकमकीची पुष्टी केली आहे. सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकात डीआरजी, एसटीएफ आणि कोब्रा सैनिकांचा समावेश आहे.

जेव्हा पथक शोधासाठी बाहेर पडले, तेव्हा दबा धरून बसलेल्या नक्षलवाद्यांनी सैनिकांवर गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल सैनिकांनीही गोळीबार केला. चकमकीनंतर संपूर्ण परिसरात सैनिकांकडून शोध मोहीम सुरू आहे.

विजापूरचे एसपी जितेंद्र कुमार यादव, डीआयजी कमलोचन कश्यप आणि एएसपी मयंक गुर्जर या चकमकीवर लक्ष ठेवून आहेत. २१ मे रोजी, एका चकमकीत नक्षलवादी नेता बसवा राजू देखील मारला गेला होता.

## कार घरात शिरली, ५ ठार

■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. ५ :
जिल्ह्यातील कळवण तालुक्यातील नामपूर येथील भदाण कुटुंबीयांच्या कारचा बुधवारी रात्री सुमारे १० वाजता भीषण अपघात झाला.



नातेवाईकाच्या लग्नसमारंभातून परतत असताना, नाशिक-कळवण रस्त्यावरील कोल्हापूर फाट्याजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार एका बंगल्यावर जाऊन आदळली. या अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

मृतांमध्ये शैला वसंत भदाण (६२), त्यांची जाऊ सरला भालचंद्र भदाण (५०), चालक खालिक मेहमूद पठाण (५०, रा. नामपूर), माधवी मेतकर (३२) आणि त्यांची मुलगी त्रिवेणी मेतकर (४, रा. देवळा) यांचा समावेश आहे. भालचंद्र भदाण (५२, रा. नामपूर) आणि उत्कर्ष मेतकर (१२, रा. देवळा) हे गंभीर जखमी झालेत.

सटाणा येथून नाशिककडे जात असताना, कोल्हापूर फाट्याजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार एका बंगल्यावर जाऊन आदळली. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी आणि स्थानिक नागरिकांनी मदतकार्य सुरू केले. जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## देशाच्या हितासाठी काम करणे पक्षविरोधी नाही : थरूर

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ५ :
भारत सरकारच्या शिष्टमंडळाचा भाग म्हणून अमेरिका दौऱ्यावर असलेले काँग्रेस नेते शशी थरूर यांनी गुरुवारी पक्षविरोधी वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, जे लोक राष्ट्रीय हितासाठी काम करणे पक्षविरोधी कृती मानतात, त्यांनी स्वतःला प्रश्न विचारला पाहिजे.



काँग्रेस सोडण्याच्या अटकळीच्या प्रश्नावर थरूर यांनी हे उत्तर दिले. ते म्हणाले, जेव्हा तुम्ही देशाची सेवा करत असता तेव्हा अशा गोष्टींबद्दल जास्त काळजी करू नये. भारताच्या सीमेबाहेर जाताच आमचे राजकीय मतभेद संपतात. सीमा ओलांडताच, आम्ही प्रथम भारतीय आहोत.

थरूर सध्या अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत, जिथे ते ऑपरेशन सिंदूरवर बहुपक्षीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करत आहेत. काँग्रेस नेते उदित राज यांनी सरकारच्या समर्थनार्थ बोलल्याबद्दल थरूर यांना भाजपचे सुपर प्रवक्ता म्हटले.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारत-पाकिस्तानमधील मध्यस्थीच्या विधानावर थरूर म्हणाले- मी येथे कोणत्याही वादाला खतपाणी घालण्यासाठी आलो नाही. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचा आदर केला जातो. त्यांनी पाकिस्तानला काय म्हटले हे आम्हाला माहिती नाही, परंतु आम्हाला कोणाच्याही सल्ल्याची गरज नव्हती.

## सुनीताच्या मोबाईलमध्ये संशयास्पद ॲप्स

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :
नागपूरच्या संत कबीरनगर भागातील सुनीता जामगडे यांच्या मोबाईलमध्ये दोन संशयास्पद ॲप्स आणि चॅटिंग आढळल्याने प्रकरणात नवीन वळण आले आहे. सुनीता ४ मे रोजी १२ वर्षीय मुलासोबत पंजाबला जात असल्याचे सांगून घराबाहेर पडल्या होत्या. १४ मे रोजी कारगिलच्या नियंत्रण रेषेजवळील हंडरमन गावातून त्या बेपत्ता झाल्या.

नियंत्रण रेषा ओलांडल्यानंतर पाकिस्तानी रेंजर्सने त्यांना अटक केली. पाकिस्तानी रेंजर्सने त्यांचा मोबाईल जप्त केला. नऊ दिवसांच्या चौकशीनंतर त्यांना बीएसएफच्या स्वाधीन करण्यात आले. झोन-५ चे पोलीस उपायुक्त निकेतन कदम यांच्या म्हणण्यानुसार, मोबाईलच्या प्राथमिक तपासणीत संशयास्पद ॲप्स आणि चॅटिंग आढळले आहे. या ॲप्सचा उद्देश आणि वापर स्पष्ट करण्यासाठी फॉरेन्सिक तपासणी करण्यात येणार आहे.



## चर्चगेट रेल्वे स्थानकात आग

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :
मुंबईच्या चर्चगेट स्थानकाला भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. येथील केकच्या दुकानाला आग लागली. या घटनेमुळे स्थानकावर सर्वत्र मोठ्या प्रमाणात धूर पसरला आहे. अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू होता.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचे समजते. चर्चगेट स्टेशन हे वर्दळीचे स्थानक असून मोठ्या प्रमाणात गर्दी असते. अशा ठिकाणी आग लागल्याने एकच खळबळ उडाली. परंतु अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थाळ गाठून शर्थीचे प्रयत्न करीत आगीला आटोक्यात आणले.

# राज्यातील ९०३ योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द

### फडणवीस सरकारचा धाडसी निर्णय : ३ वर्षांपासून रखडली होती अंमलबजावणी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :
राज्याच्या तिजोरीवर माझी लाडकी बहीण योजनेचा ताण पडत असल्याच्या बातम्या चर्चेत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने राज्यभरातील ९०३ योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे.

या योजनांची मागील ३ वर्षांपासून वेगवेगळ्या कारणांमुळे अंमलबजावणी होत नव्हती. परिणामी, सरकारने या योजनाच गुंडाळण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे.

राज्यातील ९०३ विकास योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आली आहे. भूसंपादनाच्या अडचणी, स्थानिकांचा विरोध तथा ठेकेदारांकडून मिळणारे असहकार्य यामुळे या योजनांवरील अंमलबजावणी रखडली होती. त्यामुळे सरकारने या योजनांना वाढीव मुदत देण्यापेक्षा थेट त्यांची प्रशासकीय मान्यताच रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. लघुपाटबंधारे योजना, कोअर पाझर बंधारे, पाझर तलाव, साठवण तलाव दुरुस्ती आदी योजनांचा यात समावेश आहे.

**अर्धवट योजनांमुळे निधी अडकून पडतो**

रद्द करण्यात आलेल्या सर्व योजना मागील ३ वर्षांपासून रखडल्या होत्या. शासनाच्या या निर्णयामुळे निधीचा गैरवापर टाळण्यास मदत होईल. विशेषतः नव्या योजनांचा मार्गही यामुळे मोकळा होईल. राज्य सरकार विकासासाठी प्रयत्नशील आहे. पण अर्धवट राहिलेल्या योजनांमुळे निधी अडकून पडतो. तसेच त्याचा कोणताही लाभ जनतेपर्यंत पोहोचत नाही.

त्यामुळे अशा अडगळीत पडलेल्या योजना रद्द करून नव्याने कार्यक्षम योजना राबवण्याचा सरकारचा निर्णय अत्यंत धाडसी असल्याचे मानले जात आहे. आता सरकार या निर्णयाचा जिल्हा व तालुका पातळीवर काय परिणाम पडेल? याची चाचपणी करत आहे.

**लाडकी बहीण योजनेमुळे सरकारी तिजोरीवर ताण**

राज्यात गत काही महिन्यांपासून लाडकी बहीण योजनेचा तान सरकारी तिजोरीवर पडण्याची चर्चा सुरू आहे. या योजनेसाठी विविध खात्यांचा निधी वळवला जात आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने ९०३ योजना गुंडाळण्याचा निर्णय घेतल्यामुळे यामागे लाडकी बहीण योजनेचे कारण आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच लाडकी बहीण योजनेसाठी कोणत्याही योजनांचा निधी वळवला जात नसल्याचा दावा केला जात आहे. लाडकी बहीण योजनेसाठी निधी वळल्याचा आरोप अतिशय चुकीचा व खोटा आहे. अर्थसंकल्पाची पद्धती ज्यांना कळत नाही, तेच अशाप्रकारे आरोप करतात, असेही सीएम फडणवीस म्हणाले होते.

## डीपीडीसी बैठकीत राडा

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ५ :
अकोला जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीदरम्यान मोठा राडा झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी भाजपचे आमदार रणधीर सावरकर आणि शिवसेना ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. या वादानंतर बैठकीत तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

बैठकीनंतर दोन्ही लोकप्रतिनिधींचे कार्यकर्ते आमने-सामने आल्याचे पाहायला मिळाले. जिल्ह्याच्या डीपीडीसीच्या बैठकीतच राडा झाल्याने या घटनेची सध्या जोरदार चर्चा होत आहे. अकोला जिल्हा नियोजन समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडत होती.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री आकाश फुंडकर हे होते. यावेळी चर्चेदरम्यान दलित वस्ती सुधार योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात प्रश्न उपस्थित करताना ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख बोलत होते. दरम्यान, भाजपचे आमदार रणधीर सावरकर मध्येच बोलले. यावरून दोन्ही आमदारांमध्ये वाद निर्माण होऊन शाब्दिक चकमक झाली.

आमदार रणधीर सावकर आणि आमदार नितीन देशमुख यांच्यात बाचाबाची झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर दोघांचे कार्यकर्ते आमने-सामने आले. यावेळी दोन्ही नेत्यांचे कार्यकर्ते एकमेकांवर धावून गेले. दोन्ही गटाकडून एकमेकांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

## समृद्धीतून मलिदा खाल्ला

### काँग्रेसचे आरोप, श्वेतपत्रिका काढण्याची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या बगलबच्च्यांनी समृद्धी महामार्गाच्या कामात मोठा मलिदा खाल्लृयाचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.



या प्रकल्पात एक-दोन नव्हे तर तब्बल १५ हजार कोटींचा भ्रष्टाचार झाला आहे. या भ्रष्टाचाराच्या पैशांतून ५० खोके एकदम ओकेचा कार्यक्रम राबवण्यात आला म्हणजे शिवसेना फोडण्यात आली, असे ते म्हणालेत. या प्रकरणी त्यांनी सरकारकडे श्वेतपत्रिका जारी करण्याची मागणी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज समृद्धी महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याचे लोकार्पण करण्यात आले. या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या प्रकल्पाची श्वेतपत्रिका काढण्याची मागणी केली आहे. ते म्हणाले, समृद्धी महामार्गाच्या उद्घाटनाच्या कोनशिलेचे अनावरण करतानाच या सरकारने या प्रकल्पाची श्वेतपत्रिका सादर केली अधिक बरे होईल.

याचे कारण असे की, यात मोठा भ्रष्टाचार झाला आहे. हा प्रकल्प सुरूवातीला ५५ हजार कोटींचा होता. पण शेवटी तो ७० हजार कोटींचा झाला. भाईंदरच्या बोगद्यात ३ हजार कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचे सुप्रीम कोर्टात सिद्ध झाले. त्यामुळे श्वेतपत्रिका प्रसिद्ध झाली तर समृद्धी महामार्गातही १५ हजार कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचे समोर आल्याशिवाय राहणार नाही.

समृद्धी महामार्गाच्याच पैशांतून ५० खोके एकदम ओकेचा कार्यक्रमही राबवण्यात आला आहे. एकंदरीत हे एक कटबोळ आहे. या कटबोळाने समृद्धी महामार्गापेक्षा मोठा भ्रष्टाचाराचा महामार्ग यांनी उघडा केला. हा समृद्धीचा नव्हे तर भ्रष्टाचाराचा महामार्ग किंवा धंदा आहे. आता त्याचा पदार्फाश करण्याची वेळ आल्याचे सपकाळ म्हणाले.

## कुर्बानीला विरोध करणाऱ्यांवर कारवाई करा : आझमी



**मुंबई :** मुस्लीम धर्मियांचा बकरी ईद सण काही दिवसांवर आला असून बजरंग दलाचे कार्यकर्ते मुस्लीम इलाख्यात फिरुन कुर्बानी करु देणार नसल्याचे जाहीर सांगत आहेत. हत्यारांच्या जोरावर दहशत माजवणाऱ्या या समाजविघातक घटकांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी समाजवादी पक्षाचे आमदार व प्रदेशाध्यक्ष अबु आझमी यांनी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पोलीस महासंचालक संजय वर्मा यांना आमदार आझमी यांनी बुधवारी यासंदर्भात निवेदन दिले आहे. नांदेड जिल्ह्यातील धमार्बाद येथे बजरंग दलाने कुबार्नीला विरोध चालवला आहे. ७ जून रोजी बकरी ईद आहे. या दिवशी बकऱ्याची कुर्बानी देण्याची मुस्लीम धर्मियांची प्रथा आहे. राज्यात गोवंशाच्या हत्येस बंदी आहे. मात्र बकऱ्याच्या कुर्बानीला विरोध करणे बेकायदा असून दहशत माजवणाऱ्या या प्रवृत्तींना अटकाव करावा. बकरी ईद सण दोन दिवसांवर आला आहे. समाजविघातक घटक राज्यातील कायदा व सुव्यस्था बिघडवण्याच्या प्रयत्नात आहेत. त्या पार्श्वभूमीवर राज्यात चोख बंदोबस्त ठेवावा, अशी मागणी आमदार आझमी यांनी केली आहे.

## वाटोळे करणाऱ्याच्या हाती मुंबई मनपा जाणार नाही



**मुंबई :** शिवसेना- भाजपच्या ताब्यात राहील आणि आमचा भगवा तिथे फडकेल, असे शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट यांनी स्पष्ट केले आहे. तर मुंबईचे वाटोळे करणाऱ्याच्या हाती आता मुंबई राहणार नाही. उबाठावाल्याचे आपली मुंबई आता गुजरातमध्ये जाणार महाराष्ट्रापासून तुटणार हे वाक्य अजून बाकी असल्याचा टोलाही त्यांनी लगावला आहे. भाजप शिंदेसेनेत मुंबई मनपात मोठा भाऊ कोण, अशी चर्चा सुरू झाली आहे. याबाबत शिरसाट म्हणाले की, निवडणुकीच्या काळात राजकीय पक्ष सव्हेर्चा अहवाल आणतात. विधानसभेला ८० टक्के सर्व्हे चुकीचे निघाले. त्यामुळे मुंबई महापालिकेत कोण छोटा भाऊ आणि कोण मोठा भाऊ अजून ठरलेले नाही.

संजय शिरसाट म्हणाले की, येत्या सोमवारपासून जे काही मोठे कार्यकर्ते आहेत, अनेक चांगले पदाधिकारी हे उबाठाच्या कार्यपद्धतील कंटाळले आहेत तिथे त्यांना विचारले जात नाही, असे अनेकि लोक आहेत ते शिवसेनेमध्ये प्रवेश करत आहेत. आमचे टायगर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात हे प्रवेश सुरू आहेत. आमची ही प्रकिया जोमात सुरू होणार आहे.

## सर्व आरोप धादांत खोटे



**पुणे :** शशांक हगवणेचे मामा आयपीएस अधिकारी डॉ. जालिंदर सुपेकर यांच्याव आरोपांची मालिक सुरूच आहे. जालिंदर सुपेकर यांनी विशेष महानिरीक्षक (कारागृह) या पदावर कार्यरत असताना अमरावतीत कारागृहातील कैद्याकडे ५५० कोटी रुपये मागितल्याचा आरोप कैद्याच्या वकिलांकडून करण्यात आला आहे. या आरोपावर सुपेकर यांनी प्रतिक्रिया दिली असून सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. आरोप केवळ आणि केवळ आमच्या बदनामीसाठी केले जात असल्याचे सुपेकर म्हणाले.

पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणानंतर चर्चेत आलेले वरीष्ठ पोलिस अधिकारी जालिंदर सुपेकर यांच्या भ्रष्टाचार आणि पैसे हडपल्याचा आरोप करण्यात आला आहे. जालिंदर सुपेकर यांनी अमरावती तुरूंगात असलेल्या कैद्यांकडून जामीन मिळवून देण्याच्या मोबदल्यात ५५० कोटी रुपये मागितल्याचा आरोप ॲड. निवृत्ती कराड यांनी केला आहे. गायकवाड यांचे बँक लॉकर्समधील सोने आणि रोख रक्कम जप्त करताना सुपेकर आणि पुण्याचे तत्कालीन पोलिस आयुक्त अमिताभ गुप्ता यांनी १०० ते १५० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप देखील ॲड. कराड यांनी केला आहे. या सर्व आरोपांवर जालिंदर सुपेकर यांनी स्पष्टीकरण दिले आहे.

कारागृह वरिष्ठ अधिकारी म्हणून राज्यातील विविध ठिकाणच्या जेलला भेट देऊन आढावा घेणे जबाबदारी असते. अशीच भेट आम्ही अमरावती जेलला दिली होती. कोणत्याही बंदीवानांनी आम्हाला ओळखणे, त्यांच्याशी बोलणे संविधानिक नाही. मात्र, तरीही अमुक-तमूक आरोपीला भेटलो, बोललो, पैशांची मागणी केली, असे निरर्थक आरोप केले जात असल्याचे ते म्हणाले.

### जलसंधारणाच्या नव्या युगाची सुरुवात : संजय राठोड यांची मोठी घोषणा

# १२६७ रखडलेली कामे रद्द

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :** राज्यातील जलसंधारण कामकाज अधिक प्रभावी, पारदर्शक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सुधारित बृहत आराखडा तयार केला जाणार असून त्यासाठी पुणे येथे दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले जाणार आहे, अशी घोषणा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी आज केली. याचबरोबर सन २००० पासून रखडलेली १२६७ कामे रद्द करण्याचा निर्णायक निर्णयही यावेळी घेण्यात आला.

मंत्रालयात झालेल्या विभागीय आढावा बैठकीत राठोड यांनी जलतज्ज्ञ, अभियंते आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा निर्णय घेतला. त्यांनी स्पष्ट केले की, ह्लजलसंधारण विभाग हा ग्रामीण भागाचा कणा आहे आणि तांत्रिक नवकल्पनांचा वापर करून आपण या विभागाला अधिक सक्षम बनवणार आहोत.

**बृहतर आराखड्यासाठी २ दिवसांची कार्यशाळा**

पुण्यात होणाऱ्या कार्यशाळेत जलतज्ज्ञ, तांत्रिक अधिकारी, योजनाकार सहभागी होणार असून, जलसंधारणातील संपूर्ण कामांचा आढावा घेत सुधारित आराखडा तयार करण्यात येणार आहे. या कार्यशाळेत विभागातर्फे भविष्यातील योजना, तांत्रिक सुधारणा, आर्थिक नियोजन आदी बाबींचा समावेश असणार आहे.



संजय राठोड यांनी सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या आणि अपूर्ण प्रकल्पांमुळे विभागावर मोठे आर्थिक दायित्व निर्माण झाले होते. त्यामुळेच ८७२ प्रकल्प जलसंधारण विभागाचे तर ३९५ महामंडळाचे असे एकूण १२६७ प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत. यामुळे विभागाची आर्थिक जबाबदारी लक्षणीयरीत्या कमी होणार आहे.

राज्यातील जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार आदी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी जिल्हानिहाय व राज्यस्तरावरील माहिती पुस्तिका प्रकाशित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

यामध्ये यशोगाथा, सद्यस्थिती व प्रगतीपथावरील प्रकल्पांची माहिती असेल. पावसाअभावी भागात मामा तलाव, अमृत सरोवर, व झरे यांचे बळकटीकरण हे प्राधान्यक्रमात असतील. प्रत्येक विभागात पायलट प्रकल्प म्हणून पाच झऱ्यांची तपासणी होणार असून त्यासाठी स्थानिक पातळीवर पाहणी करण्याचे आदेशही देण्यात आले.

जलसंधारण अधिकाऱ्यांऐवजी जलसंधारण अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता आणि उपअभियंता अशी पदनामावली निश्चित करण्याचा प्रस्तावही तातडीने सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

या सर्व निर्णयांमुळे जलसंधारण विभागात कार्यक्षमता, पारदर्शकता आणि गती निर्माण होणार असल्याचे स्पष्ट करत मंत्री संजय राठोड यांनी राज्यभरातील सर्व कामांची स्वतः प्रत्येक जिल्ह्यात जावून पाहणी करण्याची तयारी दर्शवली आहे. यावेळी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## इच्छा असेल तर त्यांनी एकमेकांना फोन करावा..



**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि उद्धव ठाकरे गट एकत्र येण्याची चर्चा सुरु आहे. या बाबत मनसे नेते अमित ठाकरे यांनी थेट उद्धव ठाकरे यांना सल्ला दिला आहे. त्यांना युती करायची असेल तर उद्धव ठाकरेंनी फोन करावा. मीडियात किंवा वृत्तपत्रात बोलून युती होत नसल्याचे अमित ठाकरे यांनी म्हटले आहे.

या संदर्भात पत्रकारांशी बोलताना अमित ठाकरे यांनी त्यांच्या बाजूने भूमिका स्पष्ट केली आहे. सध्या मीडियात दोन भाऊ - दोन भाऊ असे बोलले जात आहे. मात्र, यात युतीसंदर्भात त्या दोन भावांनी बोलायला हवे. खालील नेत्यांपैकी कोणी कितीही बोलून काही उपयोग होणार नाही. मी २०१६ -१७ किंवा कोविड काळात देखील हे बघितले आहे. त्यावेळी राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांना पहिला फोन केला होता. कोरोना हे भयंकर संकट आहे. कोणतेही सरकार असो आपण त्यांची साथ द्यायला हवी, असे राज ठाकरे यांनी म्हटले होते. मात्र, आता केवळ वर्तमानपत्रात बोलून अशा युती नसल्याचे अमित ठाकरे यांनी म्हटले आहे.

वृत्तपत्रातून किंवा माध्यमांतून कोणत्याही दोन पक्षांमध्ये युती होत नाही. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांचे पुत्र तथा मनसे नेते अमित ठाकरे यांनी या बाबत आपली भूमिका स्पष्ट केली. या दोघांनी एकत्र येण्यास आमची काहीही हरकत नाही. दोघ भाऊ एकत्र येण्यात मला काहीही इशू नाही. मात्र त्या दोन भावांनी बोलला पाहिजे, असे देखील अमित ठाकरे यांनी म्हटले आहे.

## आदित्य ठाकरेची मनसेला साद



**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :** उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या आधी एकत्र येणार असल्याची चर्चा जोर धरत आहे. स्वतः उद्धव ठाकरे, संजय राऊत यांच्यासह आता आदित्य ठाकरे यांनी देखील याबाबत मनसेला साद घातली आहे. त्यामुळे आता याबाबत मनसेच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मात्र, मनसे अजूनही सावध भूमिकेत आहेत. याबाबत सावधतेने आणि हळूहळू पावले टाकण्याचे मनसेचे प्रयत्न दिसून येत आहे. त्यातच या युती बाबत मनसे देखील सकारात्मक असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतील युती बाबत आम्हाला देखील माध्यमांमधूनच कळत आहे. तसा युतीचा कोणताही प्रस्ताव शिवसेनेकडून आमच्याकडे आलेला नसल्याचे मनसेचे नेते यशवंत किल्लेदार यांनी म्हटले आहे. तसा प्रस्ताव आला तर त्यावर राज ठाकरे भूमिका घेतील. मात्र माध्यमातून असे प्रस्ताव येत नसतात. या आधी आमचे हात पोळलेले आहेत. त्यामुळे 'हात पोळल्यानंतर ताक सुद्धा फुंकुन' प्यावे असे म्हणतात. त्यातलाच हा एक भाग आहे. त्यामुळेच आम्ही सावध भूमिका घेत असल्याचे किल्लेदार यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी केलेल्या सूचक वक्तव्यानंतर उद्धव सेना व मनसेतील संभाव्य युतीच्या चर्चांनी आणखीनच जोर धरला आहे.

खासदार संजय राऊतही दोन बंधू एकत्र येतील, असे संकेत देत आहेत. या पार्श्वभूमीवर आता उद्धव ठाकरे यांचे पुत्र व युवा नेते आदित्य ठाकरे यांनीही मनसेला सोबत येण्याची साद घातली आहे. महाराष्ट्राच्या हितासाठी आम्ही कोणत्याही पक्षाबरोबर एकत्र येण्यास तयार आहोत. म्हणूनच आम्ही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला साद दिली असल्याचे आदित्य ठाकरे यांनी स्पष्टपणे सांगितले.

आदित्य ठाकरे म्हणाले की, मराठी माणूस व महाराष्ट्राच्या हितासाठी जो कोणी आमच्याबरोबर यायला तयार असेल आम्ही त्यांना बरोबर घेऊन महाराष्ट्र हितासाठी लढत राहू. काल परवा आमचे नेते दीपेश म्हात्रे व मनसेचे नेते राजू पाटील यांनी एकत्र येऊन आंदोलन केले. हे त्याचेच उदाहरण आहे. मात्र, महाराष्ट्राचे हित म्हणजे नेमके काय, हे आदित्य यांनी सांगितले नाही. यापूर्वी आमदार अनिल परब, अंबादास दानवे, सुनील प्रभू यांनीही युती बाबत अनुकूलता दर्शवली आहे. दुसरीकडे, मनसेच्या दुसऱ्या फळीतील काही नेते या युती बाबत फारसे उत्साही दिसत नाहीत.

## आपल्यासोबतच राहणार कोरोना

### आरोग्यमंत्र्यांच्या सूचना

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :** राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, गुरुवारी महाराष्ट्रात १०५ नवीन रुग्णांची नोंद झाली असून ३ नवीन बाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. यासोबतच राज्यातील सक्रिय कोविडबाधित रुग्णांची संख्या ५२६ वर पोहोचली आहे.

वाढत्या कोविड रुग्णांच्या पार्श्वभूमीवर राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी प्रशासनाला महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. कोरोना आपल्यासोबतच राहणार, लोकांना पॅनिक होऊ देऊ नका, अशा सूचना आरोग्यमंत्र्यांनी केल्या आहेत. महाराष्ट्रात सर्वाधिक सक्रिय रुग्णसंख्या असलेला जिल्हा पुणे आहे, याठिकाणी ४१ सक्रिय रुग्ण आहेत. त्यानंतर मुंबई (३२), ठाणे (१५), नवी मुंबई (९), सातारा (५) आणि नाशिक, संभाजीनगर आणि नागपूर येथे प्रत्येकी एक रुग्ण आढळला आहे.

आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी वाढत्या कोरोना रुग्णसंखेवर प्रशासनाला महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. पुन्हा एकदा कोरोना रुग्णसंखेत वाढ होत असली तरी जनतेने घाबरून जाऊ नये असे आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. या आधी देखील सांगितला आहे, कोरोना वाढला तरी काळजीची गरज नाही. कोरोना आपल्या सोबतच राहणार आहे. आता आपली प्रतिकारशक्ती ही वाढली आहे.

## ट्रॅव्हल्स उलटली, 30 जखमी

**■ वृत्तसंस्था, सोलापूर, दि. ५ :** सोलापूर - पुणे महामार्गावर आढेगाव शिवारात बस चालकाला झोप लागल्यामुळे एक खासगी बस खड्यात उलटली. गुरुवारी पहाटे ४ च्या सुमारास हा मोठा अपघात झाला. या अपघातात पुणे व मराठवाड्यातील तब्बल ३० प्रवाशी जखमी झालेत. त्यापैकी २० जण गंभीर जखमी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

अपघातग्रस्त बस (एमएच ४८ के १९१८) ही बुधवारी रात्री उशिरा लातूरच्या शिरपूर येथून पुण्याच्या दिशेने निघाली होती. सोलापूर पुणे महामार्गावरील आढेगाव शिवारात ती भरधाव वेगात खड्ड्यात उलटली. यावेळी मोठा आवाज झाला.



हा आवाज ऐकूण आसपासच्या लोकांनी व इतर वाहनचालकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तत्काळ जखमींना रुग्णालयात पोहोचवले. माहिती पोलिसांना दिल्यानंतर पोलीस ही तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## भाजप एकनाथ शिंदेंचा पक्ष फोडण्याच्या प्रयत्नात..

### संजय राऊत यांचा आरोप



**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :** भारतात पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या काळात अराजक माजवले जात आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी ज्या अराजकाचा इशारा दिला होता, त्याची सुरूवात मोदी - शहांच्या काळात झाली आहे, असा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी गुरूवारी केला.

भाजप एकनाथ शिंदेंचा पक्ष फोडण्याच्या प्रयत्नांत असल्याचे नमूद करत राऊत यांनी यावेळी शिंदेंचे ६ खासदार भाजपत, तर २२ आमदार अजित पवार गटाच्या वाटेवर असल्याचाही दावा केला.

संजय राऊत यांनी गुरूवारी सकाळी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी एकनाथ शिंदे, सुधाकर बडगुजर यांच्यावरील कारवाई, मुंबईवरील अदानींचे कथित आक्रमण तथा राज व उद्धव ठाकरे यांची संभाव्य युती आदी विविध मुद्यांवर प्रकाश टाकला.

ते म्हणाले, पैशाच्या जोरावर माणसांना पक्षांतर करण्यास भाग पाडणे, याला कुणीही आऊटगोइंग किंवा इनकमिंग सारख्या शब्दांची उपमा देऊ नये. मी मागेही म्हणालो. आमच्याकडे ईडी व सीबीआयवाले केवळ २ तास आले, तर या राज्याच्या मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांपासून संपूर्ण भाजपमधून ९० टक्के आऊटगोइंग होईल. पण त्याला तुम्ही वैचारिक पक्षांतर म्हणू शकत नाही. कुणी तसे म्हणत असेल तर ते पूर्णतः चुकीचे आहे. कुणाला जायचे आणि कुणाला थांबायचे हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न असतो. पण पक्षात राहून तुम्ही पक्षाविरोधात कारवाया कराल, तर तुमच्यावर कारवाई केली जाईल. उद्धव बाळासाहेब ठाकरे हे ज्या शिवसेनेचे प्रमुख आहेत आणि जो बाळासाहेबांचा पक्ष आहे, तो पक्ष कोणत्याही प्रकारचा दबाव व ब्लॅकमेलिंग सहन करणार नाही.

## आयटी अभियंता तरुणीची २१ व्या मजल्यावरून उडी घेत आत्महत्या

**■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ५ :** पुण्यातील हिंजवडी भागात आयटी क्षेत्रात कार्यरत एका २५ वर्षीय तरुणीने २१ व्या मजल्यावरून उडी घेत आत्महत्या केली. माझी जगायची इच्छा संपली आहे, अशी चिठ्ठी लिहून या तरुणीने आपले आयुष्य संपवले.

अभिलाषा भाऊसाहेब कोथंबिरे (२५) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. ती आयटी अभियंता म्हणून हिंजवडी आयटी पार्कमधील एका खासगी कंपनीत कार्यरत होती. तिची एक मैत्रीण द क्राऊन ग्रीन सोसायटीमध्ये राहत होती. पहाटे अभिलाषा दुचाकीवरून द क्राऊन ग्रीन या सोसायटीत आली. लिफ्टने ती थेट २१ व्या मजल्यावर गेली. पहाटे सुमारे ४.४५ च्या सुमारास तिने उडी मारून जीवन संपवले.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात पाठवण्यात आला असून, तपास सुरू आहे.

## लाडक्या बहिणींना मे महिन्याचे १५०० रूपये मिळण्यास सुरूवात

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेंतर्गत मे महिन्याचा हप्ता वितरणास सुरूवात केली आहे. राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी स्वतः ही माहिती दिली आहे. त्यामुळे महिलांना योजनेचा ११ वा हप्ता केव्हा मिळणार? हा प्रश्न निकाली निघाला आहे.

महायुती सरकारने गतवर्षी जुलै महिन्यात विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली होती. तेव्हापासून आतापर्यंत महिलांना १० हप्ते मिळालेत. पण मे महिना संपला तरी अद्याप महिलांना ११ वा हप्ता मिळाला नव्हता. पण आता हा हप्ता जमा होण्यास सुरुवात झाली आहे. लाभार्थी महिलांना तसे मेसेज मिळण्यास सुरूवात झाली आहे.

राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी बुधवारी रात्रीच एका पोस्टद्वारे मे महिन्याचा हप्ता वितरित करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचे सांगितले होते.

त्या म्हणाल्या होत्या की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना मे महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याची तांत्रिक प्रक्रिया आजपासून सुरू करण्यात आली आहे. योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार लिंक्ड बँक खात्यात उद्यापासून हा सन्मान निधी जमा होणार आहे.

महायुती सरकारचा दृढ निश्चय, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन व महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींचा दृढ विश्वास या बळावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची दमदार वाटचाल यापुढेही अशीच सुरू राहणार हा मला विश्वास आहे, असे त्या म्हणाल्या.

**आधार कार्ड लिंक असलेल्या खात्यांत जमा होणार पैसे**

अदिती तटकरे यांच्या माहितीनुसार, लाडकी बहीण योजनेचा निधी आधार कार्ड लिंक असलेल्या बँक खात्यात जमा होत आहेत. त्यामुळे एखाद्या लाभार्थी महिलेला पैसे जमा झाल्याचा मेसेज आपला नसेल तर त्यांनी बँकेत जाणून आपल्या खात्याची स्थिती जाणून घ्यावी.

संबंधित बँकेचे ॲप असेल तर त्यातही त्यांना हा निधी जमा झाला किंवा नाही हे पाहता येईल. तूर्त या योजनेतील लाभार्थ्यांची संख्या लाखांत असल्यामुळे सर्वांच्या खात्यात पैसे जमा होण्यास ३-४ दिवसांचा कालावधी लागतो. त्यामुळे आज तुमच्या पैसे आले नसतील तर तुम्हाला पुढील एक-दोन दिवस वाट पहावी लागेल.

# कामगारांच्या न्यायासाठी मंत्री थेट जनता दरबारात!

### ॲड. आकाश फुंडकर यांनी ऐकल्या तक्रारी, तातडीने तोडगा काढण्याची ग्वाही

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :** राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित केलेल्या जनता दरबारात थेट जनतेच्या आणि कामगार संघटनांच्या तक्रारी ऐकून घेतल्या.

राज्यभरातून आलेल्या कामगार संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येने या दरबारात सहभागी झाले. या संवादादरम्यान कामगारांनी मांडलेल्या समस्या समजून घेत तातडीने बैठका घेऊन निराकरण करण्याचे आश्वासन मंत्री फुंडकर यांनी दिले.

या जनता दरबारात कामगार कायद्यांशी संबंधित अनेक विषयांवरही सविस्तर चर्चा झाली. विविध क्षेत्रातील कामगारांसमोर उभ्या असलेल्या अडचणी, पेन्शन, वेतन, स्थायीकरण, कामगार सुरक्षा यांसारख्या विषयांवर मंत्री



फुंडकर यांनी सजगपणे चर्चा केली आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या कार्यवाहीचे निर्देश दिले.

सामान्य कामगारांपासून ते संघटनांच्या प्रतिनिधींना न्याय मिळवून देणे हे माझे प्राधान्य आहे. सरकारी यंत्रणांनी संवेदनशीलतेने काम करणे गरजेचे आहे, असे फुंडकर म्हणाले. जनता दरबार हा संवादाचा सेतू आहे आणि हा उपक्रम नियमितपणे राबवला जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या उपक्रमासाठी प्रेरणा आणि पाठींबा दिल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांचे कामगार मंत्री फुंडकर यांनी आभार मानले. जनता दरबाराचे आयोजन प्रभावीपणे पार पाडल्याबद्दल भाजप प्रदेश समन्वयक सुधीर देऊळगावकर यांचेही त्यांनी उल्लेख केला.

महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

# अपघातातील जखमी शुभम दुतोंडे यांचा उपचारादरम्यान मृत्यू



**खामगाव (का.प्र.):** दुचाकी अपघातात गंभीर जखमी झालेला सुटाळा बु. येथील शुभम दुतोंडे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सुटाळा बु. येथील प्रतिष्ठीत नागरिक रामेश्वर दुतोंडे यांचे चिरंजीव व अँड. पवन दुतोंडे यांचे लहान बंधू शुभम रामेश्वर दुतोंडे हा १ जुन रोजी अकोला येथे एमपीएससी स्पर्धा परिक्षा देण्यासाठी दुचाकीने जात होता. दरम्यान जयपुर लांडे फाट्याजवळील उड्डाणपुलावर चढत असतांना समोरून येणाऱ्या दुचाकीने त्याच्या दुचाकीला जबर धडक दिली. या अपघातात शुभम दुतोंडे गंभीर जखमी झाला होता. त्यामुळे त्याला त्वरीत अकोला येथील रुग्णालयात भरती करण्यात आले होते. उपचारादरम्यान काल ४ जून रोजी सायंकाळी त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या अकाली निधनाने सुटाळा परिसरात शोककळा पसरली आहे

# बकरी ईद सौहार्दपूर्ण वातावरणात साजरा करा - जिल्हाधिकारी

## * गोवंश प्राण्यांची अवैध तस्करी होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी
## * जनावरांची वाहतूकीपुर्वी स्वास्थ्य तपासणी करून प्रमाणपत्र द्यावे

**बुलडाणा (जिमाका):** येत्या ७ जून रोजी बकरी ईद सण जिल्ह्यात उत्सहात साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी शांतता व सौहार्दपूर्ण वातावरणात सण साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात शांतता, सलोखा व सामाजिक ऐक्य अबाधित राखण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात शांतता समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीस पोलीस अधीक्षक निलेश ताबें, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुधीर खांदे, अपर पोलीस अधिक्षक बि.बि. महामूनी, निवासी उपजिल्हाधिकारी सुहासिनी गोणेवार, उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसिलदार, पोलीस अधिकारी व विविध विभागांचे अधिकारी तसेच धर्मगुरू, सामाजिक संघटना प्रतिनिधी आदी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, बकरी ईद सणाच्या निमित्ताने जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात जनावरांची वाहतुक करण्यात येते. याप्रसंगी पशुसंवर्धन विभागाने जनावरांची वाहतूकीपुर्वी स्वास्थ्य तपासणी करून प्रमाणपत्र द्यावे. पशुसंवर्धन विभागाने पोलीस विभागाच्या समन्वयाने जनावरांसाठी सुरक्षितता निर्माण करून जिल्ह्यात गोवंश प्राण्यांची अवैध तस्करी होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. जनावरांची अवैध वाहतुक आढळल्यास तसेच प्राणी क्लेश प्रतिबंध कायद्याचे पालन न झाल्यास त्वरीत पोलीसांना सूचित करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

बकरी ईद उत्सवाच्या दरम्यान ग्रामीण व नागरी वस्तीमधील विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही, यांची खबरदारी घ्यावी. बाजारपेठ, कत्तलखाणे व इत्तर ठिकाणी स्वच्छता राहिल यांची दक्षता नगरपालिका व संबधितांनी घ्यावी, असे सूचना यावेळी दिल्या. तसेच सण उत्सवाच्या काळामध्ये समाजमाध्यमावर काही समाजकंठकाकडून धार्मिक तेढ निर्माण होणारे संदेश पसरवितात. अशा अफवावर विश्वास न ठेवता संदेश पसरविणाऱ्या व्यक्तीची माहिती पोलिसाकडे कळविण्याचे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले. पोलीस विभागाने शहर व गावांमध्ये बंदोबस्त योजना आखली असून, चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. तसेच राज्यात संपूर्ण गोवंश हत्याबंदी कायदा लागू असून या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी व्हावी. वाहतूक करताना महाराष्ट्र मोटार वाहन कायद्याचे पालन व्हावे. कोणतीही अवैध कत्तल किंवा वाहतूक होऊ नये. धर्मगुरूंनी समाजात शांतता व बंधुभाव कायम ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन पो.अ.निलेश तांबे यांनी केले. तसेच सोशल मीडियावर अफवा पसरविणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. बकरी ईदच्या दिवशी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही यासाठी आवश्यक उपाययोजना आणि समन्वय साधण्याबाबत शातंता समिती सभामध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. विविध प्रतिनिधींनी आपले विचार मांडत शांततेत व सलोख्यात बकरी ईद साजरी करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त २५ रक्तदात्यांचे रक्तदान

**देऊळगाव राजा (महासागर प्रतिनिधी) :** माजी उपमुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त त्यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच सामाजिक बांधिलकी जपत आयोजित रक्तदान शिबिरात २५ जणांनी रक्तदान केले.

या उपक्रमात अनेक युवकांनी सहभाग नोंदवत समाजसेवेचा वसा पुढे नेण्याचा संकल्प केला. आयोजकांनी सांगितले की, "गोपीनाथ मुंडे हे गरीब व वंचित वर्गाच्या साठी नेहमीच झटत होते. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त असे उपक्रम राबवणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली होय."स्वर्गीय गोपीनाथ मुंडे हे महाराष्ट्रातील खेड्यातून पुढे आलेले लोकप्रिय नेते होते त्यांनी महाराष्ट्राचे ऊपमुख्यमंत्री पद भूषवले तसेच केंद्रीय सरकारमध्ये ग्रामीण विकास मंत्री म्हणून काम पाहिले समाजातील शेवटचे घटकांसाठी काम करणे शिक्षण आरोग्य आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणे यावर त्यांचा विशेष भर होता. तळागाळातील जनतेत त्यांची लोकप्रियता अफाट होती. यावेळी रक्तदाते अरुण कुटे, कैलास राऊत



,संदीप राऊत, गणेश आंधळे, संजय आंधळे, अमोल बोबडे, गणेश जायभाये, ऋषी जोशी ,संदीप जायभाये, संतोष वाघ, नाईक साहेब, लक्ष्मण आंधळे, तेजराव मामा मुंडे, राम पालवे, विवेक डोईफोडे, रवींद्र कुटे, सचिन नागरे, गणेश शांताराम मुंडे, सतीश रघुनाथ नागरे,बिस्मिल्ला खाँ पठाण, राम मामा मुंडे, स्वप्नील शहाणे, अमोल मुंडे, संदीप भाऊ मतदान का पठाण अरुण भाऊ कुटे,नारायण मुंडे सरपंच नारायण खेड, धर्मराज किल्लारे, सूत्रसंचालन अमोल बोबडे आभार प्रदर्शन संजय आंधळे यांनी केले .

# शेगाव पंचायत समिती प्रभारी गट विकास अधिकारी पदी डॉ सुरेशे

## शिवसेनेच्या वतीने सत्कार

**शेगाव (महासागर प्रतिनिधी):** शेगाव पंचायत समितीत आज एक महत्त्वपूर्ण प्रशासकीय बदल घडून आला. सहाय्यक गट विकास अधिकारी डॉ. रवींद्र तुकाराम सुरूशे यांनी गट विकास अधिकारी या पदाचा अधिकृत कार्यभार स्वीकारला.

निमित्ताने त्यांचा शिवसेना शेगाव तालुका प्रमुख रामा पाटील थारकर यांच्या हस्ते औपचारिक सत्कारही करण्यात आला.

सत्कार कार्यक्रम प्रसंगी भगवत उन्हाळे यांचीही उपस्थिती होती. यावेळी डॉ. सुरूशे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "शेगाव तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी पारदर्शक, गतिमान व लोकाभिमुख प्रशासन देण्याचा माझा प्रयत्न राहील. शेती, आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण विकास यावर विशेष भर दिला जाईल."



ग्रामपंचायतीपासून तालुका स्तरापर्यंत स्थानिक पातळीवरील योजनांच्या अंमलबजावणीत डॉ. सुरूशे यांचा अनुभव उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा स्थानिक प्रशासन व जनतेकडून व्यक्त केली जात आहे.

या प्रसंगी शिवसेना तालुका प्रमुख रामा पाटील थारकर यांनी त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देत सांगितले की, "डॉ. सुरूशे हे कार्यक्षम अधिकारी असून तालुक्याचा विकास त्यांच्या कार्यकाळात निश्चितपणे वेग घेईल."

# प्रमाणित बियाणे वितरण व पीक प्रात्यक्षिकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)–** खरीप हंगामासाठी जिल्ह्याला लक्षांक प्राप्त झाला आहे. या योजनेंतर्गत तूर, मूग, उडीद, कापूस, सोयाबीन आणि तीळ या पिकांसाठी पीक प्रात्यक्षिके व प्रमाणित बियाणे वितरण या घटकांसाठी शेतकरी गट, उत्पादक कंपनी, सहकारी संस्था व वैयक्तिक शेतकरी यांच्याकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. पिक प्रात्याक्षिकामध्ये सहभागी होण्याकरिता ३१ मार्च २०२४ पूर्वी नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, कृषि क्षेत्रात काम करणाऱ्या सहकारी संस्था महाडीबीटी प्रणालीद्वारे अर्ज करू शकतात.

# संग्रामपूर तालुक्याला मिळाले ३ हजार २६८ घरकुलांचे उद्दिष्ट

## ग्रामीण भागातील बेघर गरजूंना मिळाला दिलासा



**संग्रामपूर (महासागर प्रतिनिधी):–** प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत गरजू बेघर लाभार्थ्यांना हक्काचं नवीन घरकुल मिळावं. त्यानुसार ग्रामविकास व पंचायत विभाग राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण महाअवास अंतर्गत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जि. प. बुलढाणा यांच्याकडून जिल्ह्यासाठी ५७ हजार ४७० घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले. असून त्यापैकी ग्रामीणभाग असलेल्या संग्रामपूर तालुक्यासाठी ३ हजार २६८ घरकुलांचे नव्याने उद्दिष्ट मिळाले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील बेघर गरजूंना चांगला दिलासा मिळाला आहे.

ग्रामीण भागातील गरजू बेघर लाभार्थ्यांना नवीन घरकुल मिळावं. व त्यांना हक्काचा निवारा मिळावा. ह्या उद्देशाने केंद्र सरकारने १० वर्षापूर्वी २५ जून २०१५ पासून प्रधानमंत्री आवास योजना सुरू केली आहे. प्रत्येकाला नवीन घर आवश्यक असतं. परंतु अनेक आर्थिक दृष्ट्या गोरगरिबांना घर बांधकाम करणं अवघड जातं आणि घर बांधल्याच जात नाही. त्यामुळे शासनाने ही योजना अमलांत आणली असून पहिल्या टप्प्यात सर्व लाभार्थ्यांना लाभ मिळू शकला नाही. त्यामुळे जिल्ह्यात दुसऱ्यांदा घरकुल बांधकामाचे उद्दिष्ट वाढून मिळाले आहे. त्यात संग्रामपूर तालुक्याला ३ हजार २६८ लाभार्थ्यांसाठी उद्दिष्ट मिळाले. त्यामुळे प्रत्येक लाभार्थी कुटुंबाला प्रतीक्षा यादीप्रमाणे घरकुलाचा लाभ मिळणार आहे. तालुका स्तरावरून ग्रामपंचायत स्तरावर सुद्धा उद्दिष्ट दिलेले आहे. त्याकरीता घरकुल बांधकामासाठी आवश्यक ती कागदपत्रे आणि शासन निर्णयानुसार अटी व शर्तीची पूर्तता करावी लागणार आहे. ह्यासाठी लाभार्थ्यांनी लक्ष देवून ह्या योजनेचा लाभ घ्यावा. असे आवाहन प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जि. प.बुलढाणा व संग्रामपूर पं.स.चे गटविकास अधिकारी माधव पायघन यांनी केले आहे.

# मान्सूनपूर्व अतिवृष्टी शेतीची नुकसान भरपाई त्वरित वाटप करा - शिवसेनेची मागणी

**शेगाव (महासागर प्रतिनिधी):** तालुक्यातील माटरगांव, बेलुरा, बोंडगाव, चिंचखेड, गायगाव, गायगाव खुर्द, चिंचोली, सुवर्णा, शेगाव भुई, वरखेड, उमरखेड, नागझरी, हिंगणा, वैजनाथ, मोरगाव डी, खेरडा, पाळोदी, सगोडा, कालवड, डोलारखेड, वरद, तिवानं आणि बोंडगाव या गावांमध्ये मान्सूनपूर्व झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

या पार्श्वभूमीवर शिवसेना शेगाव तालुकाप्रमुख रामा



पाटील थारकर यांच्या पुढाकाराने प्रशासनासमोर हा गंभीर प्रश्न प्रभावीपणे मांडण्यात आला. या भागातील एकूण १७२.३० हेक्टर क्षेत्रात झालेल्या नुकसानीचे २४७ शेतकऱ्यांचे पंचनामे करण्यात आले असून, नुकसानभरपाईची प्रक्रिया तातडीने राबवावी असे निर्देश देण्यात आले आहेत.

यावेळी तालुका कृषी अधिकारी चोपडे साहेब यांच्यासोबत २०२५ च्या पिक विमा योजनेंतर्गत शेतकऱ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी सविस्तर चर्चा झाली.

विमा कंपन्यांकडून होत असलेल्या दिरंगाईला लगाम घालण्यासाठी आणि शेतकऱ्यांना योग्य वेळी विमा भरपाई मिळावी यासाठी ठोस भूमिका घेण्यात आली. यासंदर्भात संबंधित यंत्रणेला स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.

या बैठकीत शिवसेना उपतालुका प्रमुख मोहन पाटील लांजुळकर, किसान सेना उपजिल्हाप्रमुख पवन बारिंगे, भागवत उन्हाळे, गोपाल बोरसे आदी मान्यवर उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत स्थानिक नेतृत्व सातत्याने जागरूक असून, शासनाच्या लक्षात ही स्थिती आणून देण्यासाठी प्रयत्नशील आहे.

रामा पाटील थारकर यांचे शेतकरीहितदायी नेतृत्व आणि संघर्षशील भूमिका शेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा देणारी ठरत आहे. त्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे शेतकऱ्यांच्या तक्रारींना प्रशासन स्तरावर गांभीर्याने प्रतिसाद मिळत असून, नुकसानभरपाई आणि विमा लाभ मिळवून देण्यासाठी पुढील कारवाई वेगाने सुरू आहे.

# शितपेयाच्या जलकुंभाचे लोकार्पण

**शेगाव (महासागर प्रतिनिधी):** येथील श्रीमती राधादेवी फत्तेलाल चांडक ट्रस्ट तर्फे त्यांच्या कुटूंबियांनी शितपेयाचे जलकुंभाचे लोकार्पण महेश नवमीच्या मुहूर्त साधून मा. डॉ. रमेश डांगरा यांच्या हस्ते व सामाजिक जेष्ठ कार्यकर्त्या सौ चांदादेवी भुतडा, माहेश्वरी मंडळाचे सचिव महेशसिंग मोहता यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाला, प्रथम स्व फत्तेलालजी चांडक व श्रीमती राधादेवी चांडक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. जलकुंभ चे पूजन करुन डॉ. रमेश डांगरा याच्या हस्ते रिबीन खोलून लोकपर्ण करण्यात आले, याप्रसंगी डॉ पी.एम. भुतडा,सहकार नेते पांडुरंगजी पाटील, पंकज शितूत, डॉ. मोहन बानोले, बी.पी पटेल सर, गणेश अवस्थी, डॉ. अभय गोयंका, शिवाजी बुरुंगले, रमेश कशेलानी, डॉ रमेश भुतडा, ऍड. पुरुषोत्तम डांगरा, अशोक



गांधी, मा.नगर सेवक पवन शर्मा, गजानन जवंजाळ, भाजप अध्यक्ष साखरे,राजेश अग्रवाल, दीपक शर्मा, शाम भुतडा, ट्रस्ट च्या संचालिका श्रीमती शैला चांडक, रेखा चांडक, नंदा चांडक, कार्यक्रमाचे संचालन धिरण चांडक यांनी केले,कार्यक्रम साठी मोठ्या प्रमाणावर समाज बांधव हजर होते,

# सावखेड भोई जि.प.शाळेवर नववा वर्ग सुरू करण्यास जिल्हा परिषदेची मान्यता

**देऊळगाव राजा (महासागर प्रतिनिधी):** जि.प.उच्च प्राथमिक शाळा सावखेड भोई येथे इयत्ता १ ते ८ वी पर्यंत ३०६ एवढी पटसंख्या आहे.येथील ग्रामस्थ,शाळा व्यवस्थापन समिती यांची शाळेला ९ वा वर्ग जोडण्याची मागणी लक्षात घेऊन हरीष शेटे, माजी सभापती पं.स.देऊळगाव राजा यांनी जिल्हा परिषदेकडे पाठपुरावा करून तशी मान्यता मिळवली. सदर शाळा योजनेसाठी प्रस्तावित असून गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी उत्कृष्ट शाळा आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची पुढील शिक्षणाची सोय व्हावी यासाठी या शाळेला ९वा वर्ग जोडणे आवश्यक होते. आमदार मनोज कायदे यांनी यासाठी विशेष सहकार्य केले. नववा वर्ग मान्यतेसाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, शिक्षणाधिकारी प्राथमिक बी.आर.खरात, गटविकास अधिकारी मुकेश माहोर, गटशिक्षणाधिकारी दादाराव मुसदवाले यांनी सहकार्य केले. शाळेला नववा वर्ग जोडल्याबद्दल सरपंच सौ.संगिताताई हरिष शेटे व सर्व सदस्य ग्राम पंचायत, संतोष टेकाळे, अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती तथा सर्व सदस्य, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक, समस्त गावकरी सावखेड भोई यांनी आनंद व्यक्त केला असून परीसरातील देऊळगाव राजा,ि भवगाव बु.,जुमडा, पिंपळगाव चिलमखा येथील विद्यार्थ्यांना सावखेड भोई येथील शाळेत प्रवेश घ्यावा असे आवाहन केले आहे.

# जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल क्रीडा स्पर्धा

## २६ जुनपर्यंत अर्ज करा

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)–** जिल्हास्तरीय सुब्रोता फुटबॉल कप, सबज्युनियर मुले, ज्युनियर मुले, मुली क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. दि. ३ ते ५ जुलै दरम्यान विविध वयोगटाच्या स्पर्धा घेण्यात येणार आहे. क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील शाळा, संघांनी दि. २६ जूनपर्यंत ऑफलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी केले आहे.

जिल्हा क्रीडा परिषद तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा व सुब्रतो मुखर्जी स्पोर्ट्स एज्युकेशन सोसायटी, नवी दिल्ली यांच्या मार्फत २०२५-२६ या वर्षासाठी या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूसाठी सबज्युनियर १५ वर्षा आतील मुले क्रीडा स्पर्धेसाठी खेळाडू दि. १ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. तसेच ज्युनियर १७ वर्षाखालील मुले, मुली दि. १ जानेवारी २००९ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा.

जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप सबज्युनियर, ज्युनियर क्रीडा स्पर्धेत सहभागी सर्व संघानी जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागापूर्वीच subro-tocup.in या संकेतस्थळावर खेळाडू आणि संघांनी नोंदणी करणे अनिवार्य आहे. सहभागी होणाऱ्या संघांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात ऑफलाईन नोंदणी दि. २६ जुनपर्यंत करणे आवश्यक आहे. प्रवेश अर्जावर खेळाडूचे संपुर्ण नांव, जन्मतारीख, वर्ग, आधार क्रमांक, शाळेचे नांव, पत्ता, शाळेचा युडायस क्रमांक, खेळाडू स्वाक्षरी, रजिष्टर नंबर, मोबाईल क्रमांक, संस्था प्रमुख, मुख्याध्यापक यांचे स्वाक्षरीने पाठवावा. १५ वर्षाआतील खेळाडूंकरीता वैद्यकीय प्रमाणपत्र आवश्यक आहे.

या स्पर्धेत सहभागी १५ वर्षाआतील मुले व १७ वर्षा आतील मुले, मुली यांची स्पर्धा दि. ३ ते ५ जुलै २०२५ रोजी घेण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील शाळा, संघांनी सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ऑफलाईन नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी डॉ.जिवन मोहोड, राज्य क्रीडा मार्गदर्शक (फुटबॉल) यांचेशी कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडा नगरी, जांभरुन रोड, बुलढाणा येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी केले आहे.

# संजय गांधी व श्रावण बाळ योजनेच्या लाभार्थ्यांचे तात्काळ मानधन द्या ,वंचितची मागणी

**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी):** तालुक्यातील वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने संजय गांधी व श्रावण बाळ योजनेच्या लाभार्थ्यांना तात्काळ मानधन देण्यात यावे या मागणीसाठी जळगाव जामोद तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. संजय गांधी , श्रावण बाळ योजनेतील लाभार्थ्यांना मानधन मिळाले नाही.यामुळे या योजनेतील लाभार्थ्यांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. शासनाने गरीब गरजू कुटुंबातील निराधारांना आधार मिळावा म्हणून ही योजना सुरू केलेली आहे परंतु गेल्या पाच महिन्यापासून विधवा, अपंग, वयोवृद्ध, निराधारांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे मानधन देण्यात त्यामुळे त्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्याकरिता शासनाने तात्काळ त्यांच्या बँक खात्यामध्ये त्यांचे मानधन जमा करावे तसेच शेतकरी बांधवांचे रखडलेले अतिवृष्टी आर्थिक साणुग्रह निधी सुद्धा आजपर्यंत अनेक शेतकऱ्यांना मिळालेला नाही त्यामुळे वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ त्यांच्या बँक खात्यामध्ये रखडलेला निधी त्वरित जमा करण्यात यावा अशा आशयाचे निवेदन ५ मे रोजी वंचित आघाडीच्या वतीने तहसीलदार यांना देण्यात आले . सदर निवेदन देतेवेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष प्राध्यापक अनिल रणीत, युवा आघाडीचे पदाधिकारी संतोष पवार, अमोल तायडे, बाबुराव इंगळे, महिला आघाडीच्या पार्वताबाई इंगळे, रोशन तायडे, राहुल धुंदाळेसह अनेक वंचित बहुजन आघाडीचे युवा कार्यकर्त्ये यावेळी उपस्थित होते.

# ११ मृत्यूंना जबाबदार कोण?

बुधवार ४ जून रोजी संध्याकाळी बंगळुरूमधील चिन्नास्वामी स्टेडियमच्या गेट नंबर एकवर चेंगराचेंगरी झाली. त्यात ११ जणांचा मृत्यू झाला. हे लोक रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या आयपीएल जिंकल्याचा आनंद साजरा करण्यासाठी आले होते. चेंगराचेंगरीच्या वेळी आरसीबी संघ विधानसभा भवनात होता. येथे कर्नाटक सरकारने त्यांचा सत्कार केला. सत्कार समारंभ आणि उत्सव संपले आहेत, परंतु चेंगराचेंगरीला जबाबदार कोण आहे हा प्रश्न कायम आहे.

चौकशी केल्यावर असे समजले की पोलिस, प्रशासन, सरकार, आरसीबी व्यवस्थापन आणि कर्नाटक क्रिकेट असोसिएशन, सर्वजण चुका करत होते. लाखो लोकांची गर्दी जमत होती, पण त्यांना रोखणारे कोणीही नव्हते.

सीएम सिद्धरामय्या यांनी स्वतः कबूल केले की जेव्हा आरसीबी संघ विधानसभेत पोहोचला तेव्हा बाहेर एक लाख लोक होते. त्याच वेळी, चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर चेंगराचेंगरी झाली, जिथे ३ लाख लोक जमले होते. आम्हाला एवढी मोठी गर्दी अपेक्षित नव्हती. आम्ही यासाठी तयार नव्हतो.

कर्नाटक विधानसभा आणि चिन्नास्वामी स्टेडियम बंगळुरू सेंट्रल येथे आहेत. येथेच आरसीबीचा सत्कार समारंभ आणि विजयी परेड होणार होती. बंगळुरू सेंट्रलचे पोलिस उपायुक्त शेखर एच. टेकन्नावर हे कायदा सुव्यवस्था, गर्दी आणि वाहतूक नियंत्रण आणि मार्ग नियोजनासाठी जबाबदार होते.

आरसीबी व्यवस्थापनाने ४ जून रोजी सकाळी सोशल मीडियावर विजय परेडची घोषणा केली होती. दुपारी ३:१५ वाजता, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर विजय परेड तिकिटांची जाहिरात पोस्ट करण्यात आली.

तरीही पोलिसांनी परेडसाठी परवानगी दिली होती की नाही हे स्पष्टपणे सांगितले नाही. प्रश्न असा आहे की जर परवानगी दिली गेली असेल तर इतक्या मोठ्या गदीर्चे व्यवस्थापन कसे केले गेले? जर परवानगी दिली गेली नसेल तर त्याबद्दल संदेश का देण्यात आला नाही?

या घटनेनंतर आता सत्ताधारी काँग्रेस आणि त्या राज्यातील विरोधक भाजप यांच्यात आरोप प्रत्यारोपांचा राजकीय सामना सुरू झाला असला तरी अजून काही प्रश्न कायमच राहतात.

चिन्नास्वामी स्टेडियमची क्षमता फक्त ३५-४० हजार लोकांची आहे, मग २-३ लाख लोकांच्या गर्दीला जमण्याची परवानगी कशी देण्यात आली? गर्दी किती असेल याचा अंदाज आधीच लावला नव्हता का? विविध ठिकाणी बॅरिकेडिंग करून गर्दी का वळवली नाही? जेव्हा गर्दी जमू लागली तेव्हा ड्रोन आणि सीसीटीव्हीद्वारे त्याचे व्यवस्थापन का केले गेले नाही?

आरसीबी व्यवस्थापन आणि कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनशी बोलणे आणि ४ जून रोजी होणाऱ्या कार्यक्रमाचा आराखडा तयार करणे आणि त्यानुसार नियोजन करणे ही जिल्हा दंडाधिकारी जगदीश जी यांची जबाबदारी होती. ते संघ विमानतळावर उतरण्यापासून ते स्टेडियममध्ये पोहोचण्यापर्यंतचा मार्ग नकाशा तयार करून वेळेसह प्रसिद्ध करू शकत होते.

जर हे केले असते तर चाहत्यांना काय करावे हे कळले असते. दुपारपर्यंत कोणालाही माहित नव्हते की विजय मिरवणूक होणार नाही. गर्दी विजय मिरवणूक पाहण्यासाठी आली होती.

जर विजय परेड आयोजित न करण्याचा निर्णय घेण्यात आला असेल, तर जिल्हा माहिती विभागाने त्याबद्दल लोकांना माहिती का दिली नाही? प्रशासनाला माध्यमे आणि



सोशल मीडियाद्वारे लोकांपर्यंत संदेश पोहोचवता आला असता, परंतु कोणतेही स्पष्ट नियोजन दिसले नाही आणि कार्यक्रमाशी संबंधित निर्णयाची माहिती लोकांना देण्यात आली नाही.

बंगळुरूमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीचे कारण पोलिस प्रशासनाचे अपयश आणि बेजबाबदार वृत्ती आहे. पोलिस विभाग राज्याच्या गृहमंत्र्यांच्या अधीन आहे. कर्नाटकचे गृहमंत्री जी. परमेश्वर यांच्यावर स्थानिक पोलिस गुप्तचर यंत्रणेमार्फत गर्दीचा अंदाज घेण्याची जबाबदारी होती. गर्दीचा अंदाज घेतल्यानंतर ते राखीव पोलिस दल आणि अधिक पोलिस तैनात करू शकले असते. जिल्हा पोलिसांना मदत करण्यासाठी अतिरिक्त दल तैनात केले असते.

प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, स्टेडियमबाहेर गर्दी वाढताच पोलिसांनी लाठीमार केला. यामुळे चेंगराचेंगरीही झाली. याचे व्हिडिओही समोर आले आहेत.

माजी यूपी डीजीपी विक्रम सिंह म्हणतात, 'ही चेंगराचेंगरी पोलिस खात्याचा पूर्ण निष्काळजीपणा दर्शवतो. पोलिस त्यांच्या जबाबदारीपासून पळून जाऊ शकत नाहीत. पोलिस म्हणतात की त्यांना कमी वेळ मिळाला, परंतु जरी त्यांना वेळ मिळाला नाही, तरीही संपूर्ण व्यवस्था करण्याची जबाबदारी तुमची आहे.'

कर्नाटक सरकारमधील उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांना आरसीबीच्या विजयानंतरचा उत्सव एक मोठा कार्यक्रम बनवायचा होता. ते मीडियामध्येही याबद्दल बोलत होते. डीके शिवकुमार बंगळुरू शहरात काम करणाऱ्या विविध एजन्सींसाठी जबाबदार आहेत. दुपारी ३ वाजताच्या सुमारास, डीके शिवकुमार स्वतः आरसीबी संघाचे स्वागत करण्यासाठी विमानतळावर पोहोचले. त्यांनी विमानतळावर खेळाडूंचे स्वागत केले. दुपारी ३:३० वाजता त्यांनी एक्सवर विमानतळाचा फोटो पोस्ट केला.

शिवकुमार या कार्यक्रमाचे नेतृत्व करत होते. पोलिस प्रशासन, स्थानिक जिल्हा प्रशासन आणि आयोजकांमध्ये बैठक घेऊन संपूर्ण नियोजन करण्याची जबाबदारी त्यांची होती. नियोजन केल्यानंतरच त्यांनी विजयी परेडसाठी परवानगी देणे आवश्यक होते. जर त्यांना हवे असते तर विजयी परेड आणि सत्कार समारंभ एक-दोन दिवस पुढे ढकलता आला असता.

स्टेडियमच्या बाहेर चेंगराचेंगरी झाली तेव्हा आत विजयाचा जल्लोष सुरू होता, असे वृत्तही आले होते. यावर मुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी दावा केला की, 'मी ताबडतोब संघाकडे गेलो आणि त्यांना सांगितले की कार्यक्रम १० मिनिटांत थांबवावा. संघाने यावर सहमती दर्शवली आणि त्यांनी ५ मिनिटांत कार्यक्रम थांबवला. कोणतीही घटना घडू नये अशी आमची इच्छा असल्याने आम्ही त्यांच्यासोबत पोलिस पथके पाठवली.'

संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी आरसीबी व्यवस्थापनावर होती. हा कार्यक्रम चिन्नास्वामी स्टेडियममध्ये होणार होता, त्यामुळे कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनचाही त्यात सहभाग होता. आता ११ जणांच्या हकनाक मृत्यूनंतर राजकारण सुरू झाले आहे. सरकारच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. विरोधक तुटून पडत आहेत. जबाबदार असलेल्यांना शिक्षा होणार का? हा प्रश्न कायम आहे.

■ ■ ■

## पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी लोकसंख्यावाढ रोखणे अनिवार्य!

जागतिक पर्यावरण दिन नुकताच साजरा झाला. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे कोणत्याही देशाच्या सरकारपुढील मोठे आव्हान असते. भारतही त्याला अपवाद नाही. विज्ञानाने वैद्यकीय क्षेत्रात केलेल्या प्रगतीमुळे देशातील मृत्युदर कमालीचा घटला आहे याउलट वाढत्या लोकसंख्येवर सरकारचे कोणतेही नियंत्रण नाही.

चीनमध्ये वाढती लोकसंख्या देशाच्या विकासावर परिणाम करत असल्याचे लक्षात येताच तेथील सरकारने लोकसंख्येवर नियंत्रण आणण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरु केले. १९७९ सालापासून चीनने एकल अपत्य धोरण देशभरात सक्तीने राबवले. ज्यामुळे सुमारे ४०० दशलक्ष नवीन जन्म चीनला रोखता आले. भूभागाच्या बाबतीत भारताच्या तीन पटीने मोठ्या असलेल्या चीनने लोकसंख्येच्या बाबतीत मागील अनेक दशकांपासून आपले नाव पहिल्या क्रमांकावर कायम ठेवले होते.

वाढत्या लोकसंख्येमुळे देशाचा विकास खुंटत असल्याचे लक्षात आल्यावर मात्र चीनने ती रोखण्यासाठी पुष्कळ मेहेनत घेतली. एप्रिल २०२३ मध्ये भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला. विकासाच्या नावावर मते मागणा?्या मोदी सरकारने वाढती लोकसंख्यावाढ हा विकासातील सर्वात मोठा अडथळा असल्याचे लक्षात येऊनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. वाढत्या लोकसंख्येच्या आधारे देश जगातील चवथ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता बनला आहे असेही मत आहे.

मानवाच्या मूलभूत गरजा पुरवणारे नैसर्गिक स्त्रोत मर्यादित असल्याने वाढत्या लोकसंख्येचा ताण त्यावर पडत आहे. शहरासारख्या ठिकाणी पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांची संख्या आणि क्षमता मर्यादित आहे. अल्प पावसामुळे ही जलाशये भरली नाहीत तर पाणीकपातीचे संकट ओढवते.

शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे हे संकट वर्षागणिक अधिक भयावह होऊ लागले आहे. रोजगारासाठी लोकांचे लोंढेच्या लोंढे प्रतिदिन शहराकडे धाव घेतात. ज्यामध्ये परप्रांतीयही असतात आणि बांगलादेशी घुसखोरही असतात. यांच्या निवासासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि झोपडपट्टी दादा यांच्या आशीर्वादाने ठिकठिकाणी अनधिकृत वस्त्या आणि झोपडपट्या निर्माण होऊ लागल्या आहेत. मतांच्या लाचारीसाठी हे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासाठी वीज आणि पाणी यांसह कागदपत्रांची आणि रोजगाराची सोयही करून देतात.

वाढत्या उद्योगधंद्यासह शहरांतील श्रीमंतांची संख्याही वाढल्याने शहरांत ठिकठिकाणी टोलेजंग इमारती उभ्या राहू लागल्या आहेत. या सर्वांसाठी झाडांची आणि नैसर्गिक संपत्तीची सर्रासपणे कत्तल केली जात आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतुकीची साधने अपुरी पडू लागली आहेत. मुंबईसारख्या ठिकाणी सकाळी आणि संध्याकाळी लोकल ट्रेनमधील गर्दी पाहता त्यातील प्रवास म्हणजे मृत्यूचा खेळ झाला आहे. चालत्या गाडीतून पडल्यामुळे प्रतिदिन कितीतरी अपघात होतात; मात्र हा धोका पत्करण्याशिवाय चाकरमान्यांकडे अन्य पर्याय नसतो.

लोकल रेल्वेला पर्याय म्हणून शहरांमध्ये आलेले प्राथमिक टप्प्यातील मेट्रो रेल्वे आणि मोनो रेल्वे हे प्रकल्पही अपुरे पडू लागले आहेत. त्यामुळे आता शहरांत ठिकठिकाणी मेट्रो प्रकल्पाचे जाळे उभारण्याचे काम सुरु झाले आहे. हे मेट्रोमार्ग तयार करण्यासाठी पुन्हा रस्ते खोदले जात आहेत. शहरांतील वाढत्या संख्येच्या तुलनेत रस्त्यांची रुंदी कमी पडू लागल्याने आता ठिकठिकाणी रस्ते रुंदीकरणाची कामेही सुरु करण्यात आली आहेत.

शहरांतील ठराविक ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अशा भागांत नवनवीन उड्डाणपुलांची कामेही सुरु झाली आहेत. हे सर्व कमी पडते म्हणून आता सागरी सेतू उभारले जाऊ लागले आहेत. भूमीच्या आणि समुद्राच्या खालूनही भुयारी मार्ग आणि मेट्रो प्रकल्प उभारण्यात आले आहेत. शहरातील प्रमुख रस्त्यांवर सुरु असलेले मेट्रो प्रकल्प, उड्डाणपुलाची कामे आणि रस्ते रुंदीकरणाची कामे यांमुळे सकाळ आणि संध्याकाळी वाहनांच्या मोठमोठ्या रांगा लागून मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते.

या कोंडीत वाहन चालकांकडून अनावश्यक वाजवल्या जाणाऱ्या हॉर्न्समुळे रस्त्याच्या दुतर्फा राहणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. रस्त्यावरील खोदकामांमुळे उडणारी धूळ, खोदकाम करणाऱ्या यंत्रांचे प्रचंड आवाज आणि गाड्यांचे कर्णकर्कश हॉर्न यांमुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन जगावे लागत आहे. ध्वनी आणि वायू या दोन्ही प्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. याशिवाय शहरांत ठिकठिकाणी सुरु असलेल्या टोलेजंग इमारतींची कामे यांमुळेही प्रदूषणात भर पडत आहे.

रस्त्यावरील पुलांची कामे आणि इमारतींची उभारणी यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सिमेंट आणि तत्सम रासायनिक पदार्थांमुळे वातावरणातील हवेत विषारी धूलिकण पसरू लागले आहेत ज्यामुळे सर्वच विकसनशील शहरांतील हवेची गुणवत्ता घसरून त्याचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर होत आहे. शहरातील नागरिकांना प्रतिदिन श्वासाबरोबर विषारी आणि प्रदूषणकारी हवा ग्रहण करावी लागत आहेत. गर्भवती स्त्रिया, दम्याचे रुग्ण, वयोवृद्ध आणि लहान मुले यांना या प्रदूषित हवेचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. श्वसनविकारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

रोजगारासाठी शहरात येऊन निवृत्त झालेले नागरिक शहरांतील वाढत्या प्रदूषणामुळे निवृत्तीनंतर गावची वाट धरू लागले आहेत. शहरांतील वाढती लोकसंख्या लक्षात घेता या विकासकामांना पर्याय नाही. त्यामुळे ग्रामीण भागांत अधिकाधिक रोजगारनिर्मिती करणे यासोबत देशातील वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण आणणे आज अत्यंत आवश्यक बनले आहे. लोकसंख्यावाढ वेळीच रोखली गेली नाही तर भविष्यात देशातील समस्त शहरे मृत्यूची केंद्रे बनल्यावाचून राहणार नाहीत.

■ ■ ■



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

## इंडीया आघाडीचं काही खरं नाही!

लोकसभा निवडणूकांच्या काळात मजबूत अवस्थेत असलेल्या इंडिया आघाडीला ग्रहण लागले आहे. इंडीया आघाडीतील एक महत्त्वाचा घटक पक्ष असलेल्या आम आदमी पक्षाने आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. हे कधी तरी होणारच होते.

कारण लोकसभा निवडणुकांनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये आम आदमी पक्षाने स्वतंत्रपणे निवडणूका लढविल्या होत्या. हरयाणा विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाने स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेतल्याने त्याचा फटका इंडिया आघाडीतील काँग्रेसला बसला होता. विधानसभेच्या पाच जागांवर काँग्रेस आणि आपच्या उमेदवारांना मिळालेल्या मतांची बेरीज,विजयी भाजपा उमेदवारांना मिळालेल्या मतांपेक्षा जास्त होती.

खरे पाहता जवळ जवळ सर्वच निवडणूक चाचण्यांमध्ये, काँग्रेसला हरयाणा विधानसभा निवडणुकीत सहजपणे विजय मिळेल, असे अंदाज वर्तवण्यात आले होते, परंतु इंडिया आघाडीतील काँग्रेस आणि आम आदमी पक्ष यांच्यात निवडणूक समझोता होऊ न शकल्याने, काँग्रेसला अनपेक्षितपणे पराभव पत्करावा लागला.

दिल्ली विधानसभा निवडणुकात आम आदमी पक्षाला फाजील आत्मविश्वास नडला.२०१५ मध्ये झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाने विधानसभेच्या एकूण ७० जागांपैकी ६७ जागा जिंकून भाजपाचा पालापाचोळा केला होता.त्यानंतर २०२० मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाने विधानसभेच्या ७० जागांपैकी ६२ जागा जिंकल्या होत्या.

या पार्श्वभूमीवर २०२५ च्या निवडणुकीत आम आदमी पक्षाचा आत्मविश्वास कमालीचा वाढला होता. मात्र भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांनी जेलची वारी केल्यानंतर दिल्ली मधील सामान्य नागरिकांचा आम आदमी पक्षावरील विश्वास उडाला होता.त्याचा फटका दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाला बसला आणि पक्षाला सत्तेवरून पायउतार व्हावे लागले.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीत असलेल्या काँग्रेस आणि आम आदमी पक्ष यांच्यात निवडणूक समझोता झाला असता तर कदाचित आम आदमी पक्षाला पराभवाचा सामना करावा लागला नसता.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत १७ जागांवर आम आदमी पक्ष आणि काँग्रेस यांना मिळालेल्या मतांची बेरीज, विजयी भाजपा उमेदवारांना मिळालेल्या मतांपेक्षा जास्त होती, ही गोष्ट लक्षात घेतली तर हे दोन पक्ष वेगळे लढल्याने आम आदमी पक्षाला त्याचा कसा फटका बसला,या प्रश्नाचे उत्तर आपल्याला मिळते.

इंडिया आघाडीतील बेबनाव दिल्ली विधानसभा निवडणुकांच्या वेळी समोर आला होता. अखिलेश यादव यांच्या समाजवादी पक्षाने त्या निवडणुकीत काँग्रेसला पाठिंबा न देता आम आदमी पक्षाला पाठिंबा दिला होता.आता अधिकृतरित्या आम आदमी पक्षाने इंडिया आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय जाहीर केल्याने आघाडीला मोठाच धक्का बसला आहे.

मध्यंतरी काँग्रेसचे नेते पी.चिदंबरम यांनी इंडिया आघाडीच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त केली होती.ममता बॅनर्जी या सतत इंडिया आघाडीच्या आत बाहेर करत असतात.

लोकसभा निवडणुकीत ममतांनी इंडिया आघाडीचे घटक पक्ष असलेल्या, मार्क्सवादी कम्युनिस्ट आणि काँग्रेस बरोबर निवडणूक समझोता केला नव्हता.पश्चिम बंगाल मध्ये सत्तेवर असलेल्या ममतांनी लोकसभा निवडणुकीत स्वतंत्रपणे लढून, नेत्रदीपक विजय मिळवला होता.

महाराष्ट्रात इंडिया आघाडीचे अस्तित्व असून नसल्यासारखे आहे. आघाडीतील तीन महत्त्वाचे घटक पक्ष असलेल्या, शिवसेना (उबाठा ), राष्ट्रवादी काँग्रेस (शप ) आणि काँग्रेस यांची तोंडे तीन दिशांना आहेत.

शिवसेना ( उबाठा) हा पक्ष अधून मधून, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढण्याच्या गोष्टी करत असतो.शिवाय शिवसेना ( उबाठा) आणि मनसे एकत्र आल्यास ते इंडिया आघाडीत राहतील की नाही याबाबत शंकाच आहे.

उत्तर प्रदेशात २०२७ मध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.परंतु इंडिया आघाडीतील प्रमुख घटक पक्ष असलेल्या काँग्रेस आणि समाजवादी पक्ष यांच्यात आतापासूनच जागा वाटपावरून रूसवे फुगवे सुरू झाले आहेत.

जम्मु-काश्मिरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला हे इंडिया आघाडीच्या कामकाजाबाबत नाराज आहेत.पुढील वर्षी पश्चिम बंगाल मध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत, तेंव्हा ममता बॅनर्जी या इंडिया आघाडीचे घटक पक्ष असलेल्या काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांच्याशी निवडणुक समझोता करतील असे वाटत नाही.

केरळमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील डावी आघाडी आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडी हे एकमेकांचे पारंपरिक राजकीय शत्रू आहेत.इंडीया आघाडीत असूनही, हे पक्ष पुढील वर्षी होणाऱ्या केरळ विधानसभा निवडणुकीत एकमेकांविरोधात लढतील. ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेतली तर इंडिया आघाडीचे काही खरे नाही, असेच म्हणावे लागेल. ■ ■ ■



अभय गोखले

## केल्याने होत आहे रे.. आधी केलेची पाहिजे..

आळस हा माणसाचा शत्रू आहे. तसे तर माणसाला शत्रू आवडत नाहीत. पण, आळस हा नेहमी आपल्या सोबत असतो. आळस झटकून कामाला लागा. मग तुमच्या इच्छित ध्येयापर्यंत एक दिवस नक्कीच पोहोचाल. असा विचार करून प्रयत्न करत राहिल्यास एक दिवस स्वप्न सत्यात उतरल्याशिवाय राहणार नाही असा विचार करुनच केल्याने होत आहे रे आधी केलेच पाहिजे...असे संत रामदास स्वामी यांनी म्हटले आहे. जीवनात उत्तरोत्तर कर्म करत राहिल्यास कर्म हे दैव बनून जाते.

मानवी जीवनात कष्टाला अनन्यसाधारण महत्त्व आहे कष्ट प्रामाणिक असले तर यशाला ही पर्याय नसतो. सतत प्रामाणिकपणे प्रयत्न केले तर यश नक्कीच मिळते. मराठीमध्ये एक सुभाषित आहे प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे. म्हणून सतत प्रयत्न करत राहिले पाहिजे.

इंग्लिश मध्ये एक म्हण आह.. वर्क इज वर्कशीप. आपले कर्म करीत राहणे हेच आपले कर्तव्य आहे. कर्मा पेक्षा कर्तव्य श्रेष्ठ आहे. जीवनात आपल्या जबाबदाऱ्या पार पाडणे यासारखे श्रेष्ठ कार्य दुसरे कोणतेही नाही. आयुष्याचा मार्ग क्रमण करीत असतांना जीवन जगण्यासाठी कष्ट करणे अपरिहार्य आहे.

जीवन जगत असताना काम करण्यासाठी प्रेरणा मिळणे आवश्यक असते. तसेच आपल्या आवडीचे काम मिळणे हे सुद्धा आवश्यक आहे. ज्या कामात आपल्याला रुची नाही ते काम आपल्याला कंटाळवाणे वाटते. जगण्यासाठी प्रत्येकाच्या गरजा वेगवेगळ्या असतात. प्रत्येकाला वेगळ्या गोष्टीत रस असतो. जीवनामध्ये नऊ रसांपैकी प्रत्येकाला वेगवेगळ्या गोष्टी रस वाटतो. जीवन हे कैरीच्या फोडी सारखे असते. आंबट कैरीला मिठाची चव लावून खाल्ली की ते रुचकर लागते. जीवनाचेही त्याप्रमाणेच आहे. कैरीच्या फोडीला तिखट मीठ लावलं तर छान चविष्ट लोणचं बनते. कच्ची कैरी जेव्हा पिकते तेव्हा त्याचा गोड आंबा बनतो. जीवनाचे सुद्धा असेच आहे कधी आंबट कधी गोड असे आयुष्य आपलं असतं.

प्रा. सौ. वर्षा विलास कावरे
बालाजी नगर, मूर्तिजापूर,
अकोला. 9021673178

आयुष्यात गोड आंबट तिखट कडू सगळ्या चवी असतील तर आनंद जगण्यात रस वाटतो. जेवणाच्या ताटात फक्त गोड पदार्थ असतील तर आपल्याला जास्त गोड जेवण आवडणार नाही. त्याचप्रमाणे जीवनाच्या ताटात गोड आंबट कडू अशा विशिष्ट चवीची आवश्यकता असते. तसेच जीवनाच्या थाळीत सुख आणि दुःख हे सुद्धा वाढले जातात. त्यामुळे आपल्याला कधी सुखाची तर कधी दुःखाची चव चाखायला मिळते. ज्याप्रमाणे दह्यापासून चविष्ट असे आंबट गोड श्रीखंड तयार होते. आणि त्याची चव जास्त वाढते. त्याचप्रमाणे आपल्या जीवनात कष्ट प्रामाणिक असतील तर जगण्याला चमक आणि चकाकी येते.

आपले हित घडवून आणण्याचे सामर्थ्य प्रत्येक मानवात असते फक्त त्यासाठी कष्ट करण्याची तयारी असली पाहिजे. समर्थ रामदास स्वामी याच गोष्टीवर भर देताना दिसतात. कधी कधी आपण अपयशाबद्दल दुसऱ्याला दोष देतो. दुसऱ्याला नावे ठेवतो परंतु अशावेळी आपले दोष पाहणे देखील आवश्यक असते. उत्तुंग भरारीसाठी कष्टाची आवश्यकता आहे. आणि कष्ट प्रामाणिक असले तर यशालाही पर्याय नसतो. ■ ■ ■

### वाचक लिहितात

## अन्यथा वारकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल!


आषाढी पालखी सोहळा १५ दिवसांवर आला असताना महापालिका विकास आराखड्यात मोशी आणि डूडूळगाव सीमेवर आळंदी पासून तीन किलोमीटर अंतरावर कत्तलखाना आरक्षित करण्यात आल्याचे वृत्त वाचनात आले. पालखी सोहळ्यानिमित्त लाखो वारकरी आळंदी आणि देहू या ठिकाणी पालखीत सहभागी होण्यासाठी येतात. या पालखीमार्गातच पशुवधगृह उभारण्यास परवानगी मिळाल्याने समस्त वारकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

वारकरी संप्रदाय हा संपूर्ण भारतातील सर्वांत मोठा संप्रदाय आहे. आषाढीची पंढरपूर वारी हा वारकऱ्यांचा सर्वांत मोठा उत्सव. या उत्सवानिमित्त महाराष्ट्रासह देशभरातून वारकरी मंडळी ऊन,वारा, पाऊस कशाचीही तमा न बाळगता पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करतात. हजारो किलोमीटरचा प्रवास पायी करण्याचे बळ विठूमाऊलीच त्यांना देत असते. गळ्यात तुळशीची माळ घालून भक्तिमार्गाची कास धरणारा हा वारकरी धारण केलेल्या माळेचे पावित्र्य राखण्यासाठी मांसाहार, मद्यपान त्यागतो. माउली प्रत्येक क्षणी आपल्याकडे पाहात आहे या भावाने आचारधमार्चे पालन करतो.

'ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस' हा अभंग सर्वांनाच ठाऊक आहे. वारकरी संप्रदायांचा पाया रचणारे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर यांची समाधी आळंदी या गावी आहे, त्यामुळे वारकऱ्यांसाठी ही भूमी काशीहून उणे नाही. अशा ऐतिहासिक भूमीचे पावित्र्य राखणे हे सरकारचे कर्तव्य आहे; मात्र या कर्तव्याचा विसर पडलेल्या सरकारने आता या पवित्र भूमीच्या परिसरातच पशुवधगृह उभारण्याचा घाट घातला आहे. ज्यामुळे लाखो वारकऱ्यांसह समस्त हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. जनभावनेचा विचार करून सरकारने आळंदी क्षेत्रात पशुवधगृह उभारण्यास केलेल्या भूमीचे आरक्षण रहित न केल्यास येत्या आषाढी वारीत सरकारला वारकऱ्यांच्या रोषाचा सामना करावा लागेल हे निश्चित आहे.

■ सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई.

## तांब्याच्या बाटलीतून पाणी किती वेळा प्यावं?



आजच्या घडीला मानवी जीवनात प्लास्टिक किंवा काचेच्या बाटल्या कालबाह्य होत चालल्या आहेत. ऑनलाइन शॉपिंग साइट्स उघडताच तांब्याच्या किंवा स्टेनलेस स्टीलच्या विविध प्रकारच्या बाटल्या दिसतील. तांब्याच्या बाटल्या, तांब्याचे ग्लास, आणि वेगवेगळ्या डिझाईनचे तांब्याचे कप सुद्धा मोठ्या प्रमाणावर विकले जात आहेते.

तांब्यापासून बनवलेल्या भांड्यांची मागणी अधिक आहे. कारण पुन्हा एकदा तांब्याच्या भांड्यातून पाणी पिण्याची फॅशन किंवा प्रवृत्ती वाढली आहे. तांब्याच्या भांड्यातील पाणी प्यायल्याने आरोग्य सुधारते आणि वजन कमी करण्यास मदत होते, असा अनेकांचा विश्वास आहे. पण ही सवय खरंच किती आरोग्यदायी आहे?

ल्यूक हे आहारतज्ज्ञ, फिटनेस ट्रेनर आणि लाईफस्टाइल कोच आहेत. अनेक बॉलिवूड कलाकारांनी त्यांचे मार्गदर्शन घेतले आहे. ल्यूक सांगतात की, एकेकाळी आपल्या आजी-आजोबांना तांब्याच्या ग्लासमधून पाणी पितांना पाहिलं जायचं. प्राचीन भारतात तांब्याची भांडी खूप वापरात होती. तांब्याच्या ग्लासमध्ये रात्री पाणी ठेवून सकाळी ते पिण्याची परंपरा होती. यामुळे शरीर निरोगी राहत असे आणि पचनशक्तीही सुधारायची. तांबे मेटाबॉलिक रेट वाढवतो, हे नक्कीच. मात्र, याचा फायदा किती होतो हे तुम्ही ते कसे आणि किती वेळा वापरता यावर अवलंबून असते.

पूर्वी तांब्याची भांडी वापरली जात होती पण दिवसातून एकदोन वेळाच तांब्याच्या ग्लासमधून पाणी प्यायलं जात होतं. पण आज उलटं होतंय झ तांब्याच्या फायद्यांचा विचार करून लोक संपूर्ण दिवसभर तांब्याच्या बाटलीत पाणी भरून ठेवतात. परिणामी, शरीरात जास्त प्रमाणात तांबे जातो आणि त्यामुळे विविध आरोग्यविषयक समस्या उद्धवतात.

तांबे थायरॉईडची समस्या कमी करू शकतो. पण जर तुम्ही दिवसभर फक्त तांब्याच्या ग्लास किंवा बाटलीतूनच पाणी पित असाल तर शरीरातील कॉपरची मात्रा वाढते. यामुळे थायरॉईड ग्रंथीला नुकसान होऊ शकते.

शरीरात खूप जास्त तांबे मिसळला गेला तर रक्तप्रवाहात अडथळे निर्माण होऊ शकतात. अपचन होऊ शकते. पोट फुगणे, उलट्या होणे, चक्कर येणे, अशा तक्रारी वाढू शकतात. पचनसंस्थेत संसर्ग होण्याची शक्यताही वाढते. त्यामुळे तांब्याच्या बाटलीतील पाणी वारंवार पिवू नका.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### टाळू शकता..!

जशी करणी
तशी भरणी
शाश्वत सत्य
आहे जिवनी ..!

रोपटे लावले बाभळीचे
तर येणारच त्यास काटे
नको यावयास दुःखाश्रू
भविष्यात डोळयावाटे ..!

विचार करुनच
करावी कृती
जीवनी ना येई
पश्चातापाची स्थिती ..!

# वाल्डॉर्फ अॅस्टोरिया आणि हिल्टन हॉटेल्स अॅण्ड रिसॉर्ट्स जीएमआर एरोसिटीमध्ये डायलसोबत भागीदारीत उघडणार



**नागपूर, ५ जून :** हिल्टनने आज जीएमआर समूहाच्या नेतृत्वाखालील दिल्ली इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड सोबतच्या भागीदारीत वाल्डॉर्फ अॅस्टोरिया आणि हिल्टन हॉटेल्स अॅण्ड रिसॉर्ट्स या ब्रँड्सअंतर्गत दोन हॉटेल्स उघडण्याची घोषणा केली. ही हॉटेल्स जीएमआर एरोसिटी, नवी दिल्ली येथे उघडली जातील दिल्ली इंटरनॅशनल एअरपोर्टवरील भारताचा पहिला जागतिक व्यवसाय केंद्र, ज्यामध्ये जागतिक दर्जाची हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि भविष्य-केंद्रित कार्यालयांचा समावेश आहे. हे प्रकल्प हिल्टनचे लक्झरी आणि फुल-सर्व्हिस ब्रँड्स राजधानीच्या उत्तम कनेक्टिव्हिटी असलेल्या आदरातिथ्य आणि व्यावसायिक परिसरात आणतात. या प्रकल्पांमुळे नवी दिल्ली व नॅशनल कॅपिटल रीजनमध्ये हिल्टनची उपस्थिती अधिक बळकट होईल, जिथे हिल्टनचे आधीच चार प्रॉपर्टीज आहेत. या स्वाक्षरीनंतर भारताच्या राजधानीत वाल्डॉर्फ अॅस्टोरियाचे पदार्पण होणार असून, हे हिल्टनच्या भारतातील लक्झरी बाजारातील दीर्घकालीन वचनबद्धतेचे प्रतिक आहे. या हॉटेलमध्ये १५० खोल्या व सुईट्स, सिग्नेचर डायनिंग अनुभव, मोठ्या प्रमाणावर इव्हेंट स्पेसेस आणि आल्हाददायक वेलनेस सुविधा असतील. यासोबतच, पीकॉक अॅले हा प्रत्येक वाल्डॉर्फ अॅस्टोरियाच्या केंद्रस्थानी असलेला प्रतिष्ठित सोशल स्पेसही येथे अनुभवता येईल. याव्यतिरिक्त, ५० खोल्यांचे हिल्टन एरोसिटी, नवी दिल्ली हे नवी दिल्लीतील पहिले हिल्टन हॉटेल्स अॅण्ड रिसॉर्ट्सचे प्रॉपर्टी असेल. या हॉटेलमध्ये व्यावसायिक आणि पर्यटनासाठी येणाऱ्या प्रवाशांसाठी अत्याधुनिक सुविधा, डायनिंग पर्याय आणि सोशल स्पेसेस उपलब्ध असतील, यासोबतच हिल्टनच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सेवाही मिळतील.

हिल्टनचे अध्यक्ष व सीईओ क्रिस नॅसेटा म्हणाले, जीएमआरच्या नेतृत्वाखालील डायलसोबतच्या भागीदारीत दिल्ली एरोसिटीमध्ये वाल्डॉर्फ अॅस्टोरिया आणि हिल्टनची स्वाक्षरी ही भारतातील आमच्या दीर्घकालीन बांधिलकीचे उदाहरण आहे. आम्ही दक्षिण आशियामध्ये आमची वाढ वेगाने पुढे नेत आहोत, आणि ही प्रतिष्ठित प्रॉपर्टीज आमच्या भागीदाऱ्या हिल्टनचे पोर्टफोलिओ वाढवण्यात आणि जागतिक प्रवाशांना उत्कृष्ट अनुभव देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील. या स्वाक्षरीमुळे भारतातील आमच्या वाढीच्या दिशेने एक मोठे पाऊल टाकले गेले आहे.

जीएमआर समूहाचे कॉर्पोरेट चेअरमन किरण कुमार ग्रांधी म्हणाले, जीएमआर एरोसिटीमध्ये वाल्डॉर्फ अॅस्टोरिया आणि हिल्टन आणण्यासाठी हिल्टनसोबत भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे. ही भागीदारी एरोसिटीला दिल्लीच्या पर्यटन व व्यावसायिक अर्थव्यवस्थेशी एक फोर्स मल्टिप्लायर ठरवेल. हिल्टनचे जागतिक दर्जाचे स्टँडर्ड्स आमच्या जीएमआर एरोसिटीला जागतिक पातळीवरचा दर्जा मिळवून देण्याच्या ध्येयाशी सुसंगत आहेत.

हिल्टनचे आशिया-पॅसिफिक अध्यक्ष अॅलन वॅट्स म्हणाले, जीएमआर एरोसिटीमध्ये वाल्डॉर्फ अॅस्टोरिया आणि आमच्या प्रमुख हिल्टन हॉटेल्स अॅण्ड रिसॉर्ट्स ब्रँड आणणे हा आमच्या भारतातील वाढीच्या धोरणातील एक मैलाचा दगड आहे. ही स्वाक्षरी आमच्या भारतातील पोर्टफोलिओला पुढील दशकात दहापटीने वाढवण्याच्या उद्दिष्टाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

जीएमआर समूहाच्या एअरपोर्ट लँड डेव्हलपमेंटचे सीईओ अमन कपूर म्हणाले, ही भागीदारी जीएमआर एरोसिटी, नवी दिल्लीला जागतिक दर्जाचे डेस्टिनेशन म्हणून उभारते. आमचे नेहमीच ध्येय हे एकत्रित, जागतिक दर्जाचे केंद्र बनवण्याचे राहिले आहे, जे सामाजिक व आर्थिक प्रभाव घडवतात. या दोन प्रतिष्ठित ब्रँड्ससाठी हिल्टनसोबतची भागीदारी ही आमच्या या बांधिलकीचे प्रतिक आहे.

## कुमकुम भाग्यमधील अभिनेता नमिक पॉलने सेटवरील कॉर्नरला बदलले वर्कआऊट झोनमध्ये



**मुंबई, ५ जून :** झी टीव्हीवरील कुमकुम भाग्य आपल्या मनावरील पकड घेणारे प्लॉटमधील ट्विस्ट्स आणि प्रगल्भ होत जाणारी पात्रे यांसोबत प्रेक्षकांचे हृदय जिंकत आहे. मालिकेतील हल्लीच्या अॅक्शनने भरलेल्या दृश्यांमध्ये शिवांश (नमिक पॉल) आपली पत्नी प्रार्थना (प्रणाली राठोड) ला वाचवण्यासाठी मोठे प्रयत्न करत असून तो गुंडांसोबत मारामारी करतो. त्याच्या अॅक्शनपॅक कामाने प्रेक्षक अतिशय प्रभावित झाले असून उत्तम शरीरयष्टी राखण्यासाठी नमिक ऑफस्क्रीन किती मेहनत घेतो आणि शिस्त राखतो ते फारच कमी लोकांना ठाऊक आहे.

कामाचे दीर्घ तास आणि चित्रीकरणाचे डिमांडिंग स्वरूप यांव्यतिरिक्तही नमिकने कुमकुम भाग्यच्या सेटवरच फिटनेसला आपल्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा हिस्सा बनवले आहे. आपल्या कामाप्रति सशक्त मूल्ये आणि निरोगी राहण्याबद्दलची वचनबद्धता यांसह त्याने दोन दृश्यांच्या दरम्यान सक्रिय राहण्यासाठी हलकेफुलके स्ट्रेचेस ते सेटवरच बॉडीवेट वर्कआऊट्स असा कलात्मक मार्ग शोधून काढला आहे. तो आपल्या डाएटमध्ये संतुलन राखतो आणि बहुतेकदा घरी बनवलेले जेवणच जेवतो आणि आपल्या शरीराला नियमितपणे हायड्रेट करतो, ज्यामुळे त्याला ऊर्जा राखायला आणि आपले केंद्रित ठेवायला मदत होते.

नमिक पॉल म्हणाला, माझ्यासाठी आरोग्य आणि तंदुरुस्ती यांच्यासोबत कधीच तडजोड होऊ शकत नाही. हे केवळ एखाद्या प्रकारे दिसण्याबद्दल नसून आतून सशक्त वाटणे, तरतरी असणे आणि माझ्या मन आणि शरीरावर माझे नियंत्रण असण्याबद्दल आहे. कुमकुम भाग्यच्या सेटवर दृश्यांच्या दरम्यान जेव्हा मला उसंत मिळते तेव्हा मी काही पुशअप्स मारतो, जंपिंग जॅक्स करतो किंवा केवळ निव्वळ वॉक करतो.

## एप्लास्टिक ॲनिमिया हा ॲनिमियाच्या इतर प्रकारांहून भिन्न का आहे

**अकोला, ५ जून :** एप्लास्टिक ॲनिमिया ही रक्ताची एक अशी दुर्मिळ व्याधी आहे, ज्यात बोनमॅरोमधून विकृत स्टेम पेशी निर्माण केल्या जातात, जो बरेचदा कुटुंबामध्ये एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पोहोचतो व सर्वसाधारणपणे लहानपणी किंवा प्रौढपणाच्या सुरुवातीच्या टप्प्यावर त्याचे निदान होते. याउलट ॲनिमियामध्ये शरीर पुरेशा संख्येने पांढऱ्या पेशी (आरबीसी) तयार करण्यास असमर्थ असते. एप्लास्टिक ॲनिमिया हा फक्त ॲनिमिया नव्हे, तर तो एक पॅन्सायटोपेनिया आहे, एक अशी वैद्यकीय स्थिती ज्यामुळे सर्व प्रकारच्या रक्तपेशींची संख्या लक्षणीयरित्या कमी होते, ज्यात अस्थिमज्जा म्हणजे बोन मॅरो निकामी झाल्याने ल्युकोपेनिया (पांढऱ्या पेशींचा अभाव), ॲनिमिया (आरबीसीची संख्या कमी असणे) आणि थ्रॉम्बोसायटोपेनिया (प्लेटलेट्सची संख्या कमी असणे) या तिन्ही स्थिती तयार होतात.

तुमच्या डॉक्टरांना एप्लास्टिक ॲनिमियाचा संशय असल्यास ते कदाचित तुम्हाला रक्तपेशींची पातळी मोजणारी व एप्लास्टिक ॲनिमियाचे निदान करण्यासाठी वापरण्यात येणारी कम्प्लिट ब्लड पिक्चर (सीबीपी) ही चाचणी, किंवा तुमच्या रक्तपेशी व प्लेटलेट्समधील बदलांचे सुस्पष्ट चित्र पुरविणारी पेरिफेरल ब्लड स्मिअर चाचणी करायला सांगतील, जे कदाचित आजाराचे एक चिन्ह असू शकेल. पेरिफेरल ब्लड स्मियर चाचणी हा आजाराच्या निदानाचा एक महत्त्वाचा भाग आहे. निदान वैद्यकीय आणि कौटुंबिक पूर्वेतिहास, एक शारीरिक तपासणी आणि चाचण्यांचे निष्कर्ष यांच्यावर आधारित असते, ज्यात रक्तचाचण्या, बोन मॅरो चाचण्या व इतर तपासण्यांचा समावेश असू शकतो. एप्लास्टिक ॲनिमियावर उपचार न केल्यास ती एक जीवघेणी स्थिती बनू शकते व या आजाराच्या उपचारांमध्ये बोन मॅरो ट्रान्स्प्लान्ट, इम्युनोसप्रेसिव्ह थेरपी, ब्लड ट्रान्स्फ्युजन आणि औषधोपचारांचा समावेश असू शकतो.

एप्लास्टिक ॲनिमिया आणि ॲनिमिया (पोषणाशी संबंधित) या दोघांमध्येही थकवा, डोकेदुखी, गरगरणे अशी सारखीच लक्षणे दिसतात. याशिवाय एप्लास्टिक ॲनिमिया असलेल्या व्यक्तींना पांढऱ्या रक्तपेशींची संख्या कमी झाल्याने जंतुसंसर्गाशी लढा देणे अधिक कठीण जाते. हे कोणत्याही वयात, विशेषत: किशोरवयात व विशीत घडू शकते, मात्र ५५ ते ६० वर्षांच्या दरम्यान ही स्थिती उद्भवण्याची शक्यता तुलनेने अधिक असते. लुपससारखी ऑटोइम्युन म्हणजे रोगप्रतिकार यंत्रणेतील बिघाडामुळे उद्भवणारी स्थिती याला निमित्त ठरू शकते आणि काही दुर्मिळ प्रकरणांमध्ये एप्स्टेन-बार, पर्व्होव्हायरस बी१९ आणि गोवरपणाशी संबंधित घटकांमुळे एप्लास्टिक ॲनिमिया बळावू शकतो. खाण्याच्या सवयी, आहार व पोषण यांतील बदलांमुळे एप्लास्टिक ॲनिमिया रोखता येत नाही वा त्यावर उपचार करता येत नाही हे खरे असले तरीही या स्थितीमध्ये आहाराशी संबंधित काही विशिष्ट मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे गरजेचे ठरू शकते.

नागपूर येथील मॅक्स हॉस्पिटलमधील कन्सल्टन्ट हिमॅटोलॉजिस्ट अँड बीएमटी डिपार्टमेंट डॉ. राहुल अरोरा सांगतात, एप्लास्टिक ॲनिमियाचा एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यावर लक्षणीय परिणाम होतो, कारण यामुळे जाणवणाऱ्या थकवा, गरगरणे व एकूणच थकलेपणाची जाणवणारी भावना यांसारख्या लक्षणांमुळे त्यांची नेहमीची कामे करण्याची क्षमता कमी होते. त्यांना खूप प्रमाणात रक्तस्राव होत असल्याचे जाणवू शकते किंवा पुन्हा-पुन्हा संसर्ग होऊ शकतो, ज्यामुळे वारंवार हॉस्पिटलमध्ये दाखल होणे व ब्लड ट्रान्स्फ्युजन्स करून घेणे गरजेचे ठरू शकते. यामुळे त्यांच्या दैनंदिन आयुष्यामध्ये अडथळे येऊ शकतात व अखेरीस ते समाजापासून अलग पडू शकतात. खेळामध्ये भाग घेताना, विशेषत: क्रिकेट, हॉकी, बास्केटबॉलसारख्या इतरांशी शारीरिक स्पर्श होईल अशा खेळांमध्ये त्यांना दक्ष रहावे लागते, कारण त्यामुळे रक्तस्रावास कारणीभूत ठरणारी इजा होण्याची किंवा लक्षणे व चिन्हे बळावण्याची शक्यता असते.

या स्थितीच्या दीर्घकालीन स्वरूपामुळे व्यक्तीच्या मनावरही लक्षणीय परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे काही काळासाठी ती व्यक्ती निराशा, तणाव व चिंतेच्या आहारी जाऊ शकते. वैद्यकीय आरोग्यकर्मींनी उपचारांचा भाग म्हणून रुग्णाच्या शारीरिक तसेच मानसिक स्थितीलाही प्राधान्य देणारा सर्वसमावेशक दृष्टिकोन अंगिकारायला हवा.

## भारतीय स्टार्टअप 'एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनल'चे नॅसडॅकवर पदार्पण



**नागपूर, ५ जून :** भारतीय वैद्यकीय तंत्रज्ञानाने जागतिक पातळीवर आणखी एक मोठी भरारी घेतली आहे. स्वदेशी एसएसआय मंत्र सर्जिकल रोबोटिक सिस्टिम बनवणाऱ्या एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनलने आज न्यूयॉर्क शहरातील नॅसडॅक मार्केटसाईटमध्ये पदार्पण केले आहे. कंपनीचे शेयर्स 'एसएसआयआय' या टिकीट सिम्बॉलअंतर्गत सूचिबद्ध करण्यात आले आहेत.

एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनलचे संस्थापक, अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ सुधीर श्रीवास्तव यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या विशेष समारोहात कंपनीच्या व्यवस्थापन टीमचे सदस्य, संचालक मंडळ, मुख्य सल्लागार आणि खास पाहुणे देखील सहभागी झाले होते. हा टप्पा भारतासाठी एक अभिमानाचा क्षण आहे. प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञानामध्ये देशाचे अधिकाधिक मजबूत होत चाललेले नेतृत्वस्थान यामुळे अधोरेखित झाले आहे. नावीन्याचे एक नवे युग अवतरत असल्याचे आणि भारतात तयार करण्यात आलेल्या आरोग्य देखभाल उपाययोजना, उत्पादनांना जागतिक पातळीवर मान्यता मिळत असल्याचे यामध्ये दिसून आले आहे.

एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनलचे संस्थापक, अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ सुधीर श्रीवास्तव यांनी सांगितले, एप्रिल ०५ मध्ये नॅसडॅकमध्ये आमच्या यशस्वी अपलिस्टिंगचा आनंद आम्ही साजरा करणारा, आजचा बेल-रिंगिंग समारंभ एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनलमध्ये आम्हा सर्वांसाठी एक अभिमानाचा क्षण होता. हा महत्त्वाचा टप्पा एसएसआय मंत्र ही भारतात डिझाईन आणि तयार करण्यात आलेली प्रगत, परवडण्याजोगी आणि जागतिक दर्जाची सर्जिकल रोबोटिक सिस्टिम विकसित करण्यात आमच्या टीमने घेतलेले अथक प्रयत्न दर्शवतो. १०० पेक्षा जास्त प्रकारच्या सर्जरीजमध्ये ००० पेक्षा जास्त रोबोटिक प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केल्याचा आनंद देखील आम्ही साजरा करत आहोत, त्यामध्ये कोणतीही गुंतागुंत, अपघात किंवा मृत्यू झालेले नाहीत, हे यश या सिस्टिमची अचूकता आणि सुरक्षा दर्शवते. एसएसआय मंत्रला फक्त भारतातील नव्हे तर सहा इतर देशांमधील सर्जन मोठ्या प्रमाणावर वापरू लागले आहेत. युरोपियन युनियन आणि युनायटेड स्टेट्स यांच्यासह प्रमुख जागतिक बाजारपेठांमध्ये विस्तार करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आमचे मिशन सुस्पष्ट आहे: अत्याधुनिक रोबोटिक सर्जरी जगभरातील रुग्णांसाठी उपलब्ध आणि परवडण्याजोगी करावी, यामध्ये भारत कायम आघाडीवर असावा.

क्लिनिकल मान्यता मिळालेल्या आणि पेटंटेड एसएसआय मंत्र सर्जिकल रोबोटिक सिस्टिमसह एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनलने लक्षणीय प्रगती केली आहे. सध्या ही सिस्टिम भारतभरातील ५ ठिकाणी ० हॉस्पिटल्समध्ये इन्स्टॉल करण्यात आली आहे. कंपनीने आंतरराष्ट्रीय पातळीवर नेपाळ, इक्वाडोर, ग्वाटेमाला, फिलिपाईन्स, इंडोनेशिया, श्रीलंका, कोलंबिया आणि युक्रेन या देशांमध्ये आपला विस्तार केला आहे. १०० पेक्षा जास्त सर्जिकल प्रक्रियांमध्ये ००० पेक्षा जास्त रोबोटिक सर्जरी यशस्वीपणे करण्यात आल्या आहेत. एसएसआय मंत्र हा एक सहज परवडण्याजोगा उपाय असल्याने जास्तीत जास्त रुग्णांना त्याचे लाभ घेणे शक्य होत आहे. एसएसआयने मंत्रने प्रगत रोबोटिक सर्जरीच्या उपलब्धतेमध्ये एक मोठे परिवर्तन घडवून आणले आहे. युरोप आणि युनायटेड स्टेट्समध्ये विस्तार करण्याची कंपनीची योजना आहे. मेडिकल रोबोटिक्समध्ये जागतिक पातळीवर आघाडीची कंपनी म्हणून एसएस इनोवेशन्स आपले स्थान निर्माण करत आहे, त्याबरोबरीनेच जगभरात आरोग्यसेवा तंत्रज्ञानाच्या भविष्याला आकार देण्यात भारताचे प्रमुख स्थान अधिक मजबूत करत आहे.

## वीर हनुमान मालिकेत हनुमान आपले आराध्य दैवत श्रीरामांना भेटायला अयोध्येला जायचे ठरवतो



**मुंबई, ५ जून :** भावनिकदृष्ट्या समृद्ध आणि आध्यात्मिक आनंद देणारे कथानक सादर करून सोनी सबवरील वीर हनुमान मालिकेने प्रेक्षकांचे मन जिंकून घेतले आहे. या मालिकेत छोट्या मारुतीच्या भूमिकेत आन तिवारी, केसरी आणि अंजनीच्या भूमिकेत अनुक्रमे आरव चौधरी आणि सायली साळुंखे तर वाली आणि सुग्रीवच्या दुहेरी भूमिकेत माहिर पांधी दिसत आहे. मालिकेत आता एक भावनिक टर्निंग पॉइंट आला आहे. यावेळी हनुमानाच्या भक्तीची कसोटी होणार आहे. प्रेक्षकांनी अलीकडच्या भागांमध्ये हनुमान आणि शनिदेव (ऋषभ पवार) यांच्यातील संघर्ष बघितला आहे. आगामी भागांमध्ये प्रेक्षक एक भावनिक आणि मोठे वळण बघणार आहेत. हनुमान आता दिव्य शोधासाठी निघाला आहे. आपले आराध्य श्रीराम यांच्या शोधार्थ अयोध्येला जाण्याचा निर्णय तो घेतो. एका भावाकुल स्थितीतून तो या मिशनवर निघाला आहे. आपली माता अंजनी हिला कायमसाठी किष्किंधा सोडून जाण्याच्या विचारापासून त्याला प्रवृत्त करायचे आहे. पण वेळ निसटून चालली आहे आणि नियती पुढे उभे ठाकली आहे. हनुमान श्रीरामाकडे वेळेवर पोहोचणार का? की भक्तीच्या या मार्गात त्याच्या समोर काही अनपेक्षित वळणे असणार आहेत?

अंजनी मातेची भूमिका करणारी सायली साळुंखे म्हणते, अंजनी मातेची भूमिका करणे ही माझ्यासाठी खूप भावनिक बाब आहे. एक आई म्हणून अपराधी भावना आणि प्रेम यांच्यात तिची कुतरओढ होत आहे. आपण येथे असल्यामुळेच किष्किंधा नगरीत अशांतता आहे, असे तिला वाटते. आपला मुलगा हनुमान याला सोडून जाणे हा क्लेशदायक आणि आत्म्याला पिळवटून टाकणारा निर्णय आहे. या दृश्यात एका आईच्या बलिदानाचे गहिरेपण दिसून येते तसेच आपल्या मुलाच्या रक्षणार्थ एक आई कुठवर जाऊ शकते, स्वत:चा देखील हिरमोड करू शकते हे या दृश्यात दिसते. एक अभिनेत्री म्हणून अंजनीच्या मौनाचा प्रत्येक क्षण, तिचे सामर्थ्य आणि तिच्या मनातील वादळ मी अनुभवू शकते. हे दृश्य आपल्याला स्मरण देते की, कधीकधी, प्रेमात केलेली सगळ्यात सुंदर कृती ही प्रिय वस्तूच्या त्यागात असते.

## कामगार वर्गाच्या प्रश्नांचे उत्तर भाजपा विचारधारेतच आहे : रविंद्र चव्हाण



**अमरावती, ५ जून :** आमदार रविंद्र चव्हाण यांनी भाजपा कार्यकारी अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर, त्यांच्या कार्यशैलीने संघटनेत गतिमानता आणल्याचे दिसून येत आहे. डोंबिवलीसारख्या भाजपाच्या बालेकिल्ल्यातून आमदार म्हणून सलग चार वेळा निवडून येणाऱ्या रविंद्र चव्हाण यांनी भाजपाच्या उज्ज्वल विचारसरणीचा झेंडा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याबरोबरच राज्यातील विविध पक्षांतील अनेक महत्त्वाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपात प्रवेश करत आहेत. अनेक क्षेत्रात काम करणाऱ्या अंगीकृत संस्था त्याचसोबत विविध समाज घटक यांना भाजपाच्या प्रवाहात आणण्याचा झपाटा रविंद्र चव्हाण यांनी लावला आहे.

मुंबईत झालेल्या एका कार्यक्रमात कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाच्या अध्यक्षपदी नेमणूक झाली. सदर कार्यक्रमात बोलताना रविंद्र चव्हाण म्हणाले की कामगार वर्गाच्या प्रश्नांचे उत्तर भाजपा विचारधारेतच आहे. अंत्योदयाचे दिव्य स्वप्न साकार करण्यासाठी भाजपा परिवार सदैव कटिबद्ध आहे. यामुळे कामगार वर्गासमोर असणाऱ्या असंख्य छोट्या-मोठ्या प्रश्नांचे समाधान केवळ भाजपा विचारधारेतच आहे, हे कामगार वर्गाला भाजपाकडे आकृष्ट करण्यात यशस्वी ठरत आहे. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील कामगार वर्गाने मोठ्या संख्येने आपल्या भाजपा परिवारात प्रवेश करत आहे. शिव वाहतूक सेना उबाठा गटाचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. महेश सुधाकर पोरे, महाराष्ट्र उपाध्यक्ष संजय चावनेकर, रायगड जिल्हाध्यक्ष अच्युत पाटील, रायगड जिल्हा संघटक विनायक बेलोसकर, खारघर शहर अध्यक्ष मोहसिन शेख यांच्या सोबत मुंबई, नवी मुंबई, रायगड, धुळे, जळगाव, चंद्रपूर, बीड येथील शिव वाहतूक सेनेचे जिल्हाध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी आज विकासाचे 'कमळ' हाती घेतले आहे. तसेच इंडिगो एआईल एअरपोर्ट प्रायव्हेट लि. मुंबई विमानतळ, बीडब्लूएफएस मुंबई विमानतळ, एयर इंडिया, स्पाईसजेट एअरलाईन अशा विविध वाहतूक कामगार संघटनांचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी देखील भाजपाचा ध्वज हाती घेतला.

## कलाकार सुचवत आहेत काही छोट्या छोट्या कृती, ज्यांच्यामुळे मोठा फरक पडू शकतो

मुंबई, ५ जून : जागतिक पर्यावरण दिन पृथ्वी संरक्षणाबाबतच्या आपल्या सामूहिक जबाबदारीची जाणीव आपल्याला करून देतो. हवामान बदलाविषयी जागरूकता निर्माण करण्यापासून ते चांगल्या सवयी अंगी बाणवण्यापर्यंत पर्यावरण दिन प्रत्येकाला अधिक हरित भविष्यासाठी अर्थपूर्ण कृती करण्याचे प्रोत्साहन देतो. या दिवसाची लक्षणीयता सांगताना सोनी सब वाहिनीवरील मालिकांमध्ये काम करणारे करुणा पांडे, वृही कोडवारा, परिवा प्रणती आणि आदित्य रेडिज हे कलाकार पर्यावरणविषयक जागरूकता, व्यक्तिगत ईको-फ्रेंडली सवयी याविषयी आपले मत मांडत आहेत आणि यंदा हा दिवस ते कशा प्रकारे साजरा करणार आहेत, हे देखील सांगणार आहेत.

## कलाकार सांगत आहेत, कोणाच्या प्रेरणेने त्यांच्या मनात अभिनयाविषयीची ओढ निर्माण झाली

**मुंबई, ५ जून :** प्रत्येक कलाकाराच्या मागे एक मार्गदर्शक प्रकाश असतो, जो त्यांना स्वप्न बघण्याची प्रेरणा देतो. सोनी सबच्या मालिकांमध्ये काम करत असलेल्या आपल्या लाडक्या कलाकारांसाठी अभिनय हा केवळ प्रसिद्धी आणि पैशाचा ध्यास नाही; तर त्यांना प्रेरित करणाऱ्या, शिकवणाऱ्या आणि घडवणाऱ्या आदर्श व्यक्तींच्या पावलावर पाऊल टाकून केलेला प्रवास आहे!.

तेनाली रामा मालिकेत राजा कृष्णदेवरायाची भूमिका करणारा आदित्य रेडिज म्हणतो, मी अभिनय निवडण्याअगोदर अभिनय कलेनेच माझी निवड केली होती. मला पहिल्यापासून कथाकथन करण्याची आवड होती, मंचावर किंवा कॅमेऱ्यासमोर. प्रत्येक वेळी नव्या व्यक्तिरेखेत शिरल्यावर मला जो आनंद मिळायचा, त्यामुळे माझा निर्णय ठाम होऊ लागला. शाहरुख खानचा प्रवास बघताना मला नेहमीच प्रेरणा मिळते. चित्रपटाची पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातून तो आला आहे. त्याने खूप संघर्ष केला आणि निव्वळ आपल्या प्रतिभेच्या आणि परिश्रमाच्या बळावर आपले आगळे स्थान निर्माण केले. टेलिव्हिजनकडून चित्रपटांकडे झालेला त्याचा प्रवास या गोष्टीची साक्ष देतो की, तुमचा जर स्वत:वर विश्वास असेल आणि तुम्ही आपल्या लक्ष्यावर लक्ष केंद्रित ठेवले, तर स्वप्न नक्की पूर्ण होतात. त्याला यशस्वी होताना पाहून आमच्यासारख्या बऱ्याच जणांना नवी आशा मिळाली आणि त्याच्याच पावलावर पाऊल टाकून त्यांनी प्रवास सुरू केला.

## आज का अंदाज

शुक्रवार ६ जून २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | मुंबई बाजार |
|---|---|
| २ ५ ७ ० | २ ४ ६ ७ |
| ३४० १२२ १२४ १३६ | ११० ११२ १२३ १२४ |
| २५५ २६७ २२३ ३८९ | २०० २४७ २४० २२३ |
| ३४५ ३६६ ३४० ४६० | ४७० ३४६ ३३० ५६६ |
| २३ ५४ ७४ ०३ | २१ ४१ ६२ ७१ |
| २४ ५६ ७५ ०४ | २६ ४३ ६४ ७४ |
| २० ५८ ७० ०८ | २१ ४७ ६७ ७८ |

**६ जून : सर्व बाजारासाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | ४२ | ६२ | ०४ |
| २४ | ४६ | ६४ | ०५ |
| २९ | ४८ | ६७ | ०७ |

## राशीभविष्य

**मेष :** आज घराबाहत काही समस्या असू शकते. आज आर्थिक क्षेत्रात चढ-उतार येतील. आर्थिक बाबी स्पष्ट करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे लागेल.

**वृषभ :** तुम्हाला महत्वाच्या योजनेची जबाबदारी मिळू शकते. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी जवळीक वाढल्यामुळे तुम्हाला नोकरीत उच्च पद मिळू शकेल. प्रेमसंबंधांमध्ये जवळीक निर्माण होईल.

**मिथुन :** आज तुमचा नोकरीचा शोध पूर्ण होईल. चांगले काम मिळेल. महत्त्वाच्या कामात येणारे अडथळे दूर होतील. आई-वडिलांची खूप आठवण येईल. त्यांच्यापासून दूर राहणे वेदनादायक असेल.

**कर्क :** आजनशीब तुमच्यासोबत असेल. सरकारच्या मदतीने कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील. व्यवसायात तुम्हाला तुमच्या वडिलांकडून पाठिंबा आणि साथ मिळेल.

**सिंह :** आज तुम्ही क्रीडा स्पर्धेत यशस्वी व्हाल. न्यायालयीन प्रकरणांमध्ये यशस्वी व्हाल. शेतीच्या कामात गुंतलेल्या लोकांना सरकारी मदत मिळेल. नोकरीत महत्त्वाची जबाबदारी मिळू शकते.

**कन्या :** व्यवसायात नवीन भागीदार फायदेशीर ठरतील. जमा भांडवलात वाढ होईल. वाहन खरेदी करण्याच्या योजना यशस्वी होतील. आज तुम्ही तुमच्या प्रियजनांना प्रेमविवाहाच्या योजना सांगू शकता.

**तुळ :** आज तुमचे आरोग्य चांगले राहील. तुम्ही शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या फिट, निरोगी असाल. आरोग्याशी संबंधित कोणत्याही समस्या उद्भवणार नाहीत. दिवस सुखकर जाईल.

**वृश्चिक :** अनावश्यक धावपळ होईल. सहकाऱ्यांशी मतभेद होऊ शकतात. नोकरीच्या ठिकाणी बदल होऊ शकतो. उच्चपदस्थ आणि प्रतिष्ठित लोकांशी संपर्क स्थापित होतील.


**धनु :** कामाच्या ठिकाणी तुम्हाला नवीन सहकारी मिळतील. तुमच्या मुलांकडून तुम्हाला पाठिंबा मिळेल. व्यवसायात एखाद्या प्रिय व्यक्तीकडून तुम्हाला पाठिंबा मिळेल.

**मकर :** आज तुम्हाला नोकरीत बढती मिळण्याची शक्यता आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये कार्यरत लोकांना त्यांच्या बॉसचा पाठिंबा आणि साथ मिळेल. व्यवसायात प्रगतीसोबतच नफाही मिळेल.

**कुंभ :** आज दिवसाची सुरुवात तणाव आणि धावपळीने होईल. जर प्रेमसंबंधांमध्ये काही धोका असेल तर आज कोणताही धोका पत्करू नका. अन्यथा त्रास होऊ शकतो. कामात प्रचंड मेहनत करावी लागेल.

**मीन :** तुमची आर्थिक स्थिती सुधारेल. पैशाशी संबंधित कोणत्याही कामातील अडथळे दूर होतील. व्यवसायात उत्पन्न वाढेल. नवीन प्रेमसंबंधांमध्ये पैसे आणि दागिने मिळण्याची शक्यता असेल.

## शब्दकोडे क्रमांक २१२९



**आडवे शब्द :-**
१) आपल्या ऐपती प्रमाणे (अल्प का होईना) देणे
८) श्रीमंत
११) बंगाल
१२) मोठी वाटी
१३) ढीग
१४) देणारा
१५) कोर्टात गुदरलेला खटला
१६) नाचणी धान्य
१७) एक सुगंधी वनस्पती
१९) दूर करणारा
२०) वेडा
२२) भेसळ
२४) माल राखून ठेवण्याची जागा
२५) गोसावी, भटक्या माणूस
२८) लाज
२९) वेडा (हिं)
३०) गृह
३१) रथ चालविणारा
३३) रसाने भरलेले
३५) उद्याच्या नंतरचा दिवस
३७) प्रथम, उत्कृष्ठ
३८) निमग्न, रममाण
४१) घमघमाट
४२) सोपे
४४) गढीमाणसे
४७) डुकर
४९) सोन्याचा धागा
५०) वर-वधूमधील पडदा
५३) प्रफुल्लित
५५) दोन मैलाचे अंतर
५६) संध्याकाळ
५७) बासरी
५८) पुरुष
५९) रसाळ्या आंब्याची एक जात
६०) माणसाच्या डोक्याची कवटी
६३) गाय
६४) फक्कड, छानदार
६६) बाण
६८) रंग (इं)
६९) वांती
७२) झाडाची पाने
७३) संकलन, अनेक वस्तू गोळा करणे
७६) फणसातील खाद्यभाग
७८) द्रवपदार्थ
७९) होकाराच्या विरुद्ध
७०) स्तुती करणारा, भाट
८१) अधांतरी, लटकत ठेवणे

**उभे शब्द :-**
२) अत्यंत तिखट बारीक आकाराची मिरची
३) सर्प
४) नि:सत्व, पोकळ
५) तरंग, लहर
६) मर्यादा
७) वाळवी, उणीव
८) आईबाप
९) मोठा भाऊ
१०) कणीदार
१७) मानेवरची सूज, चिकण माती
१८) शुद्ध, पूर्णपणे, स्पष्ट
१९) लाकूड कापण्याचे हत्यार
२१) चांगले वाईट याचे तारतम्य विचार
२३) मेहनत, कष्ट
२४) म्हैस, वगैरे
२६) अंत:करण
२७) हार, वेणी मधील सुगंधी वनस्पती
३०) भाजलेल्या बांग्याचा एक पदार्थ
३२) केवळ
३४) प्रगती, उत्कर्ष
३६) लाकडी जिना
३७) अकस्मात
३९) छिद्र४०) नरसिंह
४३) बारीक केस
४५) चांदी
४६) मेहेरबानी, उपकार
४८) होम, यज्ञात आहुती टाकणे
५०) डोळ्यात सुरमा लावण्याची धातूची कांडी
५१) खोदण्याचे साधन
५२) पत्र
५४) फळाचे आवरण
५५) आंब्याची बी
५९) पराभव
६१) मगज
६२) दिल्लीच्या विमानतळाचे नाव
६५) चटोर, फाजील
६७) एक रंगीत कंदमूळ
६८) कविता रचनारा
७०) जीव जाणे
७१) धमनी, नाडी
७२) पर्ण
७४) बोलणे, वाणी
७५) चाळीस शेर
७७) पौर्णिमा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



महासागर

शुक्रवार दि. ६ जून २०२५

खामगाव (बुलडाणा)

पान ६

## माजी आ.सानंदांचा काँग्रेसच्या सदस्यत्वाचा राजीनामा



**खामगाव (का.प्र.)** – काँग्रेसचे माजी आमदार दिलीपकुमार सानंदा अखेर काँग्रेसमधून बाहेर पडले आहे. त्यांनी आपल्या सदस्यत्वासह पक्ष संघटनेतून सर्व पदांचा राजीनामा काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकाअर्जुन खरगे यांच्यासह राज्य व जिल्हा पदाधिकाऱ्यांना ३१ मे रोजी पाठविला आहे. खामगाव मतदार संघातून तब्बल १९९९ ते २००९ पर्यंत आमदार राहिलेले दिलीप सानंदा यांनी १९८५ पासून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे काम सुरु केले होते. त्यांनी आतापर्यंत पक्षाच्या विविध पदांवर काम सुध्दा केले आहे. तब्बल पाच वेळा काँग्रेसेने त्यांना खामगाव मतदार संघाची उमेदवारी दिली होती. असे असतांना त्यांनी अखेर काँग्रेस पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे त्यांचा राजीनामा राजकीय क्षेत्रात चर्चेचा ठरला आहे.

# जिल्ह्यात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण व रॅली

### खामगावात जनुना तलाव परिसरात १००० हजार वृक्षांचे रोपण * जिल्ह्यात वृक्ष दिंडी काढून विद्यार्थ्यांनी केले वृक्षसंगोपन



खामगाव



वरवट बकाल



शेगाव

**खामगाव (का.प्र.)** – स्थानिक जनुना तलाव परिसरात १३ महाराष्ट्र एनसीसी बटालियन खामगाव व नगरपरिषद खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त १ हजार वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून खामगाव नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ. प्रशांत शेळके,एनसीसी बटालियनचे दिनेश कुमार खामगाव नगरपालिकेचे उपमुख्याधिकारी आनंद देवकाते सर, नगर अभियंता प्रभाकर लबडे, उपाभियंता राजेंद्र म्हस्के, यांच्यासह बचत गटाच्या महिला एनसीसी बटालियनचे विद्यार्थी अधिकारी कर्मचारी वृंद उपस्थित होते. या वर्षी सुद्धा जागतिक पर्यावरण दिनाचे निमित्त साधून खामगाव नगरपालिकेच्या वतीने सुमारे २० हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवून नगर परिषदेच्या वतीने खामगाव शहर परिसरात वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. याचाच एक भाग म्हणून जनुना तलाव परिसरात दिनांक ५ जून रोजी १००० वृक्षांचे रोपण व लागवड या ठिकाणी करण्यात आली आहे.

**देऊळगाव राजा (महासागर प्रतिनिधी)**– पर्यावरणाला गृहित धरण्याच्या मानवी प्रवृत्तीमुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे.त्याचा सर्व सजीव सृष्टीवर विघातक परिणाम होत आहे.यातूनच पर्यावरणा बाबतच्या जागृतीची गरज निर्माण झाली.म्हणूनच १९७२ साली युनोच्या सर्वसाधारण सभेने मानव व पर्यावरण या विषयी आयोजित केलेल्या परिषदेत पर्यावरण दिन साजरा करण्याचे ठरविले.संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण विषयक कार्यक्रमातून पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी सामाजिक, राजकीय,औद्योगिक तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या पातळीवर कृतिशील सहभाग मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवले गेले. त्यानुसार शाश्वत विकासावर भर देण्यात आला. असे प्रतिपादन समर्थ कृषी महाविद्यालय चे सचिव सतिश कायंदे यांनी ५ जून रोजी विश्व पर्यावरण दिवस निमीत्ताने भारतीय जैन संघटना व समर्थ कृषी महाविद्यालय चे संयुक्त विद्यमाने आयोजीत कार्यशाळेत केले. यावेळी चे सन्मती जैन व पियूष खडकपूरकर, प्रा. सचिन सोळंकी उपस्थीत होते.

**संग्रामपूर (महासागर प्रतिनिधी)**: पर्यावरणाची गुणवत्ता वाढविणे,समस्या व संवर्धन विषयीजागरुकता निर्माण करणे आणि पर्यावरण विषयक निर्णय घेण्याची क्षमता निर्माण व्हावी.व पोषक वातावरण निर्माण करणे.ह्या उद्देशाने दरवर्षी पर्यावरण दिन साजरा करण्यात येतो.त्यानुसार तालुक्यातील वरवट (बकाल) येथील सहकार विद्या मंदिर येथे आज ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनाचा औचित्य साधून वृक्ष दिंडी काढून व वृक्षरोपण करून संगोपनाची विद्यार्थी यांनी घेतली शपथ घेवून पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. ह्यावेळी सहकार विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष किशोर केला व सहकार विद्या मंदिर मुख्य संयोजिका डॉ.स्वाती केला यांचे मार्गदर्शनाखाली प्राचार्य योगेश घाटोळे.उपप्राचार्य रामेश्वर कोकाटे सह.पर्यवेक्षिका येऊतकार शिक्षीका मानकर यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन व दिप प्रज्वलन करण्यात आले. ह्यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षीका शितल सावतकर यांनी केले .प्राचार्य घाटोळे सर यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्व पटवून दिले. तसेच वर्ग तिसरीतील विद्यार्थिनींनी ''झाडे लावा झाडे जगवा'' ही छोटीशी कविता सादर करून विद्यार्थ्यांना संदेश दिला.

**शेगाव (महासागर प्रतिनिधी)** आज ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने शेगाव रेल्वे स्थानकावर पर्यावरण जागरूकतेसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी पर्यावरण संवर्धन व शाश्वत विकास याबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी एक रॅली काढण्यात आली. स्टेशन प्रबंधक, आरोग्य निरीक्षक, रेल्वे कर्मचारी या रॅलीमध्ये उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. या रॅलीद्वारे प्लास्टिकमुक्त पर्यावरण, वृक्षसंवर्धन, जलसंधारण आणि स्वच्छता यासारख्या महत्वाच्या विषयांवर संदेश देण्यात आले. ''स्वच्छ, हरित व निरोगी भारत'' या ध्येयाचा अंगीकार करून सर्वांनी पर्यावरण रक्षणाची जबाबदारी स्वीकारावी, हा मुख्य उद्देश होता. या उपक्रमाचा एक भाग म्हणून शेगाव रेल्वे स्थानक परिसरात वृक्षारोपण मोहिम राबविण्यात आली. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानक प्रमुख आणि त्यांच्या टीमचे विशेष योगदान राहिले.

## थोडक्यात

### भुमि अभीलेख विभागाच्या कर्मचाऱ्यांचे बेमुदत काम बंद आंदोलन

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)** – भुमि अभीलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या मान्य न झाल्याने या कर्मचाऱ्यांनी ३ जुन पासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे. महाराष्ट्र राज्य भुमि अभीलेख कर्मचारी संघटनेचे वतीने अप्पर मुख्य सचिव महसूल व वन विभाग यांना निवेदन देण्यात आले आहे. सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र राज्य भुमि अभीलेख तांत्रिक कर्मचारी संघटनेने महाराष्ट्र राज्य भुमि अभीलेख कर्मचारी संघटना पुणे विभाग यांनी पुकारलेल्या बेमुदत काम बंद आंदोलनाला पाठिंबा दिला असून या संघटनेचे सभासद १५ मे पासून काळ्या फिती लावून कामकाज करीत आहेत. तसेच मंगळवार ३ जुन पासून बुलढाणा जिल्ह्यातील भुमि अभीलेख कर्मचार्यांनी बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे.

### नांदुरा तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर संपन्न

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)** – विभागाअंतर्गत क्षेत्रीय स्तरावर ग्रामिण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी महिला, विद्यार्थ्यांचे दैनदिन प्रश्नांचे निराकरणे व जनतेच्या तक्रारी तसेच प्रशासन अधिक लोकाभिमूख , कार्यक्षम व गतीमान करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या संकल्पनेतून दत्तक ग्राम योजने अंतर्गत दत्तक घेण्यात आलेल्या नांदुरा तालुक्यातील अलमपुर, वडनेर भोलजी, हिंगणा भोटा, नारखेड, येरळी येथे बुधवार छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबीर आयोजीत करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये संजय गांधी, श्रावण बाळ, पी एम किसान, फार्मर आयडी, राशन कार्ड, आधार कार्ड वारस नोंदणी, तहसिल कार्यालयाचे विविध दाखले, आयुषमान कार्ड, शेत रस्ते आरोग्य शिबीर , जॉब कार्ड, नवीन मतदान कार्ड, सलोखा योजना, फळबाग लागवड, सिचंन साधाने अशा विविध योजनाच्या सुविधा पुरविण्यात आल्या. त्यामध्ये संजय गांधी योजना २७,पुरवठा विभाग- १५, आरोग्य विभाग-८२, महुसल विभाग-१६०, कृषी विभाग-०२ ग्राम पंचायत विभाग-०८, सि.एस.सि. सेन्ट्रर विभाग विविध दाखल वाटप-१७, यांचा समावेश होता.

### गोठ्याला आग सिंचन साहित्य खाक

**संग्रामपूर (महासागर प्रतिनिधी)** – तालुक्यातील तामगाव शेत शिवारात विद्युत तारांचे स्पार्किंग होवून गुरांच्या गोठ्याला आग लागून सिंचन साहित्य व जनावराचा चारा कुटार व टिन पत्र्यासह गोठा जळून खाक झाल्याने शेतकऱ्याचे २ ते अडीच लाख रुपयाचे नुकसान दोन ते अडीच लाख रुपयाचे नुकसान झाल्याची घटना ३ जून रोजी घडली आहे. याबाबत प्राप्त माहिती अशी की तामगाव शेत शिवारात गट नंबर २५ मध्ये महादेव राजाराम धामोळे रा.तामगाव यांचा गुरांचा गोठा असून ३ जूनला दुपारचे सुमारास गोठ्याच्या बाजूला विद्युत तारांचे स्पार्कींग होवून गोठ्याला आग लागली व ह्यामध्ये शेतकऱ्याचे तीन एकरातील ठिबक स्पिंकलर्स ,३५ पीव्हीसी पाईप, दोन फवारणी पंप , ४ ताडपत्री, १२ ट्रॅक्टर ट्रॉली जनावरांचे चा-याचे कुटार, शेणखत लोखंडीअँगल,टिनपत्र्यासह गोठा जळून ह्यामध्ये शेतकऱ्याचे २ ते अडीच लाख रुपयाचे नुकसान झाले असून अग्नीशमन दलास पाचारण करुन आग विझवण्यात आली तो पर्यंत संपूर्ण जळून खाक झाले होते.ह्याबाबत शेतकऱ्याने सहा.अभियंता म.रा.वि.वि.कंनी संग्रामपूर यांना तक्रार दिली आसून नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

## लोकवर्गणीतून नदी खोलीकरणाचे कामास तहसीलदार पवन पाटील यांची भेट



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)**: तालुक्याचे तहसीलदार पवन पाटील यांनी ३ जून रोजी सावरगाव येथे वॉट्स एप ग्रुप च्या माध्यमातून लोकवर्गणी मधून सुरू असलेल्या नदीखोलीकरण करण्याच्या स्तुत्य उपक्रमाला भेट दिली. यावेळी तहसीलदार पवन पाटील यांनी यांनी अतिवृष्टीमुळे नदीपात्राचे झालेले सपाटीकरण त्यामुळे गावात शिरणारे नदीचे पाणी यासारख्या समस्या नागरिकांकडून जाणून घेतल्या. संपूर्ण नदीपात्र खोलीकरण हे लोकवर्गणीतून शक्य नाही. जलयुक्त शिवार किंवा अन्य शासकीय योजनेतून संपूर्ण नदी खोलीकरण करून देण्याची मागणी यावेळी युवासेनेचे तालुकाप्रमुख अमोल दाभाडे यांनी केली. त्यावेळी तहसीलदार पवन पाटील यांनी सकारात्मकता दर्शवून आगामी काळात सदर नदी खोलीकरणाचे व्यापक कामे शासकीय योजनेतून प्रस्तावित करण्यात येणार असल्याचे सांगितले. सावरगाव वासियांनी लोकवर्गणी करून स्वयंस्फूर्तीने खोलीकरणाच्या कामाला सहयोग दिल्याबद्दल तहसीलदारांनी ग्रामस्थांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. आणि सावरगाव वाशियांच्या केलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे अवलोकन संपूर्ण तालुक्याने करावे असे आवाहन सुद्धा त्यांनी यावेळी केले.

## आरोग्य उपकेंद्र नियमित सुरु करा अन्यथा अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासू-शिलवंत इंगळे



**सुलतानपूर (महासागर प्रतिनिधी)**– लोणार तालुक्यातील मौजे चोरपांग्रा, गोवर्धन नगर येथे जवळपास पंचवीस ते तीस वर्षापासून आरोग्यउपकेंद्र अस्तित्वात आहे. मात्र या आरोग्य उपकेंद्राकडे कोणताही वरिष्ठ अधिकारी फिरकत नाही. त्यामुळे त्या ठिकाणी ड्युटीवर असलेलेआरोग्य अधिकारी व कर्मचारी या आरोग्य उपकेंद्रात येण्याची टाळतात, निष्काळजीपणा करतात. व आठवड्यातून एकदाच उपकेंद्र उघतात व थातूर मातूर वेळेपर्यंत काम करून मोकळे होतात. या संदर्भात स्थानिक नागरिक शिलवंत इंगळे यांनी तालुका वैद्यकिय अधिकारी व आरोग्य अधिकारी यांना वेळोवेळी तोंडी माहिती देऊन कळवले मात्र या निगरगट्ठ व काम चुकार अधिकाऱ्यावर काहीच फरक पडला नाही. आता पावसाळ्याचे दिवस सुरु होणार असल्याने घाण पाणी आणि घाणीचे साम्राज्य निर्माण होऊन नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्भवल्यास त्यांना बीबी येथे न्यावे लागेल. परिणामी त्यांना आर्थिक भुर्दंड बसणार, बीबी ते चोरपांग्रा तीन ते चार किलोमीटर अंतर असल्याने रुग्ण दगावण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे चोरपांग्रा येथील शिलवंत इंगळे यांनी लोणार तालुका आरोग्य अधिकारी यांना ३ जुन २०२५ रोजी निवेदन देऊन उपकेंद्र सदैव चालू ठेवण्याची मागणी केली आहे .मागणी मान्य न केल्यास १५ जुन २०२५ पासून तालुखा आरोग्य अधिकारी किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करून अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासू असा इशारा शिलवंत इंगळे यांनी दिला आहे.

### जिल्हा कारागृहात जागतिक पर्यावरण दिन

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)**– जिल्हा कारागृह व सामाजिक वनिकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन जिल्हा कारागृह परिसरात आंबा, सिताफळ, शेवगा, बांबु, तुळस अशा विविध प्रकारच्या झाडांचे वृक्षारोपण करुन जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. अपर पोलीस महासंचालक डॉ. सुहास वारके, कारागृह उपमहानिरीक्षक स्वाती साठे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाची सुरुवात कारागृह अधीक्षक संदिप भुतेकर व डीएफओ विपुल राठोड यांच्या हस्ते वृक्षारोपणाने करण्यात आली.

**नियमित वाचा महासागर**

## महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत भव्य पदस्पर्श दिन सोहळा संपन्न



**सोनाळा (महासागर प्रतिनिधी)**: संग्रामपूर तालुक्यातील पातुर्डा गावाला इतिहास लाभला आहे. या पातुर्डा गावी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह, तुकडोजी महाराज, महात्मा फुले यांचे पदस्पर्श लागून हे गाव पावन झाले आहे. इतिहासकालीन अनेक स्थळे सुद्धा आपले साक्ष देत उभी आहेत. यामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांसाठी खुली करून दिलेली विहीर आहे.

गावात प्रवेश केल्यानंतर बाजारात आपल्याला विहीर पहावयास मिळते त्याच ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ही विहीर २९ मे १९२९ रोजी अस्पृश्यांसाठी खुली केली होती व स्वतः विहिरीचे पाणी काढून लोकांना पाजले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या संग्रामपूर या पवित्र स्थळी अभिवादन करण्यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मोठ्या संख्येने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी व बहुजन समाज मोठ्या संख्येने पदस्पर्श पायी चालत उपस्थित होते. बुलढाणा जिल्ह्यातील व तालुक्यातील भारतीय बौद्ध महासभेचे कार्यकर्ते पदाधिकारी अभिवादन करण्यासाठी उपस्थित होते. पातुर्डा या गावी विविध कार्यक्रम आयोजकांनी आयोजित केले होते. ग्रामपंचायत व गावातील निळ वादळ या संघटनानी भोजनाची व्यवस्था चागल्या प्रकारे केली होती. यावेळी पूज्य भंते ज्ञानज्योती महास्थिर यांनी उपस्थित जन समुदायास धम्मदेसना दिली. पूज्यनीय भिकू संघ, समता सैनिक दल गावातील निळ वादळ संघटना व खेड्यापाड्यातून अभिवादन करण्यासाठी आलेले बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते. व संध्याकाळी अनिरुद्ध बनकर यांच्या गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

जाहिरनामा

**तहसिलदार तथा अध्यक्ष शेतजमीन न्यायाधिकरण,खामगाव यांचे कार्यालय**

क्र.कावि/अका/कुळ/५२६ /२०२५
दिनांक -०३/०६/२०२५

रा.प.क्र.टी.एन.सी. ५९
(३२/लांजुड-१/ / २०२५-२६)

हया जाहिरनाम्याव्दारे सर्वत्र लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरण अर्जदार रामभाऊ शंकर ठाकरे रा.लांजुड ता.खामगांव जि.बुलढाणा यांनी हया कार्यालयामध्ये अर्ज सादर केल्यावरुन सुरु करण्यांत आले. अर्जदार यांनी अर्जात नमुद केले आहे की, त्यांचे मालकीची मौजे लांजुड - १ येथील भुमापन क्र. ३०३ क्षेत्र ०.८३ हे आर. आहे. मधील ७/१२ अभिलेखामधील कुळवहीवाटी कायद्यानुसार साधे कुळ मध्ये हक्क प्राप्त झाल्याबाबतची नोंद कमी करण्याबाबत विनंती केली आहे. अर्जदार यांचे मालकीची खालील वर्णनाची शेतजमीन आहे, ती खालीलप्रमाणे.

| गावांचे नाव | ग.नं. स.नं. | आकार रु. | क्षेत्रफळ हे.आर. | धारणा धिकार | कुळाचे/इतर अधिकाराचे रकान्यातील कुळाची असलेली नोंद |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| मौजे लांजुड -१ | ३०३ | ०.७५ | ०.८३ पैकी हिस्सा ०.४२ | भु.स्वा. | काशिराम गोविंद याज पासून १० रू. ठोक्याने ५८-५९ गोविंद याने पार्वती ज. मोतीलाल बिगर हक्काने ५८-५९ रा.प्र.४९-५९(१)५८-५९ च्या आदेशावरून नामदेव गोविंदा रा.प्र. ४९-५९ यातील ०३/१०/५९ च्या आदेशावरून नामदेव साली वहीत केल्यावरून मु.कू.व शे अ वि |

वरील शेताचे अधिकार अभिलेख गांव नमुना ७ मधील कुळ / इतर अधिकारात नमुद असलेला कुळाचा बोजा कमी करण्यात यावा करीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदाराचे अर्जाचे अनुषंगाने कुळाची असलेली नोंद कमी करणे व अर्जदाराचे नांवे नोंद प्रमाणित करण्याबाबत कुणाला हरकती वा आक्षेप दाखल करावयाचे असल्यास त्यांचे त्यांचे लेखी आक्षेप वा हरकत, हा जाहिरनामा प्रसिध्दीच्या दिनांकापासुन १५ दिवसांचे आंत या कार्यालयात प्रकरणात प्रत्यक्षरित्या सादर करावी. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती किंवा आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक ३/०६/२०२५
स्थळ-खामगाव

शिक्का

तहसिलदार तथा अध्यक्ष
शेतजमीन न्यायाधिकरण खामगाव

**जाहीर नोटीस**

**तहसीलदार शेगाव यांचे कार्यालय**

क्रकावि/प्र.१/३७५/२०२५
दिनाक :- ०२/०६/२०२५

याव्दारे सर्वत्र लोकाना कळविण्यात येत आहे की, अर्जदार अभयकुमार लालचंद गुजराती रा.बाळापुर ता. बाळापुर जि.अकोला यांनी मौजे वरखेड बु. येथील गट नं.२७६ क्षेत्र ४ है २३ आर पो.ख.०.०६ आर या जमीनीचे सातबाराचे इतर अधिकारातील रा प्र २१०/५९/१ यातील ३/१०/५८ च्या आदेशाने वहीतदार तुळशिराम सोनाजी याने सम्रताबाई ज लालचंद हिजपासुन सदर ग.नं.सन ५८-५९ साली २०५ रू.ठोक्याने वहीत केल्यावरून त्यास सामान्य कुळाचा हक्क प्राप्त झाला असे नमुद आहे. वरील विषयाबाबत कोणाची काही तकार / आक्षेप / हरकत असेल तर त्यांनी हि नोटिस प्रकाशीत झाल्याचे दिनांकापासुन १५ दिवसाचे आत या कार्यालयास लेखी स्वरूपात सादर करावी. विहीत मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार करण्यात येणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

शिक्का

तहसीलदार शेगाव

RNINo-MAHMAR 2010/35857 महासागर खामगांव(बुलढाणा) मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय मो.बा.९०२८४५८८८७ भगवान महावीर चौक, खामगाव येथे प्रकाशित केले. मुख्यसंपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय- नागपूर मो.बा.७४४७७३८८५१, ९९२२९७००२३ बुलढाणा जिल्हा आवृत्ती प्रमुख, स्थानिक संपादक यशवंत विनायक पिंगळे मो.बा.९५६१३६१४०४, (शहर कार्यालय-रेल्वेस्टेशन चौक, खामगाव) ई-मेल-yashwantpingle525@gmail.com

# 'स्वित्झरलंड': स्वर्गीय अनुभूती



स्वित्झरलंड युरोपमधील सर्वांत सुंदर देश... येथील घड्याळे आणि चॉकलेट विश्वविख्यात आहेत. येथील हवा खूपच थंड असते. बर्फाच्छादित डोंगर, चारही बाजूंनी व्यापलेली हिरवळ, रंगीबेरंगी फुलांच्या बागा, मधुर आवाजात गाणारे पक्षी, स्वच्छ-सुंदर रस्ते आणि निसर्गसौंदर्याने बहरून गेलेली पर्यटनस्थळे, यामुळे 'स्वित्झरलंड'पर्यटनाचे प्रमुख केंद्र बनले आहे.

येथील 'राईन फॉल'हे पाहण्याजोगे पर्यटनस्थळ आहे. रेल्वेने विंटरथर जाऊन तेथून दुसरी रेल्वे पकडून 'राईन फॉल' येथे जाता येते. या प्रवासातही निसर्गसौंदर्य पाहताना खूपच मजा येते. सुंदर, छोटी-छीटी आणि विशेष म्हणजे स्वच्छ गावे, सगळीकडे हिरवळ आणि त्यामध्ये चरणाऱ्या गाई हे दृश्य पाहताना मन प्रसन्न होऊन जाते. घाटमाथ्यातून गाडी धावू लागली की 'राईन फॉल'आल्याची जाणीव होऊ लागते. रेल्वेतून उतरताच समोर निसर्गसौंदर्याने बहरून गेलेला नजरा दिसतो. धबधब्यांचे जोरदार आवाज, अंगावर उडणारे पाण्याचे तुषार अनुभवत घाटात खाली उतरण्यासाठी पायवाट आहे. घनदाट जंगलातून हा रस्ता गेला आहे. काही अंतर चालल्यावर समोर युरोपातील सर्वांत मोठ्या 'राईन फॉल'दृश्य दिसते आणि आपण थक्क होऊन जातो. पाण्याचे तुषार, त्यावर कोवळे उन्ह पडताच निर्माण होणारे इंद्रधनुष्य, पाहतच बसावेसे वाटते.

येथून रेल्वेने ज्यूरिखला जाता येते. येथील स्विस भोजनाचा स्वाद काही औरच आहे. याठिकाणी मोठे शॉपिंग मार्केट आहे. विशेष करून ज्यूसेस, फ्रूट्स आणि ब्रेडस मिळतात. एक दिवसाच्या मुक्कामानंतर लूजर्नला जाता येते. येथे जाणाऱ्या रेल्वे कमालीच्या फास्ट असतात. स्वच्छ, आरामदायी असण्याबरोबरच बाहेरील निसर्गसौंदर्य पाहण्यासारखे असल्याने कितीही मोठा प्रवास असला तरी थकवा जाणवत नाही. लूजर्नमध्ये राहण्यासाठी चांगली हॉटेल्स आहेत. याठिकाणी प्रसिद्ध लेक लूजर्न आणि चॅपल ब्रिज पाहण्यासारखे आहे. शहराच्या सुरक्षिततेसाठी सेंट पीटर चॅपल यांच्या नावाने हा ब्रिज चौदाव्या शतकात बांधण्यात आला आहे. हा पुल पूर्णपणे लाकडाचा आहे, हे विशेष. दोन्ही बाजूस रंगीबेरंगी फुलांनी सजावट करण्यात आली आहे. वरून पॅक असणाऱ्या या पुलाच्या आतील भागात लूजर्न शहराचा इतिहास सांगणारी चित्रे आहेत.

याठिकाणी 'माउंट पीलेटस' हे खास आकर्षण असणारे स्थळ आहे. लेक लूजर्न येथून बोटीने जाता येते. हा प्रवासातही समुद्राकाठचे निसर्गसौंदर्य आल्हादकारक आहे. बीचवरील सुंदर गावे, डोंगर, हिरवळ पाहता पाहता कॉगविल कधी येते ते समजतच नाही. येथून पुडे रेल्वेने प्रवास करावा लागतो. ही रेल्वे उंचच उंच टेकड्या आणि खोल दऱ्यांमधून धावते. विशेष म्हणजे जगातील सर्वांत चढावरून धावणारी ही रेल्वे आहे. दऱ्याखोऱ्यातून 'माउंट पीलेटस' मध्ये पोहोचल्यावर येथील दृश्य पाहताना स्वर्गीय अनुभूती होते. येथे एक दिवस थांबून धम्माल करता येते. घाटातून रेल्वेप्रवास करण्याचा अनोखा अनुभव घेल्यानंतर खाली उरण्यासाठी केबल कारचा अनुभवही रोमांचकारक आणि कायम स्मरणात राहण्यासारखा आहे. कारण ७००० फुट उंचीवरून आपण काही मिनिटांत खाली येतो.

इंटरलाकन हे पाहण्याजोगे आहे. येथील आल्पस पर्वतरांगामधील जुंगफ्राउ हे स्थळ पाहण्यासारखे आहे. युरोपमधील सर्वांत उंच म्हणूनही याची ख्याती आहे. सुमारे ११ हजार ३३३ फुट एवढ्या उंचीवर जायचे म्हटले तर अंगावर काठा उभा राहतो पण, येथे जाण्यासाठीही आरामदायक रेल्वे आहे आणि निसर्गसौंदर्य पाहताना आपण याठिकाणी कधी पोहोचलो तेच समजत नाही. इंटरलाकनपासून 'जुंगफ्राउ'हा सुमारे अडीज तासांचा प्रवास आहे. पण, शेवटचा तासभरच्या प्रवासात रेल्वे बर्फाच्छादित पर्वतांतून धावत असते, हा नजारा शब्दात व्यक्त करता न येणारा आहे.

जुंगफ्राउ पीकवर 'व्हू पॉईंट्स' आहेत. येथील स्फींक्स ऑब्जर्वेशन हॉल आणि टेरेस पाहताना आपण थक्क होऊन जातो. आईस पॅलेसही पाहण्यासारखा आहे. जिकडे बघाल तिकडे बर्फाने व्यापून टाकलेला परिसर, सुर्यकिरणे पडतात चकाकून जाणारी शिखरे, त्यामध्ये स्कीइंग करताना मुंग्यांसाखरे दिसणारे लोक पाहताना वेगळीच मजा येते. खरोखरच येथून पायच निघत नाही. उंचीवर बॉलीवूड रेस्टॉरंट आहे. याठिकाणी भारतीय पदार्थांचा आस्वाद घेतानाचा अनुभवही काही औरच आहे. भारतीयांबरोबरच युरोपीय लोकही या भोजनाचा आस्वाद घेताना दिसतात.

इंटरलाकन पासून मॉंत्रोला जाता येते. या तीन तासांच्या प्रवासासाठी पारदर्शत रेल्वे आहे. या पेनोरेमिक ट्रेनमधून प्रवास करण्याचा अनुभही सुखद आहे. मॉंत्रोमधील जिनेवा लेक प्रसिद्ध आहे. याला स्विस रिविएराही म्हटले जाते. याठिकाणी जास्तकरून फ्रेंच बोलली जाते. येथील ओल्ड टॉउन फ्रेंडी मर्क्युरी मेमोरियल, केसल चिलिया ही स्थळे पाहण्यासारखी आहेत. येथून 'चॉकलेट ट्रेन' आपल्याला ग्रुएरला घेऊन जाते. येथील गावांमध्ये चीज बनविले जाते. म्हणूनच याला चीज मेकिंग टाउनही म्हटले जाते. याच मार्गावर येणाऱ्या 'ब्रोक' येथे जगविख्यात नेस्लेची चॉकलेट फॅक्टरी आहे.






# तुमचा प्रवास बनवा आठवणीतील

चांगल्या जीवनासाठी फिरायला आणि पर्यटनाला जाणे खूप महत्त्वाचे आहे. त्यामुळे आपल्या जीवनात नवीन उत्साह, आशा जागी होते आणि जीवनात प्रसन्नता येते, पण सध्याच्या व्यस्त आयुष्यात सहली, पर्यटन आणि फिरायला सहसा शक्य होत नाही, तर मग आपल्या जीवनात प्रसन्नता का निर्माण करू नये.

आजकालच्या तणावपूर्ण आणि व्यस्त आयुष्यात सहली आणि फिरायला जाणे संपत चालले आहे. जीवन फक्त घर आणि ऑफिसच्या जबाबदाऱ्या व बस-ट्रेनमधील घाई गडबडीपर्यंत मर्यादित होत आहे. अशा परिस्थितीत सहल व पर्यटनाला जाणेही एक डोकेदुखी वाटते, पण खऱ्या पर्यटनाचा आनंद तेव्हाच मिळतो जेव्हा पर्यटन पूर्ण तन्मयतेने आणि कोणत्याही तणावाशिवाय पार पडते. प्रवास म्हणजे फक्त बस, रेल्वे, टॅक्सी किंवा विमानाने जाणे नव्हे, तर आपल्या दिनचर्येला आयुष्यापासून वेगळे करणारी जवळची शतपावलीदेखील एक चांगला प्रवास म्हटला जाऊ शकतो. यासाठी काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे.

कधीही मानत नसताना फिरायला जाऊन नये. इच्छा असेल तेव्हाच आरि मन पूर्णत: तयार करून प्रवासाला निघावे.

कोणतेही काम अपूर्ण ठेवून प्रवासाला जाऊ नये. घर किंवा ऑफिसच्या जबाबदाऱ्या पूर्ण करूनच बाहेर पडण्याचा प्रयत्न करावा जेणेकरून मन ऑफिसमध्ये गुंतू नये.

पर्यटनासाठी रोमांचक स्थळ निवडावे जे तुमच्यासाठी पूर्णत: नवीन असेल.

प्रवासासाठी निघताना शक्यतो सायंकाळची वेळ निवडावी ज्यामुळे बस, रेल्वे किंवा जहाजात नवीन रात्र घालवण्याची संधी मिळेल.

शक्य असल्यास सोबत लग्नाचा अल्बम किंवा संस्मरणीय फोटो ठेवावेत. वेळ मिळाल्यास हे फोटो पाहावे. यामुळे फक्त गोड आठवणीच जाग्या होणार नाहीत, तर धकाधकीच्या आयुष्यात विस्मरणात गेलेले प्रेमही जागे होईल.

एकमेकांना त्रास होईल आणि रंगाचा बेरंग होईल असे काम किंवा नावाचा उल्लेख येऊ देऊ नये. संधी मिळेल तेव्हा एकमेकांचे कौतुक करावे आणि असे क्षण कॅमेऱ्यात कैद करावेत जेणेकरून नंतरही कधी ते पाहिल्यास दिलासा मिळू शकेल.

नेहमीच्या आयुष्यात आपण जी गोष्ट करणे टाळतो ती प्रवासाला किंवा पर्यटनाला गेल्यानंतर निश्चित करून पाहावी.

स्वत:ला नवीन लूक किंवा आत्मविश्वास देणारे नवीन कपडे प्रवासादरम्यान घालावेत. विचार करा - पार करण्यासाठी आयुष्याक अडचणीच नसतील, तर माणसाच्या समृद्ध अनुभवाची माजच निघून जाईल. खल दऱ्याच नसतील, तर उंच शिखरावर घालवलेले क्षण कधीही अद्भुत वाटणार नाहीत



# ट्रेकर्ससाठी कुल्लु आयडियल

बियास नदीचया पात्रात उत्तरेकडून दक्षिणेकडे ८० कि.मी. लांब परिसरात हे खोरं वसलयं. गिर्यारोहक, पर्यटकांसाठी ते एक आव्हानच ठरतं. स्थानिक विणकरांकडून बनवलेल्या रंगीबेरंगी शाली आणि टोप्यांसाठी कुल्लू प्रसिद्ध आहे. इथूनच १५ किलोमीटर अंतरावर विश्वेश्वर महादेवाचं मंदिर आहे. हे आठव्या शतकात बांधलं गेलेलं आहे. याशिवाय कुल्लू शहर मासेमारी आणि शिकारीसाठीही प्रसिद्ध ठिकाण आहे.


कुटुंबासह, मित्रांच्या गोतावळ्यासह येते भटकंतीसाठी यावंच, पण ट्रेकर्ससाठीही हा प्रदेश आयडियल आहे. ट्रेकिंग, रॉक क्लायबिंग, रिव्हर्स क्रॉसिंग याचा मनसोक्त आनंद घ्यायचा असेल तर कुल्लू-मनालीला यावंच. पूर्वी कुल्लू कुलंथपीठा या नावानं ओळखलं जायचं. कुल्लू दसरा या सणासाठी लोकप्रिय आहे. दसऱ्यादरम्यान इथे नृत्य, संगीत, देवदेवतांच्या पालख्या अशी धमाल असते. कुल्लूच्या शाली आणि कॅप्र आवर्जून खरेदी कराव्या. दिल्लीवरून पठाणकोट मार्गे कुल्लू ७६० कि.मी. अंतरावर आहे.



# भारताचे स्वित्झलँड खज्जियार

खज्जियार भारताचे स्वित्झलँड म्हणतात. येथे छान नैसर्गिक लॉन आहे. मध्ये तळे आहे आणि समोर मोठा डोंगर आणि जंगल आहे. येथे मैदानात बरेच खेळ आणि घोडेवाले असतात. या ठिकाणाहून घोड्याने चंबा गावात जाता येतो.

रावी नदीच्या किनारी हे गाव वसले आहे. येथे ४ देवळांचा एक समूह आहे. त्यातिल एक मंदिर लक्ष्मी नारायण मंदिर १०व्या शकतातील आहे. मंदिरांवर सुंदर कोरीव काम आहे. रावी नदी अतिशय सुंदर आणि स्वच्छ आहे. याठिकाणी कोई मिल गया ह्या चित्रपटाचे चित्रिकरण झाले आहे.



# कनकदुर्ग-गोवागड



हर्णे बंदर प्राचिन काळापासून प्रसिध्द आहे. सुवर्णदुर्ग या जलदुर्गामुळे हर्णे बंदराला ऐतिहासीक महत्वही प्राप्त झालेले आहे. सुवर्णदुग किल्ल्याच्या रक्षणासाठी हर्णेच्या सागरी किनाऱ्यावर तीन किनारी किल्ल्यांची उभारणी करण्यात आलेली आहे. ते तीन दुर्ग म्हणजे कनकदुर्ग, फत्तेदुर्ग आणि गोवागड हे होय.

हर्णे बंदर दापोली तालुक्यामधे असून तो रत्नागिरी जिल्ह्यामधे आहे. कोकणामधील महाड, मंडणगड आणि खेड कडून गाडीमार्गाने दापोलीला पोहोचता येते. दापोलीपासून सोळा कि.मी. अंतरावर हर्णे आहे. हर्णेच्या सागरातील सुवर्णदुर्ग किल्ल्याबरोबर किनाऱ्यावरील या तिन्ही किल्ल्यांनाही भेट देता येते.

हर्णेच्या किनाऱ्यावर दक्षिणेकडे टेकडीवजा एक भुशिर घुसलेले आहे. या लहानश्या टेकडीवजा भुशिरावर कनकदुर्गचा किल्ला उभा आहे. कनकदुर्गाच्या पुर्व बाजुला मच्छिमारांच्या असंख्य नौका दिसतात. या नौकांमधे जाण्यासाठी कनकदुर्गाला लागुनच धक्का बांधलेला आहे. या धक्क्यावर जाण्यासाठी पुलासारखा रस्ता केलेला आहे. या रस्त्यावर चालत गेल्यावर कनकदुर्गाच्यावर जाण्यासाठी केलेल्या पायऱ्यांचा मार्ग आहे. या पायऱ्यांच्या बाजुलाच भक्कम बांधणीचा बुरुज आहे. काळ्या पाषाणातील हा बुरुज म्हणजे कनकदुर्ग... हा पुर्वी किल्ला होता याचा साक्षीदार आहे. पायऱ्यांच्या मार्गाने आपण पाचच मिनिटांमधे कनकदुर्गावर पोहोचतो. गडाच्य माथ्यावरच्या इमारती आता नष्ट झाल्याअसून त्याभागात दिपगृह उभे असलेले दिसते. कनकदुर्गावरुन मुरुड दाभोळ तसेच गोपाळगडापर्यंतचा सागरकिनारा दिसतो. पश्चिमेकडे अथांग सागराची मधुन मधुन चमचमनारी किनार आणि सागराची गाज आपल्या मनाला धडकी भरवत रहाते. या पार्श्वभूमीवर दिमाखात उभा असलेला फुलपाखराच्या आकाराचा सुवर्णदुर्ग आपले लक्ष वेधून घेतो. उत्तरेकडै फत्तेदुर्गाची टेकडी मच्छिमारांच्या वस्तीने पुर्णपणे घेरलेली दिसते. कनकदुर्गावरील गडपणाचे अवशेष काळाच्या ओघात नष्ट झाल्यामुळे आपली गडफेरी १५ ते २० मिनिटांमधे आवरते.

कनकदुर्गाकडून परत फिरल्यावर डावीकडील टेकडी म्हणजे फत्तेदुर्ग असल्याची मनाची समजूत घालून पुढे निघावे लागते. मच्छिमारांच्या वस्तीने व्यापलेल्या फत्तेदुर्गावरचे अवशेष केव्हाच लुप्त झालेले आहे.

फत्तेदुर्गापासून फर्लांगभर गाडीरस्त्याने चालत आल्यावर समोर दिसतो तो तटबंदीने युक्त असलेला गोवागड. भक्कम तटबंदी आणि भक्कम दरवाजा असलेल्या या किल्ल्याचे नाव जरी गोवागड असले तरी गोव्याशी याचा काही संबंध नाही. रस्त्याच्या कडेलाच याचा दरवाजा दिसतो पण याचा मुख्यदरवाजा मात्र उत्तरेकडे तोंड करुन आहे. हे भव्य प्रवेशव्दार पहाण्यासाठी तटबंदीला वळून समोरुन आपल्याला जावे लागते. सागराच्या बाजुला थोडेसे उतरुन डावीकडे वळाल्यावर आतल्या बाजुला हे प्रवेशव्दार आहे. हे प्रवेशव्दार दगडाने चिणून बंद करण्यात आले आहे. प्रवेशव्दाराजवळ हनुमानाची मुर्ती आहे. तसेच येथे शरभ व महाराष्ट्रामधे किल्यांवर अभावानेच दिसणारे गंडभेरुडाचे शिल्प आहे. हे प्रवेशव्दार पाहून पुन्हा रस्त्यावर येवून नव्याने केलेल्या कमानीवजा दारातून गडामधे प्रवेश करावा लागतो. सध्या कोणा हॉटेल व्यवसायीकाने गडाचा ताबा घेतला आहे. त्याने दारावर चौकीही उभारली आहे. तेथील रखवालदाराची परवानगी घेवून किल्ल्यामधे जाता येते. गोवागड दक्षिणकडील भाग थोड्या चढाचा आहे. याचाच उपयोग करुन त्याला तटबंदी घालून बालेकिल्ला केलेला आहे. पश्चिमेकडील तटबंदी काहीशी ढासळलेली आहे. पश्चिमबाजुला सुवर्णदुर्गाचे दृष्य उत्तम दिसते. गडामधे पाण्याची विहीर आहे. तिचा वापर नसल्यामुळे पाणी वापरण्यायोग्य राहीले नाही. किल्ल्यात इंग्रजकालीन दोन इमारती पडलेल्या अवस्थमधे आहेत. त्यामधील एकात पुर्वी कलेक्टर राहात असे. गडामधे महत्त्वाचे असे बांधकाम फारसे शिल्लक नसल्यामुळे गड पहाण्यासाठी अर्धा तास पुरेसा होतो.

जर आपण संध्याकाळच्या वेळेस येथे असू तर कनकदुर्गच्या किनाऱ्यावरील मासळी बाजार अवश्य पहाण्याजोगा आहे. अर्थात खवय्यासाठीतर ही सुवर्णसंधीच होय.

# भाजपचे दरवाजे सर्वांसाठी खुले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :



भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरूवारी नाशिकमध्ये बोलताना पक्षवाढीसाठी आपल्या पक्षाची कवाडे सर्वांसाठी खुली असल्याचे स्पष्ट केले आहे.

त्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून हकालपट्टी करण्यात आलेल्या सुधाकर बडगुजरांसाठी भाजपने अवघ्या २४ तासांतच आपले दरवाजे खुले केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक १५ ऑगस्टला लागेल, असा अंदाजही बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केला.

ठाकरे गटाने पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत बुधवारी सुधाकर बडगुजर यांची पक्षातून हकालपट्टी केली होती. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांना आपल्या पक्षात प्रवेश देण्याचे संकेत दिलेत.

तत्पूर्वी स्वतः बडगुजर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आपण भाजपच्या वाटेवर असल्याचे स्पष्ट केले होते. पण बडगुजर यांना पक्षात घेण्यास भाजपच्या स्थानिक नेत्यांनी विरोध केला होता. पण आता बावनकुळे यांनी स्वतःच बडगुजर यांना पक्षात घेण्यास ग्रीन सिग्नल दिला आहे.

सुधाकर बडगुजर यांच्या पक्ष प्रवेशाविषयी गिरीश महाजन लक्ष घालत आहेत. पक्षवाढीसाठी आमची कवाडे सर्वांसाठी खुली आहेत, असे बावनकुळे यांनी याविषयी बोलताना स्पष्ट केले.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी नेत्यांच्या मागे-पुढे फिरणाऱ्यांना तिकीट मिळणार नसल्याचेही ठणकावून सांगितले. नेत्यांच्या मागे-पुढे करणाऱ्या महापालिका निवडणुकीत तिकिट मिळणार नाही. त्यामुळे कुणीही नेत्यांपुढे चमकोगिरी करू नये. भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मागील ११ वर्षांत मोदी सरकारने केलेल्या कामांची उजळणी करून ती जनतेपर्यंत पोहोचवायची आहेत.

आगामी निवडणुकांत आपल्याला एकेक मत महत्वाचे आहे. त्यामुळे कमळ चिन्हावर लढणाऱ्या एकाही कार्यकर्त्याला आपल्याला हरू द्यायचे नाही. सर्वांनी असा संकल्प घेतला पाहिजे.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने लाडकी बहीण, शेतकरी वीज बिल माफीसारखे निर्णय घेतले होते. आता १५ ऑगस्टला स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लागेल. त्यामुळे आपल्याला अधिक प्रयत्न करावे लागतील, असे ते म्हणाले.

## बडगुजरांच्या प्रवेशाला सीमा हिरेंचा विरोध

दुसरीकडे, सुधाकर बडगुजर यांच्या भाजप प्रवेशाला नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सीमा हिरे यांनी कडाडून विरोध केला आहे. सुधाकर बडगुजर भाजपमध्ये प्रवेशासाठी इच्छुक असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. पण यासंबंधी आमच्याशी कोणतीही चर्चा किंवा विचारणा झाली नाही. मी स्वतः बडगुजर यांच्या विरोधात दोनदा निवडणूक लढवली. त्यांनी आमच्या कार्यकर्त्यांना त्रास दिला. आमच्या वरिष्ठ नेत्यांवर आक्षेपार्ह टीका केली. खुद्द चंद्रशेखर बावनकुळे यांच्याविषयी त्यांनी चुकीची माहिती पसरवली होती. एवढेच नाही तर नारायण राणे यांच्यावर त्यांनी अटक होईल अशी परिस्थिती निर्माण केली. त्यामुळे अशा व्यक्तीस पक्षात प्रवेश देऊ नये अशी आमची भूमिका आहे. बडगुजर यांच्यावर सध्या १७ गुन्हे दाखल आहेत. त्यांचे अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहीमच्या हस्तक सलीम कुत्ता याच्याशीही संबंध असल्याची माहिती आहे. त्यांच्या मुलावरही गोळीबाराचा गुन्हा दाखल आहे. या सर्व प्रकरणांमधून स्वतःची सुटका करण्यासाठी ते भाजपमध्ये येण्याचा प्रयत्न करत असावेत, असे त्यांनी म्हटले आहे.

# बफर झोनमधील गावांमध्ये एआय कॅमेरे बसवणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

मानव वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी तसेच वन्य प्राण्यांच्या हल्ल्यापासून ग्रामस्थांना वाचविण्यासाठी वन्य प्राण्यांचा वावर आहे, अशा महाराष्ट्रातील वनालगतच्या बफर झोनमधील गावांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर असणारे कॅमेरे लावण्यात येणार असल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी येथे दिली.

चंद्रपूर येथे आयोजित महिला परिषदेला उपस्थित राहण्यासाठी आले असता ते माध्यमांशी बोलत होते. मानव व वन्यजीव यांच्यात संघर्ष निर्माण होऊ नये, अशा घटनांमध्ये माणसांचा मृत्यू होऊ नये, यासाठी ठोस पावले उचलण्यात येईल, असेही ते म्हणाले.

वनालगतच्या गावांमध्ये फेन्सिंग करणे, चर खोदणे याबरोबरच वन्य प्राण्यांची माहिती गावकऱ्यांना कळावी, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल. यासाठी यासाठी कॅम्पा वन्यजीव निधी तसेच गरज पडल्यास मॅनग्रोजमधील निधी वापरला जाईल, असे नाईक यांनी सांगितले.



महाराष्ट्रातील जंगलांमध्ये वन्य प्राण्यांची संख्या वाढत असल्यामुळे मानव व वन्यजीव संघर्ष होत आहेत. जंगलातील प्राणी संख्या नियंत्रणात आणण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहे. संध्याकाळी साडेसातसे सकाळी साडेसात पर्यंत तो काळ महत्वाचा असतो. लोकांमध्ये जागृती व्हावी सोलर फेन्सिंग लावण्यात येईल. यासह अनेक उपाययोजना केल्या जातील.

नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यात नेऊरवाडा गावात वाघाच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. रवी कवडू कालसर्पे (वय ३८) हे शेतात काम करत असताना वाघाने हल्ला केला. वन विभागाचे अधिकारी सातत्याने काम करीत होते. पण, समज, गैरसमज पसरवले जातात.

विभागाचे अधिकारी कोणाला सांगत नसतात. आम्ही आमचे प्रयत्न करीत असतो, असे नाईक म्हणाले. चंद्रपूरसह इतर ठिकाणी बफरमध्ये पर्यटक वाघ पाहण्यासाठी रस्त्यावर उतरत आहे. वन विभागासह प्रत्येक विभागात आम्ही मायक्रो लेव्हलवर बदल करीत आहो. त्यातून निश्चितपणे चांगले बदल होतील. यात जनतेचाही सहभाग लागेल असे ते म्हणाले.

# माजी आमदार सानंदांचे अखेर ठरले!

## दादांच्या राष्ट्रवादीत घेणार प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. ५ :



खामगावचे माजी आमदार काँग्रेस सोडण्याच्या दीर्घ चर्चेला अखेर त्यांनीच पूर्णविराम दिला आहे. खामगाव विधानसभा मतदारसंघाचे तब्बल तीनवेळा काँग्रेसचे आमदार राहिलेले ज्येष्ठ नेते दिलीपकुमार सानंदा यांनी अखेर पक्षाला रामराम ठोकला आहे.

येत्या १२ जून रोजी दिलीप कुमार सानंदा हे राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करून हातात घड्याळ बांधणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

मागील काही महिन्यांपासून सानंदा हे काँग्रेस सोडणार असल्याच्या चर्चा सुरु होत्या. ते कोणत्या पक्षात जाणार याबद्दल उत्सुकता होती. मध्यंतरी त्यांनी किमान दोनवेळा शिवसेना नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. अलीकडे बुलढाणा दौऱ्यावर आलेले शिंदे यांची त्यांनी आमदार गायकवाड यांच्या फार्म हाऊस वर भेट घेतली. मात्र संभाव्य सेना प्रवेश टळला. भाजप प्रामुख्याने खामगावचे आमदार आकाश फुंडकर यांचा कडवा विरोध असल्याने हे डावपेच फसले. मात्र काँग्रेस सोडण्याचा निर्धार पक्का असल्याने त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी संपर्क साधला.

एक महिन्यापूर्वी त्यांच्या ताब्यातील खामगाव बाजार समिती मधील काही संचालकानी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश केला. यामुळे ते लवकरच हातात घड्याळ बांधणार हे स्पष्ट झाले. स्वतः सानंदा यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलतांना यावर शिक्कामोर्तब केले. तसेच काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनाम्याची माहिती दिली.

मागील चार दशकांच्या राजकारणात सानंदा यांनी क्रियाशील सदस्य ते तीनवेळा आमदार अशी मजल मारली. मतदारसंघात कोणतेही नेतृत्व निर्माण होणार नाही याची दक्षता घेतली. खामगाव मतदारसंघात काँग्रेस म्हणजे सानंदा असे समीकरण तयार झाले. गेली चार दशके ते काँग्रेसच्या कार्यात सक्रिय होते. पक्षनिष्ठा राखून त्यांनी संघटन बळकट करण्यासाठी तन-मन-धनाने योगदान दिले होते. पक्षानेही त्यांना विविध जबाबदाऱ्या देऊन गौरवले होते, असे त्यांनी आपल्या राजीनाम्यात नमूद केले आहे.

मात्र, गेल्या काही काळात पक्षातील अंतर्गत गटबाजी, दुर्लक्ष आणि अनुशासनहीनतेमुळे सानंदा नाराज होते. या पार्श्वभूमीवर त्यांनी पक्षाच्या सदस्यत्वासह सर्व पदांचा राजीनामा दिला असून, तो तात्काळ स्वीकारावा, अशी विनंती त्यांनी आपल्या पत्रात केली आहे. राजीनामा दिला असून, त्यांनी अधिकृतपणे याची माहिती प्रसिद्धी माध्यमांना दिली. त्यांच्या पाठोपाठ खामगाव मतदारसंघातील अनेक काँग्रेस पदाधिकारी राजीनामा देणार असल्याचे समजते.

## अदानीला २१ एकर जागा देता यावी म्हणूनच अटी शिथिल

वडेट्टीवार यांचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

मुंबईतील धारावी प्रकल्पासाठी अदानी समूहाला मुंबईतील जमिनीची खैरात वाटण्यात येत आहे. धारावी पुनर्वसनाचे नाव पुढे करून मोक्याच्या जागा या उद्योग समूहाला देण्याचे काम सरकार करत आहे.

या मोक्याच्या ठिकाणी टॉवर उभे केले जाणार, पण धारावीकरांसाठी जमीन दिल्याचे सरकार सांगत आहे हे खोटे आहे, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. हे सरकार अदानी उद्योग समूहासाठी महाराष्ट्राला उध्वस्त करत असल्याची टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

कुर्ला येथील २१ एकर जागा ही अदानी उद्योगसमूहाला राज्य सरकारने देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी अटी शर्ती देखील शिथिल केल्या आहेत. संपूर्ण मुंबईतील अनेक महत्वाचे भूखंड हे या समूहाला देण्यात आले आहेत. अजून किती जमीन यांना देणार असा प्रश्न उपस्थित होत आहे. महाराष्ट्र आणि मुंबईचे अदानी समूहाला गहाण ठेवली आहे का? असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

देशात जनगणना होणार आहे, २०२७ पासून या प्रक्रियेला सुरवात होणार आहे. यावेळी जातीनिहाय जनगणना देखील करण्यात येणार आहे. राहुल गांधी यांनी जातीनिहाय जनगणनेची मागणी लावून धरली होती, त्यानंतर सरकारने निर्णय घेतला आहे. आता सरकारने २०२७ मध्ये जनगणनेची प्रक्रिया सुरू करणार ही घोषणा केली आहे. निवडणुकीत ओबीसी समाजाची मत घ्यायची पण त्यांच्याकडे भाजप दुर्लक्ष करते. २०२९ निवडणुकीला समोर ठेवून जुमलेबाजी करू नये. जातीनिहाय जनगणना सरकारने याचवर्षी ती प्रक्रिया सुरू करावी अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.

## नागपुरात नवविवाहितेची आत्महत्या

### लग्नाच्या ३५ दिवसांनंतर तरुणीने संपवले जीवन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण अजूनही ताजे असताना नागपूरमध्येही अशीच हुंडाबळीची घटना घडली. बुटीबोरी परिसरात सासरच्यांकडून होणाऱ्या मानसिक आणि शारीरिक छळाला कंटाळून एका नवविवाहितेने आत्महत्या केली. मयुरी ठाकरे डाहुले (वय २६) हिने राहत्या घरी गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली. अवघ्या ३५ दिवसांपूर्वी म्हणजेच २५ एप्रिल २०२५ रोजी तिचा विवाह अभिषेक डाहुले याच्याशी मोठ्या थाटामाटात पार पडला होता.

विवाहानंतर काहीच दिवसांत सासू कुसुम डाहुले, सासरे दीपक डाहुले आणि दीर आदित्य डाहुले यांनी सतत पैशांसाठी मयुरीवर दबाव टाकण्यास सुरुवात केली. नवरा अभिषेक डाहुले यानेही या छळाला पाठिंबा दिल्याचे स्पष्ट झाले आहे.

शारीरिक आणि मानसिक छळामुळे मयुरी अत्यंत तणावात होती. काही दिवसांत परिस्थिती सुधारेल असे वाटल्याने तिने सुरुवातीला तिला होत असलेल्या त्रासाची माहिती वडिलांना दिली नव्हती. मात्र, छळ न थांबल्यामुळे तिने आपल्या वडिलांना सर्व प्रकार सांगितला. वडिलांनी मदतीचा हात पुढे करत गटाच्या भीशीतील २० हजार रुपये सासरच्या मंडळींना दिले, मात्र त्यानंतरही छळ थांबला नाही. छळाला कंटाळून मयुरीने गळफास घेऊन जीवन संपवले. मयुरीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती अभिषेक डाहुले, सासू कुसुम डाहुले, सासरे दीपक डाहुले आणि दीर आदित्य डाहुले यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.

: सिनेरंग :

## अण्णा, आदित्य, बबली आणि सनी यांचा नवा घोटाळा!




लोकरंजन

मराठी प्रेक्षकांची मने जिंकणारी सुपरहिट फ्रँचायझी ये रे ये रे पैसा पुन्हा एकदा प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी सज्ज आहे. धमाल विनोद, कमाल कथा आणि एकाहून एक भन्नाट पात्रे घेऊन ये रे ये रे पैसा ३ येत्या १८ जुलै रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर प्रदर्शित झाले असून यात अण्णा, आदित्य, बबली आणि सनी यांचा कूल अंदाज पाहायला मिळत आहे.

चित्रपटाच्या टीझरला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळत असतानाच आता या नवीन पोस्टरने प्रेक्षकांचे लक्ष वेधले आहे. या फ्रँचायझीने नेहमीच प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केले आहे. त्यामुळे यंदा हे मनोरंजन तिप्पट होणार हे नक्की.

ये रे ये रे पैसा ३ मध्ये कॉमेडीचा ट्रिपल धमाका असून एका नव्या मोठ्या गोंधळाची धमाल कहाणी उलगडणार आहे. यावेळी पाच कोटींचा आर्थिक घोटाळा आणि ते सुटवण्याच्या प्रयत्नात अण्णा, आदित्य, बबली आणि सनी यांच्यासोबत घडणाऱ्या भन्नाट घटना पाहणे रंजक ठरेल. या चित्रपटाचे वैशिष्ट्य म्हणजे धर्मा प्रॉडक्शन्स प्रस्तुत अमेय विनोद खोपकर पिक्चर्स, उदाहरणार्थ निर्मित, न्युक्लिअर ॲरो पिक्चर्स यांनी चित्रपटाची निर्मिती केली असून वर्डविझार्ड एंटरटेनमेंट यांनी सहनिर्मिती केली आहे.

तसेच सुधीर कोलते, ओमप्रकाश भट्ट, नासीर शरीफ, ओंकार सुषमा माने, स्वाती खोपकर, निनाद नंदकुमार बत्तीन, गिरीधर गोपालकृष्ण धुमाळ हे निर्माते व सौरभ लालवाणी सहनिर्माते आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन संजय जाधव यांनी केले असून या चित्रपटात संजय नार्वेकर, सिद्धार्थ जाधव, उमेश कामत, तेजस्विनी पंडित, विशाखा सुभेदार, आनंद इंगळे, नागेश भोसले, वनिता खरात, जयवंत वाडकर यांच्यासह आणखी काही कलाकार प्रेक्षकांना पाहायला मिळतील.

■ ■ ■



'कप बशी' या आगामी चित्रपटात दिसणार पूजा सावंत, ऋषी मनोहर ही फ्रेश जोडी

नवनवे प्रयोग, नव्या कल्पना मराठी चित्रपटसृष्टीत होत असतात. आता आगामी कप बशी या चित्रपटातून पूजा सावंत आणि ऋषी मनोहर ही नवी जोडी प्रेक्षकांसमोर येणार आहे. अत्यंत मजेशीर, मनोरंजक अशी कहाणी या चित्रपटातून उलगडणार असून सध्या मुंबई येथे या चित्रपटाचे चित्रिकरण सुरु आहे.

'कप बशी' या चित्रपटाची निर्मिती सुकल्प चित्र या निर्मिती संस्थेच्या कल्पक सदानंद जोशी यांची असून निर्माता म्हणून हा त्यांचा पहिलाच चित्रपट असला, तरी त्यांचं चित्रपटसृष्टीशी असलेलं नातं जुनंच आहे.

त्यांचे वडील सदानंद जोशी यांनी १९९६ साली प्रदर्शित झालेल्या पुत्रवती या चित्रपटासाठी कथा, पटकथा, गीतलेखन आणि निर्मिती अशा सर्वच बाजूंवर काम केलं होतं. त्या चित्रपटाला राष्ट्रीय, राज्यस्तरीय १४ पुरस्कारांनी गौरवला गेला होता. त्यामुळे वडिलांचं प्रेरणादायी काम आणि त्यांचा कलात्मक वारसा आता कप बशी या चित्रपटातून ते पुढे आणत आहेत. वैभव चिंचाळकर हे टीव्ही मालिका, नाटक, मराठी चित्रपटातलं सुपरिचित नाव आहे. वैभव यांनी कन्यादान, नकुशी, शुभमंगल ऑनलाइन, पुढचं पाऊल अशा अनेक गाजलेल्या मालिका, पुष्पक विमान या चित्रपटाशी दिग्दर्शन केले होते.

पूजा सावंतनं अनेक मराठी, हिंदी चित्रपटांत उत्तम अभिनयाचं दर्शन घडवलं आहे. तर ऋषी मनोहरनं टीव्ही मालिका, नाटक, चित्रपटांतून स्वतःला अभिनेता म्हणून सिद्ध केलं आहे. त्यामुळे या दोघांची फ्रेश जोडी मोठ्या पडद्यावर किती खुलून दिसते याचं कुतूहल आहे.

■ ■ ■

स्टार प्लस या वाहिनीवर प्रेक्षकांना नवा आस्वाद घेता येईल, असा एक नवा कार्यक्रम लवकरच सादर होणार आहे. प्रसिद्ध यू ट्यूबर आणि आपल्या पदार्थांनी घरगुती स्वयंपाकाच्या बाबतीत एक नवी हलचल निर्माण करणाऱ्या निशा मधुलिका स्टार प्लसद्वारे छोट्या पडद्यावर पदार्पण करत आहेत! त्यांचा लाघवी स्वभाव, वागण्या-बोलण्यातील नम्रता, सोप्या पाककृती आणि प्रेक्षकांना आपलेसे करण्याची त्यांची वृत्ती याकरता नावजलेल्या निशा मधुलिका यांचे यू ट्यूबवर १ कोटी २० लाखांहून अधिक सदस्यांचा एक निष्ठावंत समुदाय निर्माण केला आहे.




## स्टार प्लसद्वारे छोट्या पडद्यावर निशा मधुलिका यांचे पदार्पण

शाकाहारी पाककृतींचा एकेक टप्पा निगुतीने आणि अत्यंत सोप्या पद्धतीने सांगण्याच्या त्यांच्या हातोटीमुळे निशा मधुलिका आजच्या घडीला देशातील सर्वात आवडत्या पाककृती विषेशज्ञ बनल्या आहेत.

प्रामुख्याने, गृहिणी आणि खाद्यप्रेमींचा मोठा प्रतिसाद त्यांना लाभत आहे. आता त्यांची जादू छोट्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. स्टार प्लस वाहिनीवरील लोकप्रिय पात्रांसह स्टार प्लसच्या मालिकांमध्ये त्या आता सहभागी होत आहेत. तेव्हा दर सोमवारी संध्याकाळी ६:१५ वाजता फक्त स्टार प्लसवर निशा मधुलिका यांना तुमच्या दूरचित्रवाणीवर स्वयंपाक करताना पाहण्यासाठी सज्ज व्हा!

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१९६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## कृषी घोटाळ्याचे पुरावे एसीबीकडे सादर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्याविरोधातील कथित कृषी घोटाळ्याचे पुरावे एसीबी अर्थात अँटी करप्शन ब्यूरोला दिले. तसेच या पुराव्यांमुळे आता धनंजय मुंडे वाचणार नाहीत असा ठाम दावाही केला.

त्यांच्या या दाव्यामुळे सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा पाय आणखी खोलात गेल्याचा दावा केला जात आहे. अंजली दमानिया यांनी काही महिन्यांपूर्वी तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. त्यानंतर एसीबीने त्यांना या आरोपांचे पुरावे देण्याचा समन्स बजावला होता.

त्यानुसार, दमानिया यांनी बुधवारी अँटी करप्शन ब्यूरोच्या येथील कार्यालयाला भेट देऊन धनंजय मुंडे यांच्याविरोधातील पुरावे दाखल केले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी योग्य कारवाई झाली तर धनंजय मुंडे वाचणार नाहीत असे अंजली दमानिया म्हणाल्या.

## राज्यमंत्र्यांना किरकोळ अधिकार

# थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :



अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ (अजित पवार गट) आणि त्याच खात्याचे राज्यमंत्री योगेश कदम (शिंदे गट) यांच्यातील संघर्ष वाढला आहे. कदम यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याविरुद्ध तक्रार केली आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे किरकोळ अधिकार देण्यात आल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे आणि तोंडी अधिकार स्वीकारण्यास नकारही दिला आहे.

महायुती सरकारच्या दोन मंत्र्यांमधील अंतर्गत संघर्षाची चर्चा सध्या संपूर्ण मंत्रालयात चर्चेचा विषय बनली आहे. एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात राज्यमंत्र्यांना जे अधिकार देण्यात आले होते तेच अधिकार आताही सर्व राज्यमंत्र्यांना देण्यात यावेत, अशी विनंती कदम यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना लेखी स्वरूपात केल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

कदम यांच्याकडे गृह (शहरे), महसूल, ग्रामविकास आणि पंचायतराज, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन विभागांची जबाबदारी आहे.

गृहमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर अवघ्या १० दिवसांत फडणवीसांनी त्यांना राज्यमंत्रिपदाचे अधिकार बहाल केले.

परंतु महसूल, ग्रामविकास आणि पंचायतराज आणि अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणाशी संबंधित राज्यमंत्र्यांना दिले जाणारे अधिकार त्यांना अद्याप देण्यात आलेले नाहीत. मंत्री नरहरी झिरवाळ यांनी अन्न आणि औषध प्रशासन विभागाशी संबंधित अतिशय किरकोळ अधिकार दिले, असे त्यांचे म्हणणे आहे. हे प्रकरण तापण्याचे संकेत आहेत.

# झेपणार नव्हती तर आश्वासने लादली कशाला?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर बच्चू कडू यांनी सरकारविरोधी भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांविरोधात एक व्यंगचित्र तयार करून थेट सरकारला प्रश्न विचारले आहेत.

कर्जमाफीच्या मुद्द्यावरून बच्चू कडू यांनी सरकारला घेरण्याचे योजिले आहे. अजित पवार यांनी आपण कुठेही कर्जमाफीसंदर्भात बोललो नसल्याचे वक्तव्य केले आहे. यावर भाष्य करताना कडूंनी भाजप हा राष्ट्रवादीचा बाप असल्याचा टोला लगावला होता. तर पुढील महिन्यापासून त्यांनी आंदोलन छेडणार असल्याची घोषणा केली आहे.

बच्चू कडू यांच्या पक्षाकडून एक कार्टून व्हायरल केले जात आहे. ज्यामध्ये कडू यांनी मुख्यमंत्र्यांवर प्रहार केला आहे, तसेच निवडणुकीत दिलेल्या घोषणांवर प्रश्न केलेला आहे. हे कार्टून सर्वत्र चर्चेचा विषय ठरलेला आहे.




बच्चू कडू यांच्या कार्टूनमधून शेतकऱ्यांना कर्जमाफी कधी देणार, ७२ हजार रोजगारांची कधी निर्मिती होणार, दिव्यांगला न्याय कधी मिळणार, शेतकऱ्यांचे प्रश्न कधी सुटणार, असे अनेक प्रश्न या व्यंगचित्राच्या माध्यमातून करण्यात आले. तसेच झेपणार नव्हते तर खोटे आश्वासन दिले कशाला? असा प्रश्नही केला आहे. या कार्टूनला कडू सवाल असे नाव देण्यात आले आहे.

### ७ जुलैपासून मोझरी येथे आमरण उपोषण

अजित पवारांच्या घरासमोरील आंदोलनानंतर बच्चू कडू पुढे टप्प्याटप्प्याने पंकजा मुंडे, बाळासाहेब पाटील आणि संजय राठोड यांच्या घरासमोर आंदोलन करणार आहेत. यात सर्वात शेवटी कर्जमाफीच्या मुद्द्यावर नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घरासमोर आंदोलनाची घोषणा त्यांनी केली आहे. कर्जमाफीच्या मुद्द्यावर ७ जुलैपासून तुकडोजी महाराजांचे समाधीस्थळ असलेल्या अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी किंवा आपल्या जन्मगाव असलेल्या कुरळपूर्णा येथे आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे.